
सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
लातूर | शुक्रवार, २७ मार्च २०२६ । वर्ष ४ रे अंक १९ । पाने १२ । किंमत रु. ६/-

# इराण युध्दावर आज मुख्यमंत्र्यांशी बोलणार मोदी

## येणारा काळ कोरानासारखी परीक्षा घेईल; सर्वांना एकत्र काम करावे लागेल

**नवी दिल्ली, २६ मार्च-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी २७ मार्च रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व मुख्यमंत्र्यांशी संवाद साधतील. यामध्ये इराण युद्धांनंतर बिघडलेल्या परिस्थितीवर चर्चा होण्याची शक्यता आहे. निवडणूक असलेल्या राज्यांचे मुख्यमंत्री यात सहभागी होणार नाहीत.



मोदींनी २४ मार्च रोजी राज्यसभेत सांगितले होते की, इराण युद्ध सुरू राहिल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील. येणारा काळ कोरोनाकाळासारख्या परीक्षेचा असेल. केंद्र आणि राज्यांना एकत्र काम करावे लागेल.

दरम्यान, सरकारने आज देशात पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या तुटवड्याच्या बातम्या फ टाळून लावल्या आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने सांगितले की, जगात काहीही झाले तरी, भारताकडे ६० दिवसांसाठी पुरेसे पेट्रोल आणि डिझेल आहे. सोशल मिडियावरील बातम्यांचा उद्देश बाजारात 'पॅनिक बाइंग' सुरू करणे आहे. मंत्रालयाने सांगितले की, तुटवड्याच्या अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

### इराण युद्धामुळे तेल-गॅस पुरवठ्यावर परिणाम

इराणसोबत इस्रायल आणि अमेरिकेच्या युद्धाचा आज २७ वा दिवस आहे. युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझमधून तेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. भारत आपल्या गरजेच्या ५०% कच्चे तेल आणि ५४% एलएनजी याच मार्गाने आयात करतो. जगातील एकूण पेट्रोलियमपैकी २०% हिस्सा याच मार्गाने जातो. इराण युद्धामुळे हा मार्ग आता सुरक्षित राहिलेला नाही. धोका लक्षात घेता, कोणताही तेल टँकर तिथून जात नाहीये.

### ४१ देशांकडून तेल-गॅस आयात

पश्चिम आशियातील युद्धाच्या परिस्थितीवर पंतप्रधान मोदींनी लोकसभेत पहिल्यांदा सार्वजनिक विधान केले. लोकसभेतील २५ मिनिटांच्या भाषणात त्यांनी म्हटले होते की, तणाव संपला पाहिजे. संवादातूनच समस्येचे निराकरण होईल. पंतप्रधानांनी सांगितले की, नागरिक आणि ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ले मान्य नाहीत. होर्मुझचा मार्ग रोखणे स्वीकारार्ह नाही.

## भारतासह पाच देशांना इंधन वाहतुकीस परवानगी : दारूवाला

**पुणे** : देशात इंधन टंचाईच्या चर्चेदरम्यान, ऑल इंडिया पेट्रोल पंप असोसिएशनचे प्रवक्ते अली दारूवाला यांनी नागरिकांना दिलासा दिला आहे. भारतात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून, पुढील १० ते १२ दिवसांत परिस्थिती पूर्णपणे सुरळीत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. इराणने भारतासह जगातील पाच देशांना इंधन वाहतुकीसाठी अधिकृतपणे परवानगी दिली आहे. गुरुवारी दुपारी साडेबारा वाजता ही परवानगी देण्यात आली, ज्यामुळे इंधन पुरवठा साखळी अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे. सरकारला प्रति लिटर सुमारे ५० रुपयांचा तोटा होत आहे.

## भोंदू खरातचे व्हिडिओ व्हायरल; तिघांवर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर, दि. २६ मार्च-**

नाशिकचा कथित ज्योतिषी आणि भोंदूबाबा अशोक खरात याच्या लैंगिक शोषणाचे अश्लील व्हिडिओ समाजमाध्यमांवर वाऱ्यासारखे पसरल्यानंतर आता पोलिस प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. तांत्रिक विधीच्या नावाखाली विवाहित महिला आणि तरुणींचे शोषण करणाऱ्या खरातच्या या कृत्यांचे व्हिडिओ व्हायरल करून पीडितांची ओळख उघड केल्याप्रकरणी पोलिसांनी पहिला गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी कोपरगाव आणि बीडमधील तीन संशयितांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, त्यांच्या अटकेसाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.अशोक खरातच्या अश्लील चित्रफिती व्हायरल झाल्याने पीडित महिला आणि त्यांच्या कुटुंबाची बदनामी होत आहे.

कायद्यानुसार लैंगिक शोषणातील पीडितेची ओळख उघड करणे हा गंभीर गुन्हा आहे. तरीही काही व्यक्तींकडून हे व्हिडिओ सातत्याने फॉरवर्ड केले जात होते. याची गंभीर दखल घेत अहिल्यानगर पोलिसांनी कोपरगावमधील राहुल शिंदे, योगेश आढाव आणि बीडमधील संदीप गरजे या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २९४ (२), ३ (५) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### नेटीझन्स आणि ग्रुप ॲडमिनना कडक इशारा

हा गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिस प्रशासनाने जनतेला आणि विशेषतः व्हॉट्सप ग्रुप डमिनना गंभीर इशारा दिला आहे. कोणाकडेही पीडित महिला, तिचे नातेवाईक किंवा तिच्या घराची ओळख उघड होईल असे व्हिडिओ असल्यास ते तातडीने डिलीट करावेत. असे व्हिडिओ कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसारीत करणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरू शकतो. अशा पोस्ट फॉरवर्ड झाल्यास केवळ संबंधित व्यक्तीच नव्हे, तर ग्रुप डमिनवरही कायदेशीर कारवाई करून त्यांना अटक केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.








झिरवाळ यांच्या बंगल्यावरील व्हिडिओमध्ये जे काही लोक दिसत आहेत, त्यांचं वय १८-१९ च्या पुढे आहे. महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली आहे की नाही ते पाहावे लागेल. पोलिसांकडे जर तक्रार दिली असेल तर शंभर टक्के कारवाई झाली पाहिजे.
- **रोहित पवार**, आमदार राकाँ (श.प.)


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शुक्रवार, २७ मार्च २०२६ २




अशोक खरात प्रकरण अतिशय गंभीर असून ही विकृती आहे. आपल्या समाजात काही लोक या गोष्टी मानणारे आहेत, मला दोन महिन्यांपूर्वी याबाबत कल्पना होती, पोलिसांना तशी सूचना दिली होती. अशोक खरात कायमस्वरूपी जेलमध्ये कसा राहील हे पाहिले जाईल.
- **गिरीश महाजन**, मंत्री, महाराष्ट्र

# इराण-इस्रायलचे परस्परांवर हल्ले

## बुशेहर अणुकेंद्राजवळ क्षेपणास्त्रांचा मारा, रशियाकडून निषेध

◆ **तेहरान, २६ मार्च**

इराणच्या बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पाजवळ इस्रायलने गुरुवारी क्षेपणास्त्रांचा मारा केला. अणुप्रकल्पाला लक्ष्य करण्याची ही दुसरी घटना आहे. रशियाने या हल्ल्याचा निषेध करीत इस्रायलला इशारा दिला. दुसरीकडे इराणने सौदी अरब, युएई, कुवैत आणि इस्रायलच्या अनेक शहरांवर ड्रोनचा मारा केला तर इस्रायलचे तेहरान, लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर हल्ले सुरूच आहेत.

इस्रायलने गुरुवारी पहाटे इराणच्या बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पाजवळ केलेल्या हल्ल्याचा निषेध करताना रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, अमेरिका आणि इस्रायल जाणूनबुजून अणू आपत्ती घडवण्याचा प्रयत्न करीत आहे. बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पात रशियाचे ३०० पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहे. हल्ल्यात त्यांचे नुकसान झाल्यास शांत बसणार नाही. इराण आणि रशियाने संयुक्तपणे बांधलेल्या या ठिकाणाहून कामगारांना बाहेर काढण्यास आम्हाला भाग पाडले जात आहे. अणुप्रकल्पांवर हल्ले करणे टाळणे जागतिक शांततेसाठी गरजेचे आहे. इस्रायल आणि अमेरिकेने इराणच्या शिराझ प्रदेशातील काफरी गावातील निवासी भागावर हल्ले केले. दोन मुलांसह १० नागरिकांचा मृत्यू झाल्याचा दावा इराणच्या सरकारी प्रवक्त्याने केला आहे. इराणने हल्ल्याला प्रत्युत्तर देत आखाती देशांवर ड्रोनचा मारा केला. अबुधाबीमध्ये क्षेपणास्त्र नष्ट करण्यात आले. क्षेपणास्त्राच्या अवशेषांमुळे दोन जण ठार झाले. (वृत्तसंस्था)





### संयुक्त राष्ट्रांकडून शांततेचे आवाहन



**संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटारेस यांनी शांततेचे आवाहन करताना म्हटले की, पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाचा सर्वात वाईट परिणाम गरीब आणि असुरक्षित लोकांवर होत आहे. या संघर्षाचे मानवी परिणाम अशा नागरिकांना भोगावे लागत आहेत ज्यांची या संघर्षात कोणतीही भूमिका नाही. युद्ध थांबवून दोन्ही पक्षाने तत्काळ चर्चेने मार्ग काढावा.**

### आम्ही प्रत्येक सीमा तोडू



**दहशतवादी संघटना हिजबुल्लाहने इस्रायलच्या अनेक भागांवर क्षेपणास्त्रांचा मारा केल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी गुरुवारी लेबनॉनच्या सीमेवर सैन्याची तैनाती वाढविण्याचे आदेश दिले. लेबनॉनची प्रत्येक सीमा तोडून आमचे लष्कर आत घुसून कारवाई करेल. हिजबुल्लाहच्या सदस्यांना शोधून ठार केले जाईल.**

### कुवैत विमानतळावर ड्रोन हल्ला; इंधन टाकीला आग

**कुवैत आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एका इंधन टाकीमध्ये ड्रोन हल्ल्यानंतर भीषण आग भडकली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एका शत्रूच्या ड्रोनने केलेल्या हल्ल्यामुळे ही आग लागली असून, ती विझवण्यासाठी सध्या मोठ्या प्रमाणावर मोहीम राबवली जात आहे. संघर्षाच्या सुरुवातीपासून आतापर्यंत कुवेतमध्ये अशा ८२ घटनांची नोंद झाली आहे.**

## एअर इंडियाच्या दिल्ली-लंडन विमानात बिघाड

◆ **नवी दिल्ली, २६ मार्च**

नवी दिल्लीहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे ए३५० विमान गुरुवारी तांत्रिक बिघाडामुळे दिल्लीला परतले. हे विमान सुमारे सात तास हवेत होते. फ्लाईट ट्रॅकिंग वेबसाईटनुसार, विमानाने गुरुवारी सकाळी सुमारे ६ वाजता दिल्लीतून उड्डाण केले होते. सुमारे चार तासांनंतर, जेव्हा ते सौदी अरेबियाच्या हवाई हद्दीत होते, तेव्हा ते परत आणण्याचा निर्णय घेण्यात आला. सुमारे सात तास हवेत राहिल्यानंतर विमान दुपारी १२.३० वाजता दिल्लीला पोहोचले.

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, दिल्लीहून लंडनला जाणाऱ्या एआय१११ विमानाने संशयास्पद तांत्रिक समस्येमुळे खबरदारी म्हणून परत येण्याचा निर्णय घेतला. विमान सुरक्षितपणे उतरले असून त्याची तांत्रिक तपासणी केली जात आहे. विमानात नेमका कोणता बिघाड होता, याबाबत माहिती मिळायला काही वेळ लागू शकतो. सूत्रांनुसार, विमानात उड्डाणादरम्यान काही असामान्य आवाज ऐकू आले. एअरलाईनने प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल खेद व्यक्त केला आणि सांगितले की, त्यांना लवकरात लवकर लंडनला पोहोचवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. (वृत्तसंस्था)




# अमेरिकेच्या अटी अमान्य

**इराणने स्पष्ट केली भूमिका**

## ट्रम्प यांचा प्रस्ताव फसवणूक; होर्मुझवर तडजोड नाही

◆ **तेहरान, २६ मार्च**

अमेरिकेने मध्यस्थ राष्ट्रांमार्फत दिलेला प्रस्ताव ही एक प्रकारची फसवणूक आहे. त्यांच्या अटी वास्तवापासून पूर्णपणे अलिप्त आहे आणि केवळ दबाव टाकण्याच्या उद्देशाने तो आणला गेला आहे. आमच्या पाच अटी पूर्ण झाल्यावरच युद्ध संपुष्टात येईल आणि होर्मुझ जलमार्गावर कोणतीही तडजोड होणार नसल्याचे इराणी सरकारने स्पष्ट केले.

इराणच्या सरकारी प्रवक्त्याने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, जोपर्यंत आमच्या अटी मान्य केल्या जात नाहीत तोपर्यंत हल्ले सुरूच राहणार आहेत. अमेरिका वारंवार आपल्या अटी बदलत आहे, ट्रम्प यांच्यावर आमचा विश्वास राहिलेला नाही. होर्मुझवरील नियंत्रणासह आमच्या पाच अटी मान्य कराव्या त्यानंतरच पुढील चर्चा केली जाईल. अमेरिकेने मध्यस्थांमार्फत पाठविलेला प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत मान्य केला जाऊ शकत नाही. दुसरीकडे ट्रम्प यांनी इराणला इशारा देताना म्हटले की, मी त्यांना पाच दिवसांचा वेळ दिला आहे, दोन दिवस निघून गेले, त्यांनी प्रस्ताव स्वीकारण्यास नकार दिल्यास त्यांच्या वाट्याला विध्वंसाशिवाय काहीच येणार नाही. अमेरिकेच्या ताकदीला आव्हाने देण्याची किंमत त्यांना मोजावी लागेल. होर्मुझ हा आंतरराष्ट्रीय जलमार्ग असून इराणचा ताबा कदापि मान्य करता येणार नाही.

**हजारो जहाजे, खलाशी अडकले**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतील परिस्थिती गंभीर झाली असून, सुमारे २,००० जहाजे आणि २०,००० खलाशी तिथे अडकले आहेत. आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेच्या प्रमुखांनी सांगितले की, या परिस्थितीमुळे जागतिक सागरी वाहतुकीसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. दीर्घकाळ अडकून पडल्यामुळे खलाशांवरील मानसिक आणि शारीरिक ताण वाढत आहे. विमा कंपन्यादेखील नुकसानीचा धोका पत्करण्यास टाळाटाळ करत आहेत, यामुळे संकट अधिकच गडद होत आहे. (वृत्तसंस्था)

### इराणच्या पाच अटी

१. इराणवरील हल्ले पूर्णपणे थांबवणे
२. भविष्यात युद्ध पुन्हा होणार नाही याची ठोस हमी
३. संघर्षादरम्यान झालेल्या नुकसानीची भरपाई
४. सर्व आघाड्यांवरील शत्रुत्व पूर्णपणे थांबवणे
५. होर्मुझ जलमार्गावरील इराणच्या हक्कांना मान्यता देणे

### ट्रम्प यांची विरोधकांवर टीका

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी आपल्या राजकीय विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला आहे. ते म्हणाले की, कट्टर डावे आणि डेमोक्रॅट्स इराणमधील अमेरिका आणि इस्रायलच्या लष्करी कामगिरीला कमी लेखण्याचा प्रयत्न करत आहेत. या युद्धात अमेरिकेने एक मोठा विजय मिळवला आहे आणि जनता सत्य पाहत आहे.**

# बसची ट्रकला धडक; १४ जण जिवंत जळाले

**१५ प्रवासी गंभीर जखमी**

◆ **मार्कपुरम, २६ मार्च**

आंध्र प्रदेशातील मार्कपुरम जिल्ह्यात गुरुवारी सकाळी बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. यात १४ प्रवाशांचा जिवंत जळून दुर्दैवी मृत्यू झाला तर १५ जण गंभीर जखमी झाले. बस ट्रकला धडकताच दोन्ही वाहनांना आग लागली. पोलिस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना मार्कपुरम येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अनेक प्रवासी गंभीर जखमी असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

जगतीयालहून कालिगिरीकडे जाणारी बस गुरुवारी सकाळी ६.३० च्या सुमारास एका दगडखाणीजवळ खडीने भरलेल्या ट्रकला धडकली. अपघात होताच दोन्ही वाहनांना आग लागली. अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे ३५ प्रवासी होते. बसच्या मागील बाजूला बसलेले प्रवासी बाहेर पडू न शकल्याने त्यांचा मृत्यू झाला असावा, असे सांगण्यात येत आहे. मृत प्रवासी कनिगिरी भागातील रहिवासी असण्याची शक्यता आहे. मृत आणि जखमींमध्ये महिला आणि मुलांचा समावेश आहे. प्रत्यक्षदर्शींनुसार, आग लागल्यानंतर लगेचच सुमारे १० प्रवाशांनी बसमधून उडी मारली.

काही मृतदेह अजूनही बसमध्ये अडकलेले असण्याची शक्यता आहे. अपघातानंतर बसला आग लागल्याने प्रवाशांना बाहेर पडताच आले नाही. त्यामुळे त्यांचा जळून मृत्यू झाला.

**चौकशीचे निर्देश : मुख्यमंत्री नायडू**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी मार्कापुरम जिल्ह्यातील रायवरमजवळ झालेल्या रस्ते अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधून जखमींना सर्वोत्तम उपचार देण्याचे आणि घटनेच्या चौकशीचे निर्देश दिले. अपघातानंतर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. हेल्पलाईन क्रमांकही जारी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



आंध्र प्रदेशातील मार्कापुरम जिल्ह्यात झालेला भीषण बस अपघात अतिशय दुर्दैवी आहे. मृत प्रवाशांच्या कुटुंबीयांप्रति शोक व्यक्त करते. जखमींना लवकरात लवकर बरे व्हावे यासाठी सदिच्छा व्यक्त करते. या दुर्घटनेमुळे तीव्र दुःख झाले आहे.
- **द्रौपदी मुर्मू**, राष्ट्रपती

मार्कापुरम जिल्ह्यातील अपघात अत्यंत दुःखद आहे. शोकाकुल कुटुंबीयांप्रति माझ्या संवेदना आहेत. जखमी लवकर बरे व्हावेत अशी मी सदिच्छा व्यक्त करतो. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून (पीएमएनआरएफ) मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल.
- **नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

# बस नदीत कोसळली; २३ प्रवासी ठार

### बांगलादेशातील घटना, अनेक बेपत्ता

◆ **राजबारी, २६ मार्च**

बांगलादेशात पद्मा नदीत एक प्रवासी बस कोसळल्याने २३ जणांचा मृत्यू झाला तर अनेक बेपत्ता आहेत. ११ प्रवाशांनी पोहून आपले प्राण वाचवले. बसमध्ये सुमारे ४० प्रवासी होते. हा अपघात बुधवारी सायंकाळी ५.३० वाजता राजबारी जिल्ह्यातील दौलादिया टर्मिनलवर झाला. या घटनेमुळे घटनास्थळी गोंधळ उडाला.

प्राप्त माहितीनुसार, अपघातग्रस्त बस फेरीवर चढत होती. यादरम्यान चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट नदीत कोसळली. बांगलादेशमध्ये बस आणि गाड्यांना नदी पार करण्यासाठी फेरीचा वापर केला जातो. ही फेरी एक मोठी बोट किंवा जहाजासारखी असते.

**सहा तासानंतर नदीतून बाहेर काढली बस**

पोलिस निरीक्षक रसेल मोल्लाह यांनी बुधवारी सांगितले की, रात्र झाल्यामुळे बचावकार्य थांबविण्यात आले असून ते दिवसा पुन्हा सुरू केले जाईल. आम्ही आतापर्यंत २३ मृतदेह बाहेर काढले आहेत. काही लोक बेपत्ता असू शकतात. (वृत्तसंस्था)

## लग्न समारंभात २०० लोकांना विषबाधा

◆ **इछावर, २६ मार्च**

मध्य प्रदेशातील इछावर तालुक्यात बाबडिया नोआबाद गावामध्ये लग्न समारंभात सुमारे २०० लोकांना अन्नातून विषबाधा झाली. ही घटना बुधवारी रात्री समोर आली. बाधितांवर इछावर आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये दहशत पसरली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, नोआबाद गावात बुधवारी रात्री एका लग्न समारंभात १२०० हून अधिक लोकांनी जेवण केले. त्यापैकी २०० हून अधिक जणांना रात्री उशिरा पोटदुखी, उलट्या आणि जुलाबाचा त्रास होऊ लागला. त्यामुळे अनेकांनी रुग्णालयात धाव घेतली. अचानक मोठ्या संख्येने रुग्ण इछावर आरोग्य केंद्रात दाखल केले. (वृत्तसंस्था)



**महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावर गुरुवारी सागर सुरक्षा कवच या नावाने सागरी सुरक्षाविषयक सरावाचे आयोजन करण्यात आले होते. या सरावात सहभागी झालेले राष्ट्रीय सुरक्षा गार्डस्‌चे कमांडो**

## ...तर पेट्रोल पंप बंद करावे लागतील : अब्दुल्ला

◆ **श्रीनगर, २६ मार्च**

पेट्रोल पंपांवरील लांबच लांब रांगांवर जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी नाराजी व्यक्त केली. लोकांनी पंपाबाहेर गर्दी करणे थांबवावे, असे आवाहनही त्यांनी आहे. जर लोकांनी असे केले नाही, तर मला काही दिवसांसाठी सर्व पेट्रोल पंप बंद करावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला.

मुख्यमंत्री अब्दुल्ला पुढे म्हणाले, देशात आणि राज्यात डिझेल, पेट्रोल किंवा एलपीजी सिलेंडरची कोणतीही कमतरता नाही. कुठेही वापर कमी करण्याच्या सूचना जारी करण्यात आलेल्या नाहीत. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवून गोंधळलेले लोक रांगेत उभे आहेत. (वृत्तसंस्था)

## इन्फोसिस महिला अभियंत्याला चिरडले

◆ **इंदूर, २६ मार्च**

इंदूरमध्ये एका धक्कादायक घटना उघडकीस आली. पेंटहाऊस भाड्याने देण्याच्या वादातून तरुणाने इन्फोसिसच्या महिला अभियंत्याला कारने चिरडून ठार मारले. शंपा पाठक (पांडे) असे मृत महिलेचे नाव आहे. ही घटना बुधवारी रात्री १०.३० वाजता लसुदिया पोलिस ठाण्याच्या हद्दीत शिव वाटिका टाऊनशिपमध्ये घडली.

इन्फोसिसमध्ये सॉफ्टवेअर इंजिनीअर म्हणून कार्यरत शंपा पाठक १३ मार्चला पती व दोन मुलांसह शिव वाटिका टाऊनशिपमधील त्यांच्या फ्लॅटमध्ये शिफ्ट झाल्या होत्या. या टाऊनशिपमधील सागरश्री एन्क्लेव्ह इमारतीत कुलदीप चौधरी यांनी आपले पेंटहाऊस एअरबीएनबीला भाड्याने दिले होते. येथे दररोज नवीन लोक येत असत. यावरून रहिवाशांना आक्षेप होता. बुधवारी रात्री रहिवाशांनी त्यांच्या फ्लॅटची लाईट बंद केली होती. हे पाहून कुलदीप चौधरी खाली आले. त्यांनी रहिवाशांच्या फ्लॅटची लाईट बंद केली. यावरून त्यांच्यात हाणामारी झाली. यानंतर कुलदीप यांचा मुलगा मोहित चौधरी कार घेऊन आला. त्याने आधी तेथे राहणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला आणि नंतर शंपा पांडेला धडक दिली. यात गंभीर जखमी शंपा यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असता तिथे त्यांचा मृत्यू झाला. (वृत्तसंस्था)

# काँग्रेसचे खासदार आता भाजपाचे उमेदवार

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २६ मार्च**

आसाम विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला १५ दिवसांपेक्षाही कमी कालावधी उरला असतांना आसामच्या नागांव लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे खासदार प्रद्युत बारदोलोई यांनी राजीनामा देत भाजपामध्ये प्रवेश केला. बारदोलोई यांना भाजपाने दिसपूर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.






आसाम विधानसभा निवडणुकीची जबाबदारी काँग्रेसने गौरव गोगोई यांच्यावर टाकली आहे, तर वायनाडच्या खासदार प्रियांका वढेरा या काँग्रेसच्या छाननी समितीच्या अध्यक्ष होत्या. विशेष म्हणजे ज्या बारदोलोई यांनी भाजपाकडून विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी काँग्रेसच्या खासदारकीचा राजीनामा दिला ते आसाम विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसच्या घोषणापत्र समितीचे अध्यक्ष होते. बारदोलोई यांचा राजीनामा लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंगळवारी मंजूर केला आहे. विशेष म्हणजे भाजपमध्ये प्रवेश घेतल्यानंतर बारदोलोई यांना भाजपाने दिसपूर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

बारदोलोई यांच्या पाठोपाठ काँग्रेसचे उपाध्यक्ष नवज्योती तालुकदार यांनीही काँग्रेसचा राजीनामा दिल्यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. आधी आसाम प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष भूपेनकुमार बोरा यांनीही काँग्रेसचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला आहे. यामुळे काँग्रेसचे यामुळे दुहेरी नुकसान झाले, एकतर त्यांना आपला मोठा नेता गमवावा लागला, दुसरे म्हणजे लोकसभेतील त्यांचा एक खासदार कमी झाला, त्यामुळे लोकसभेच्या पोटनिवडणुकीला सामोरेजाण्याची वेळ पक्षावर आता येणार आहे. आसाममधील काँग्रेसच्या राजकारणात बारदोलोई यांचे मोठे स्थान होते, दोन वेळा ते लोकसभेवर निवडून आले होते, तर चारवेळा विधानसभेत. तरुण गोगोई यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी मंत्री म्हणून प्रदीर्घ काळ काम केले होते.

# बारदोलोई यांच्या मुलाने परत केली काँग्रेसची उमेदवारी

◆ **नवी दिल्ली, २६ मार्च**

आसामच्या लाहोरीघाट विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे विद्यमान आमदार आसिफ मोहम्मद नजर यांना पुन्हा उमेदवारी देण्यावर प्रद्युत बारदोलोई नाराज होते. बारदोलोई आणि यांच्या समर्थकांवर २०२६ मध्ये हल्ला झाला होता, हा हल्ला नजर यांचा समर्थक असलेल्या इमदादुल इस्लाम याने घडवून आणला होता, या प्रकरणात पोलिसांनी अटक करुन इस्लामवर आरोपपत्रही दाखल केले आहे.



प्रद्युत बारदोलोई यांनी १९९८ मध्ये मागरिट विधानसभा मतदारसंघातून पहिल्यांदा काँग्रेस उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत ते विजयी झाले होते. त्यानंतर सलग चार विधानसभा निवडणुका त्यांनी या मतदारसंघातून जिंकल्या. तरुण गोगोई यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी २००१ पासून २०१५ पर्यंत काम केले.

२०१९ मध्ये काँग्रेसने त्यांना नागांव लोकसभा मतदारसंघातून पहिल्यांदा उमेदवारी दिली आणि ते विजयी झाले. २०२४ मध्ये ते दुसऱ्यांदा या मतदारसंघातून निवडून आले.

१२६ सदस्यीय आसाम विधानसभेसाठी ९ एप्रिलला एका टप्प्यात निवडणूक होणार आहे. २०२१ मध्ये भाजपाने राज्यात ७६ जागा जिंकत सलग दुसऱ्यांदा विजय मिळवला होता. काँग्रेसला ४९ जागांवर समाधान मानावे लागले. एक जागा अन्याकडे केली होती. (तभा वृत्तसेवा)

# पहिल्या पूरक यादीत १३ लाख मतदार वगळले

## बंगालमध्ये आतापर्यंत ७६ लाख नावे हटविली



◆ **कोलकाता, २६ मार्च**

पश्चिम बंगालमध्ये विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) च्या पहिल्या पुरवणी यादीतून १३ लाख नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. यासह राज्यात आतापर्यंत ७६ लाख मतदारांची नावे वगळली आहे. अजूनही सुमारे २८ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत.

निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, 'अंडर ॲडज्युडिकेशन'मध्ये ठेवलेल्या सुमारे ६० लाख मतदारांपैकी ३२ लाख नावांची तपासणी झाली आहे. यापैकी सुमारे ४० टक्के मतदार यादीतून वगळण्यात आले आहेत. तर, अजूनही सुमारे २८ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत, ज्यांवर निर्णय होणे बाकी आहे. या प्रकरणांची सुनावणी राज्यात तैनात असलेले ७०५ न्यायिक अधिकारी करत आहेत. यापूर्वी डिसेंबरमध्ये एसआयआरच्या एन्युमरेशन टप्प्यात ५८ लाख नावे वगळण्यात आली होती. पश्चिम बंगालमध्ये एकूण मतदारांची संख्या ७.६६ कोटींवरून ७.०८ कोटींवर आली होती. २८ फेब्रुवारीला जारी केलेल्या मतदार यादीत ही संख्या घटून ७,०४,५९,२८४ (सुमारे ७.०४ कोटी) झाली. या यादीत ६० लाखांहून अधिक नावे अंडर ॲडज्युडिकेशनमध्ये ठेवण्यात आली होती. अंडर ॲडज्युडिकेशनमध्ये अशा मतदारांना ठेवण्यात आले होते, ज्यांच्या कागदपत्रांवर किंवा पात्रतेवर शंका होती. (वृत्तसंस्था)

### सोमवारी मध्यरात्री यादी जारी

**निवडणूक आयोगाने सोमवारी रात्री उशिरा न्यायप्रविष्ट मतदारांची पहिली पूरक यादी जारी केली होती. ज्यात सुमारे १० लाख नावे वेबसाईटवर अपलोड करण्यात आली. मात्र, या यादीत किती नावे वगळण्यात आली किंवा किती प्रकरणांचा निपटारा झाला, हे स्पष्ट करण्यात आले नाही.**

### दर शुक्रवारी जारी करणार नवीन पूरक यादी

**अधिकाऱ्यांच्या मते, ज्या प्रकरणांमध्ये ई-साईन प्रमाणीकरण पूर्ण होऊ शकले, फक्त तीच नावे यादीत समाविष्ट करण्यात आली. सुमारे २९ लाख प्रकरणांवर प्रक्रिया करण्यात आली होती, परंतु तांत्रिक कारणांमुळे सर्व नावे एकाच वेळी जारी करता आली नाहीत. उर्वरित नावे टप्प्याटप्प्याने जारी केली जात आहेत. आता दर शुक्रवारी नवीन पूरक यादी जारी केली जाईल. न्यायप्रविष्ट श्रेणीत त्या मतदारांना ठेवण्यात आले होते, ज्यांच्या कागदपत्रांवर किंवा पात्रतेवर शंका होती.**

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
हो आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



## विचारपुष्प



धर्माचा निर्णय मनुष्य स्वैरपणे घेऊ शकत नाही. धर्माचा निर्णय तर त्याच्या जन्मापूर्वीच झालेला असतो. इतकेच नव्हे तर मनुष्याला या संसारात हाच विचार करून व्यवहार करावा लागतो की, त्याचा जन्मच मुळात धर्माचे पालन करण्यासाठी झाला आहे. भविष्यातील जीवनाचे यश, कीर्ती, उपयुक्तता आणि महत्त्व हे केवळ धर्मानुसार आचरण करण्यावर अवलंबून असते.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

## महत्त्वाचे

### वांग्याच्या पिकात अफू

**बुलढाणा :** तालुक्यातील मेरा खुर्द येथे वांग्याच्या पिकात अफूची लागवड केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी गुन्हे शाखा आणि अंढेरा पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत मध्यरात्री सुमारे ९ लाख १८ हजार ३२० रुपयांचा अफू जप्त केला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक अविनाश जायभाये यांच्या फिर्यादीवरून कृष्णा वाघमारे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. २४ मार्चच्या मध्यरात्री गुन्हे शाखेचे पथक देऊळगाव राजा विभागात गस्त घालत असताना ही कारवाई केली.

# देशात ६० दिवसांचा तेलसाठा उपलब्ध

### केंद्र सरकारची माहिती, पेट्रोल, डिझेल, एलपीजीची कमतरता नाही

**नवी दिल्ली, २६ मार्च**

भारताचा पेट्रोलियम आणि एलपीजी पुरवठा पूर्णपणे सुरक्षित आणि नियंत्रणात आहे. भारताची एकूण साठवण क्षमता ७४ दिवसांची असून, सध्या ६० दिवसांचा तेलसाठा उपलब्ध आहे. पेट्रोल, डिझेल, एलपीजीची कमतरता नाही, त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, अशी माहिती गुरुवारी पेट्रोलियम मंत्रालयाने निवेदनातून दिली.

देशात सध्या ६० दिवसांचा तेलसाठा उपलब्ध आहे. यामध्ये कच्चे तेल, पेट्रोलियम उत्पादने आणि भूमिगत सामरिक साठवण (कंटेनर) यांचा समावेश आहे. देशात कुठेही पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीचा तुटवडा नाही. जागतिक परिस्थिती कशीही असली तरी, प्रत्येक भारतीयासाठी अंदाजे दोन महिन्यांचा अखंड पुरवठा उपलब्ध आहे. तसेच, पुढील दोन महिन्यांसाठी कच्च्या तेलाची खरेदी आधीच निश्चित करण्यात आली आहे. भारतात कोणत्याही आपत्कालीन उपाययोजनांची आवश्यकता नाही. सरकारने पेट्रोल पंप मालकांची क्रेडिट मर्यादा एका दिवसावरून तीन दिवसांपर्यंत वाढवून त्यांना दिलासा दिला, जेणेकरून खेळत्या भांडवलाच्या अभावामुळे कोणत्याही पंपाला इंधनाच्या तुटवड्याचा सामना करावा लागणार नाही. सध्या ४१ देशांकडून तेलाचा पुरवठा सुरू असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)



### एलपीजीचा पुरवठा सुरक्षित

**एलपीजी तुटवड्याचे वृत्त निराधार आहे. देशांतर्गत उत्पादन ४० टक्क्यांनी वाढवून दररोज ५०,००० मेट्रीक टन पर्यंत पोहोचले, जे एकूण गरजेच्या ६० टक्क्यापेक्षा जास्त आहे. दैनंदिन आयातीची गरज आता ३० मेट्रीक टन पर्यंत कमी झाली. अमेरिका, रशिया आणि ऑस्ट्रेलियासह अनेक देशांकडून ८०० मेट्रीक टन एलपीजी भारतात येत आहे. सध्या देशाकडे एका महिन्याचा एलपीजीचा पुरवठा आहे. तेल कंपन्या दररोज ५० लाखांहून अधिक सिलेंडरचा पुरवठा करत आहेत.**

# भारतासाठी होर्मुझ सामुद्रधुनी खुली

**तेहरान, २६ मार्च**

अमेरिका-इस्रायलविरुद्ध इराण संघर्ष सुरु झाल्यापासून बंद करण्यात आलेली होर्मुझ सामुद्रधुनी भारतासह रशिया, चीन, इराक आणि पाकिस्तानसाठी खुली करण्यात आली. शत्रूला मदत करणाऱ्या कोणत्याही देशांच्या जहाजांना या मार्गातून प्रवेश दिला जाणार नाही, अशी माहिती इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी गुरुवारी संसदेत दिली.

होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर शुल्क आकारण्यासाठी अराघची यांनी इराणच्या संसदेत गुरुवारी विधेयक सादर केले.

यावेळी त्यांनी सांगितले, हार्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केलेली नाही. भारतासह पाच देश मित्र देशांच्या जहाजांना या भागातून सुरक्षित प्रवेश देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. या देशांनी इराणशी संपर्क करून जहाजांना हार्मुझमधून सुरक्षित मार्ग देण्याची मागणी केली होती. त्यानंतर समन्वय साधून त्यांना परवानगी देण्यात आली. (वृत्तसंस्था)



नागपुरातील पोद्दारेश्वर श्री राम मंदिराच्या शोभायात्रेवेळी श्री राम रथासमोर उपस्थित डावीकडून नीता ठाकरे, प्रा. अनिल सोले, दयाशंकर तिवारी, नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, अजय संचेती, रमेश बंग

# अयोध्यानगरी रामभक्तांनी फुलली

**अयोध्या, २६ मार्च**


देशभरात रामजन्मोत्सव अर्थात् रामनवमीचा उत्सव साजरा होत असताना अयोध्येतील श्री राम जन्मभूमी मंदिरात रामलल्लांचे दर्शन घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने भाविकांची गर्दी जमली. श्री राम जन्मभूमी मंदिर संकुलातील सूर्य मंदिरात गुरुवारी रीतसर रामनवमी कार्यक्रमाचा शुभारंभ सूर्य मंदिरात ध्वजारोहणाने झाला, तर तिथीनुसार रामनवमीचा मुख्य कार्यक्रम शुक्रवार २७ मार्च, रोजी होणार आहे. दुपारी १२ वाजता रामललाचा सूर्य टिळा सोहळा होणार आहे.

श्री राम मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या डावीकडे, तटबंदीच्या नैऋत्य कोपऱ्यात असलेल्या सूर्य मंदिरात ध्वजारोहण समारंभाने गुरुवारी रामनवमी सोहळ्यास सुरुवात झाली. एकोणीस फूट उंच आणि नऊ फूट रुंद असलेला ध्वज सूर्य मंदिरावर लावण्यात आला. सोहळ्याला बावनजी मंदिराचे महंत वैदेही वल्लभ शरण जी महाराज, दशरथ महालाचे महंत देवेंद्र प्रसादाचार्य जी महाराज, महंत रामचरंददास जी रंग महाल, अश्रफी भवनचे जगद्गुरू रामानुजाचार्य श्रीधराचार्य जी महाराज, स्वामी गोविंद देव गिरी महाराज आदी उपस्थित होते. यावेळी रामजन्मभूमी मंदिराचा संपूर्ण परिसर श्रीरामाच्या जयघोषाने निनादला. शुक्रवारी अयोध्येतील राम मंदिरात रामनवमी साजरी केली जाईल. दुपारी ठीक १२ वाजता रामललाचा सूर्य टिळा सोहळा होणार आहे. (वृत्तसंस्था)

# डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन

**कोल्हापूर, २६ मार्च**

ज्येष्ठ इतिहास संशोधक, लेखक आणि कोल्हापूरच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील आधारस्तंभ डॉ. जयसिंगराव पवार यांचे वयाच्या ८५ वर्षी कोल्हापूर येथे गुरुवारी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. छत्रपती शिवाजी महाराज, महाराणी ताराबाई व राजर्षी शाहू महाराज यांच्या इतिहासाचा दांडगा व्यासंग असणारे ते एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व होते.



डॉ. जयसिंगराव पवार यांनी केवळ इतिहास लिहिला नाही तर तो पुराव्यांच्या आधारे आणि पुरोगामी दृष्टिकोनातून समाजासमोर मांडण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. त्यांचे महाराणी ताराबाई आणि राजर्षी शाहू छत्रपती या विषयांवरील ग्रंथ ऐतिहासिक संदर्भांसाठी आजही मैलाचे दगड मानले जातात.

कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाशी त्यांचे जवळचे नाते होते. त्यांनी अनेक पिढ्यांना इतिहास संशोधनाचे बाळकडू दिले. एक प्रखर विचारवंत म्हणून त्यांनी नेहमीच सत्यशोधकी विचारांचा आणि सामाजिक समतेचा पुरस्कार केला. अनेक ऐतिहासिक मालिका आणि चित्रपटांसाठी त्यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले. (वृत्तसंस्था)

### मिळालेले पुरस्कार

- जिजामाता विद्वत्त गौरव पुरस्कार, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार, कोल्हापूर भूषण पुरस्कार,
- मालोजी राजे निंबाळकर पुरस्कार, फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार, वीर बाजी पासलकर पुरस्कार
- सेनापती प्रतापराव गुजर पुरस्कार, गुरुवर्य शामराव देसाई पुरस्कार, आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार
- सत्यशोधक दिनकरराव जवळकर पुरस्कार

**तत्त्वनिष्ठ, व्यासंगी इतिहास संशोधन हरपला**
(शेवटच्या पानावर)

# गणेश भक्तीचा 'अनमोल ठेवा' आता पुस्तकरूपात

### वाशिंबा येथे झाला प्रकाशन सोहळा

**अकोला, २६ मार्च**

एखाद्या व्यक्तीचा छंद जेव्हा भव्य संग्रहालयाचे रूप घेतो, तेव्हा तो केवळ संग्रह उरत नाही, तर ऐतिहासिक ठेवा ठरतो. प्रदीप नंद यांच्या अशाच एका विलक्षण स्वप्नपूर्तीवर आधारित प्रदीप नंद उर्फ गोट्याचा 'गणपती संग्रह' आणि 'सातबारा' या डॉ. माधव देशमुख लिखित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर वाशिंबा येथील नंद उद्यान येथे संपन्न झाला.

या सोहळ्याला माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया आणि विप्लव बाजोरिया यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी शिरूर शुगर कारखाना (हिंगोली) व सुभाष शुगरचे (नांदेड) चेअरमन सुभाष देशमुख होते. ग्रंथाचे प्रकाशन विद्यावाचस्पती स्वानंद पुंड (वणी) यांच्या हस्ते करण्यात आले.



पुस्तक प्रकाशनप्रसंगी उपस्थित प्रा. स्वानंद पुंड, प्रदीप नंद, डॉ. माधव देशमुख, इंद्राणी देशमुख व मान्यवर

या सोहळ्याला नागपूर गार्डन क्लबच्या अध्यक्ष अनुजा परचुरे, श्रीकांत पागृत, शेखर ठाकरे यांची विशेष उपस्थिती होती. सोबतच संजय राठोड दाम्पत्य, श्रीराम देशमुख, अपर्णा देशमुख, विहाना देशमुख, अंकिता देशमुख, राज देशमुख, मकरंद जोशी, ओवी जोशी, प्रदीप पांडे, अरुणा पांडे, अनुराधा काळे, मेघा नंद, ज्योती नंद, राज जोशी, दीप्ती जोशी, संजय शहा, माधव निलाखे, किशोर मांगटे पाटील, डॉ. किशोर देशपांडे, अनिरुद्ध खरे, महेश मोडक, मोहिनी मोडक, सुभाष गोरे, सुभाष मुंगी, पठाण, संग्राम राजूरकर, धनंजय तायडे, आनंद धूत, रवी रामी धमी यांसह वाशिंबा येथील सांप्रदायिक भजन मंडळी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय 'ग्रंथदिंडीने' करण्यात आली. लेखक डॉ. माधव देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकातून या स्वप्नपूर्ती प्रवासावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन नंदकिशोर डंबाळे यांनी, तर आभार दीपाली नंद यांनी मानले. (तभा वृत्तसेवा)

### भंडारा शासकीय विश्रामगृहातील व्हीआयपी सूटमध्ये आग

**भंडारा, २६ मार्च**

येथील शासकीय विश्रामगृहातील व्हीआयपी सूटमध्ये आग लागल्याची घटना आज, गुरुवारी घडली. यात भंडाऱ्याचे खा. प्रशांत पडोळे थोडक्यात बचावले.

स्थानिक विश्रामगृहातील व्हीआयपी सूटमध्ये अचानक आगीचा भडका उडाला. ज्यावेळी आग लागली त्यावेळी खासदार प्रशांत पडोळे तेथेच बसले होते. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे निष्पन्न झाले. आगीमुळे व्हआयपी सूटमध्ये धुराचे लोळ पसरले होते. प्रसंगावधान राखत खासदार पडोळे आणि त्यांच्या स्वीय सहायकाने तातडीने फायर एक्स्टिंग्विशरच्या मदतीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर स्थानिक नागरिक व अग्निशमन दलाच्या प्रयत्नामुळे आग आटोक्यात आली. (तभा वृत्तसेवा)

# कळंब येथील संस्थेला कारणे दाखवा नोटीस

**यवतमाळ आश्रमशाळा विद्यार्थिनी मृत्यू प्रकरण**

**मुंबई, २६ मार्च**

यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथील जीवनदीप अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या दुर्दैवी मृत्यू प्रकरणी राज्य सरकारने कठोर पाऊल उचलले आहे. संबंधित आश्रमशाळा संस्थेच्या कारभारात गंभीर त्रुटी आणि निष्काळजीपणा आढळल्याने, त्यांची मान्यता का रद्द करू नये, अशी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी विधान परिषदेत निवेदनाद्वारे ही माहिती दिली आहे.

ऑगस्ट २०२५ मध्ये कु. दिपाली कोमटी या विद्यार्थिनीचा यवतमाळच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर आयुक्त, आदिवासी विकास (अमरावती) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. समितीने सादर केलेल्या अहवालात शाळेच्या प्रशासनाकडून विद्यार्थिनीच्या उपचाराबाबत अक्षम्य निष्काळजीपणा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत आणि देखभालीबाबत अनेक गंभीर त्रुटी असल्याचे समोर आले आहे. त्यामुळेच संस्थेला नोटीस बजावण्यात आली असून, शाळेवर तात्काळ प्रशासक नेमण्याचे आदेश देण्यात आले आहेत," असे मंत्री डॉ. उईके यांनी स्पष्ट केले.

पीडित विद्यार्थिनीच्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करत, शासनाच्या वतीने त्यांना २ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात आले असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. या प्रकरणाची पुढील सखोल चौकशी करून दोषींवर अधिक कठोर कारवाई केली जाईल, असा विश्वासही मंत्र्यांनी सभागृहात व्यक्त केला. या निर्णयामुळे आदिवासी विकास विभागांतर्गत चालवल्या जाणाऱ्या आश्रमशाळांच्या व्यवस्थापनात शिस्त आणि उत्तरदायित्व निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. (तभा वृत्तसेवा)

# खरातनंतर झिरवळ व्हिडीओ प्रकरणाने राज्यात खळबळ

**मुंबई :** राज्यात अशोक खरात प्रकरण गाजत असताना आता अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कथित व्हिडिओ प्रकरणामुळे राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे.



सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडिओुळे मोठी खळबळ उडाली असून, विरोधकांनी झिरवळ यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा कथित व्हिडिओ शासकीय निवासस्थानातील असल्याचा दावा केला जात आहे. व्हिडिओध्ये झिरवळ यांच्यासोबत तृतीयपंथी व्यक्ती दिसत असल्याचे सांगितले जात असून या प्रकरणामुळे झिरवळ यांचे राजकीय भवितव्य पणाला लागले आहे. कार्यालयातील लाच प्रकरणातून नुकतेच कसेबसे सुटलेले झिरवळ पुन्हा नव्या वादात अडकले असून, यावेळी प्रकरण भोवण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकरणात व्हिडिओ कोणी रेकॉर्ड केला, कोणी प्रसारीत केला, संबंधित व्यक्तीकडूनच हा व्हिडिओ रेकॉर्ड करून व्हायरल केला आहे का, यामागे खंडणीचा उद्देश किंवा अन्य काही विषय आहे.

# तत्त्वनिष्ठ, व्यासंगी इतिहास संशोधक हरपला : मुख्यमंत्री

**मुंबई, २६ मार्च**

ज्यांच्या व्यासंग आणि संशोधनपूर्ण मांडणीमुळे नव्या पिढीसाठी शिव-शाहू चरित्रांचा अमुल्य असा ठेवा उपलब्ध झाला. अशा डॉ जयसिंगराव पवार यांच्या निधनामुळे आपण इतिहास संशोधन क्षेत्रातील तत्वनिष्ठ, व्यासंगी मार्गदर्शकाला मुकलो आहोत, अशी शोकमग्न भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



### डॉ. जयसिंगराव पवार यांना मान्यवरांची श्रद्धांजली

डॉ. पवार यांनी इतिहास संशोधन आणि अभ्यासाला वाहून घेतले होते. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या चरित्रांचा अनेक अंगांनी वेध घेणारी मांडणी त्यांनी केली. विशेषतः शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राच्या माध्यमातून त्यांनी इतिहास लेखन, संशोधन-प्रकल्पांना चालना दिली. त्यामुळेच शिवचरित्रासह, छत्रपती संभाजी महाराज, जिजाऊ माँसाहेब ते महाराणी ताराराणी आणि राजर्षी छत्रपती शाहू यांच्याविषयी विपुल संदर्भ साहित्याची निर्मिती झाली. डॉ. पवार यांच्या पुढाकारामुळे राजर्षी शाहू छत्रपती यांचे कार्य इंग्रजीसह, अन्य विदेशी तसेच भारतीय भाषांमध्ये पोहोचले. यातून निर्माण झालेली ग्रंथसंपदा ही महाराष्ट्रासाठी संचित ठरणारे आहे. डॉ पवार यांच्या निधनामुळे इतिहास संशोधन क्षेत्रातील व्यासंगी मार्गदर्शक हरपला आहे. ही महाराष्ट्राची मोठी हानी आहे. त्यांच्या निधनाने पवार तसेच त्यांच्या संशोधक विद्यार्थी परिवारावर दुःखाचा आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे नमूद करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ जयसिंगराव पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



### शाहू विचारांचा इतिहासकार हरपला : उपमुख्यमंत्री पवार

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद असून महाराष्ट्रासाठी ही मोठी हानी आहे. मराठेशाहीचा खरा इतिहास जगासमोर आणणारा शाहू विचारांचा इतिहासकार हरपला, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी शोक व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. छत्रपती संभाजी महाराज, महाराणी ताराराणी, छत्रपती राजाराम महाराज, संताजी-धनाजी, राजर्षी शाहू महाराज, रामचंद्र पंत अमात्य ते क्रांतिसिंह नाना पाटील यांसारख्या इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचा सखोल अभ्यास करून डॉ. जयसिंगराव पवार यांनी वस्तुनिष्ठ आणि दस्तऐवजांवर आधारित इतिहास लेखन केले. मराठेशाहीतील इतिहासावरील गैरसमज दूर करून वास्तववादी इतिहास समाजासमोर मांडण्याचे त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे, असे सुनेत्रा पवार यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.



### व्यासंगी संशोधक हरपलाः उपमुख्यमंत्री शिंदे

महाराष्ट्राच्या इतिहास संशोधन क्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनाने शिवचरित्र आणि मराठा इतिहासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणारा एक व्यासंगी संशोधक हरपल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.



महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचा अभ्यास आणि प्रसार करण्यासाठी आयुष्य वेचणारे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनाने राज्याच्या वैचारिक विश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याने इतिहास संशोधनातील एक दीपस्तंभ हरपल्याचे दुःख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले आहे. (तभा वृत्तसेवा)

### डॉ. जयसिंगराव पवार यांचे कार्य प्रेरणादायी : गडकरी

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनाचे वृत्त दुःखद आहे. त्यांच्यासारखा व्यासंगी संशोधक जाणे देशाच्या संशोधन क्षेत्राची मोठी हानी आहे. आपल्या साहित्यातून केवळ इतिहास मांडण्याचे नव्हे, तर तो जीवंत ठेवण्याचे कार्य त्यांनी केले. राज्याच्या आणि देशाच्या इतिहासातील अनेक थोर, पराक्रमी व्यक्तिमत्त्वांचा आपल्या लेखणीतून त्यांनी घेतलेला वेध पुढील अनेक पिढ्यांसाठी, अभ्यासकांसाठी पथदर्शक आणि प्रेरणादायी ठरणारा आहे, अशा शब्दात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली वाहिली.



# शेतरस्त्यावर अतिक्रमण पडणार महागात!

**मुंबई, २६ मार्च**

शेतरस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या किंवा रस्त्यांचे नुकसान करणाऱ्या शेतकऱ्यांचे आधार कार्ड व फार्मर आयडी तब्बल पाच वर्षांसाठी ब्लॉक करणे, तसेच संबंधित शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ आणि कोणतीही शासकीय मदत मिळणार नाही, अशी स्पष्ट तरतूद करणारा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यामुळे आता शेतरस्त्यावर अतिक्रमण पडणार महागात पडणार आहे. राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीमालाची वाहतूक सुलभ करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना संदर्भात महसूल व वन विभागाने महत्त्वपूर्ण शासन शुद्धीपत्रक जारी केले आहे. या शुद्धीपत्रकात शेतरस्त्यांवरील अतिक्रमणाबाबत कठोर निर्णय घेण्यात आला असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, गाव नकाशावर दर्शविण्यात आलेल्या आणि शासकीय जागेतील रस्त्यांवर अतिक्रमण आढळल्यास संबंधित व्यक्तीस तहसीलदारांकडून सात दिवसांत अतिक्रमण हटविण्याची नोटीस दिली जाईल. दिलेल्या मुदतीत अतिक्रमण काढले नाही, तर प्रशासनाकडून ते हटविण्यात येईल. तसेच ज्या रस्त्यांवर इतर शेतकऱ्यांना ये-जा करण्याचा हक्क आहे, त्या ठिकाणी कोणत्याही शेतकऱ्याला पीक लागवड करता येणार नाही, असेही नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीत पाच शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा अधिकार संबंधित आमदारांना देण्यात आला आहे. कंत्राटदारांच्या निवडीसाठी पारदर्शक पद्धती अवलंबली जाणार असून पात्र कंत्राटदारांचे पॅनेल तयार केले जाईल. एकापेक्षा अधिक कंत्राटदारांना समान प्रमाणात काम वाटप करता येईल. कामाच्या रकमेच्या दोन टक्के किंवा किमान १५ लाख रुपयांची सुरक्षा ठेव अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच आवश्यक यंत्रसामग्री कंत्राटदाराच्या स्वतःच्या मालकीची असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# राजकारण आणि राष्ट्रकारण

संसदीय लोकशाहीत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष ही एकाच रथाची दोन चाके असतात. ही दोन चाके एकाच दिशने जात असतील तर संसदीय लोकशाहीचा रथ सुरळीतपणे धावू शकेल. पण या रथाचे एक चाक एकीकडे तर दुसरे दुसऱ्या दिशेने जात असेल तर लोकशाहीचा खेळखंडोबा झाल्याशिवाय राहणार नाही. लोकशाहीत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांनी समन्वयाने आणि सामंजस्याने काम करणे अभिप्रेत आहे. हे दोघेही एक-दुसऱ्याला पूरक असले पाहिजेत. मात्र, गेल्या काही वर्षांपासून विरोधी पक्षाने ताळतंत्र सोडल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. कोणतीही नैसर्गिक आपत्ती असो की राष्ट्रीय संकट, सरकारच्या मदतीला धावून जाणे हे विरोधी पक्षांचे कर्तव्य आहे. कोणत्याही संकटाचा सामना सरकार आणि विरोधी पक्ष यांनी एकदिलाने आणि एकजूटपणे करायला हवा.

गेल्या जवळपास एक महिन्यापासून इस्रायल आणि अमेरिका एकीकडे तर इराण दुसरीकडे असे युद्ध सुरू झाले आहे. तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने या संघर्षाची वाटचाल होईल का, अशी भीती निर्माण झाली होती. सुदैवाने ती शक्यता आता कमी दिसते आहे. हे युद्ध तीन देशांत लढले जात असले तरी त्याच्या झळा जगातील सर्वच देशांना बसत आहेत. त्याला भारताचाही अपवाद कसा राहणार?

या युद्धाचा पहिला आणि अतिशय गंभीर असा फटका जगातील ऊर्जा पुरवठ्याच्या साखळीला बसला आहे. पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाचा गॅस याचा पुरवठा प्रभावित झाला आहे. काही शहरांत एलपीजी सिलेंडरसह पेट्रोल आणि डिझेलसाठी लांबच लांब रांगा लागल्या आहेत. संसदेत याचे पडसाद उमटणे स्वाभाविक होते. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी या मुद्यावरून दोन्ही सभागृहांत गदारोळ झाला. त्यामुळे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करावे लागले. या मुद्यावरून संसदेच्या दोन्ही सभागृहांत चर्चा करण्याची आणि सरकारने निवेदन करण्याची विरोधी पक्षांची मागणी होती. इकडे देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू राहावा, तसेच स्वयंपाकाच्या गॅसचा म्हणजे एलपीजी सिलेंडरचा तुटवडा निर्माण होऊ नये म्हणून सरकार पहिल्या दिवसापासूनच युद्धपातळीवर कामाला लागले आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी तसेच परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी संसदेत निवेदन केले. मात्र, त्यावर विरोधी पक्षांचे समाधान झाले नाही. संकटाचे गांभीर्य लक्षात घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत याच आठवड्यात निवेदन करीत या युद्धाबाबत भारताची भूमिका सविस्तर विशद केली. पण विरोधी पक्षांनी विचित्र भूमिका घेतली. संसदेत या मुद्यावर चर्चा घडवण्याच्या मागणीवर विरोधी पक्ष अडले होते. लोकसभेत या मुद्यावर नियम १९३ नुसार, तर राज्यसभेत १७६ नुसार विरोधी पक्षांना चर्चा हवी होती. या विषयावर संसदेत चर्चा झाली असती तरी विरोधी पक्षांनी सरकारवर टीकेची झोड उठविण्याशिवाय काय केले असते, याचे उत्तर कुणाकडेच नसणार हे नक्की. किमान अशा संकटाच्या वेळी तरी प्रगल्भता दाखविली गेली पाहिजे.

या मुद्यावर सभागृहात चर्चा झाली नसली तरी राष्ट्रीय संकटाच्या या परिस्थितीत देशातील लोकांना दिलासा देण्यासाठी, त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी जे निर्णय घेणे सरकारने अपेक्षित होते, ते सरकारने घेतले आहेत. त्यामुळेच या युद्धाचे अपेक्षेपेक्षा कमी चटके देशातील लोकांना बसले, याचे श्रेय मोदी सरकारच्या धोरणी आणि दूरदृष्टीच्या भूमिकेत आहे. जागतिक संकटाच्या या परिस्थितीत भारताने जशी भूमिका घेणे अपेक्षित होते, तशीच भूमिका या युद्धाबाबत भारताने घेतली आहे. बुधवारी या मुद्यावर सर्वपक्षीय बैठक बोलावून सरकारने विरोधी पक्षांच्या सर्व आक्षेपांचे निराकरण करत आपली भूमिका ठामपणे मांडली. तृणमूल काँग्रेस वगळता अन्य सर्व विरोधी पक्ष या बैठकीला उपस्थित होते. काही अडचणींमुळे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी या बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत. पण, काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.

राजकीय मतभेद बाजूला ठेवत तृणमूल काँग्रेसनेही सर्वपक्षीय बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक होते. पण राष्ट्रहित आणि राजकारण यांची त्या पक्षाने गल्लत केली, असे दिसते. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपा हा तृणमूल काँग्रेसचा मुख्य प्रतिस्पर्धी आहे. त्या निवडणुकीतील वड्याचे तेल वांग्यावर काढण्याची तृणमूल काँग्रेसला गरज नव्हती. पण पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांना कोण सांगणार? देशहिताच्या मुद्यावर आयोजित या सर्वपक्षीय बैठकीत राजकारण आणत त्यांनी आपल्या मनाचा कोतेपणा देशाला दाखवून दिला. राजकारण आणि राष्ट्रकारण यांची गल्लत विरोधी पक्षांनी आणि सत्ताधाऱ्यांनीही कधीच करू नये. कालांतराने ती त्यांच्याच मुळावर आल्याशिवाय राहत नाही. राजकारण करण्यासाठी अनेक मुद्दे आहेत. निवडणुका होतच असतात आणि त्यात राजकारण होतच असते. या युद्धाबाबतच्या सर्व पैलूंची तसेच जनतेला या संकटाचा त्रास होऊ नये म्हणून सरकारने केलेल्या आणि करीत असलेल्या सर्व उपाययोजनांची माहिती या बैठकीत सरकारतर्फे देण्यात आली. त्यावर समाधान व्यक्त करत विरोधी पक्षांनी सरकारच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची भूमिका घेतली, याबद्दल विरोधी पक्षांचेही अभिनंदन केले पाहिजे. देशांतर्गत मुद्यावर सरकार आणि विरोधी पक्ष यांची भूमिका पांडव आणि कौरवासारखी असली तरी राष्ट्रीय संकटाच्या कोणत्याही परिस्थितीत ती शंभर अधिक पाच एकशे पाच व्हायला हवी. काही अपवाद वगळता तेवढे शहाणपण देशातील विरोधी पक्षांनी दाखवले, हे देशवासीयांचे सुदैव म्हटले पाहिजे. कोणतेही युद्ध हे मानवतेविरुद्ध असते. त्यात निर्दोष आणि निपराध व्यक्तींचाच, विशेषत: महिला आणि लहान मुलांचा बळी जात असतो. त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर थांबले पाहिजे, ही भूमिका पंतप्रधान मोदी यांनी वेळोवेळी मांडली आहे. या मुद्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी पंतप्रधान मोदी बोलले आहेत. मुळात कोणत्याही युद्धात कोणीच निर्विवादपणे जिंकत नसतो, नुकसान दोन्ही बाजूंचे होत असते. फक्त कोणाचे नुकसान कमी तर कोणाचे जास्त एवढाच काय तो फरक असतो. जिंकणाऱ्यास विजयाचा निखळ आनंद मिळत नाही. कोणत्याही युद्धाचा परिणाम हा दीर्घकाळ होत असतो. युद्ध संपल्यावरही त्याच्या झळा जाणवत असतात. भारत हा स्वतंत्र आणि सार्वभौम असा देश आहे. तो कोणत्याही एका देशाची बाजू घेऊ शकत नाही. भारताला अमेरिका आणि इस्रायल जेवढे जवळचे आहेत, तेवढाच इराणही जवळचा आहे. भारताचे जसे अमेरिका आणि इस्रायलसोबत व्यापारी संबंध आहेत, तसेच ते इराणशीही आहेत.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आखाती देशांत एक कोटी भारतीय वास्तव्याला आहेत. या भारतीयांची सुरक्षा हा भारताच्या चिंतेचा सर्वांत मोठा विषय आहे. यातील तीन लाख लोकांना भारताने आतापर्यंत सुखरूप परत आणले आहे. त्यामुळे शांततपूर्ण चर्चा आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून चर्चा करीत हा संघर्ष थांबवण्याच्या आपल्या भूमिकेचा भारताने पुनरुच्चार केला आहे. राष्ट्रीय संकटाच्या या परिस्थितीत सर्वांनी एकजूट होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे विरोधी पक्षांनी आपले राजकीय मतभेद बाजूला ठेवत सरकारच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले पाहिजे. एकजूट होऊनच आपण अशा जागतिक संकटाचा सामना करू शकतो, त्याच्या परिणामांची तीव्रता कमी करू शकतो. तृणमूलचा अपवाद वगळता इतर विरोधी पक्षांनी जी भूमिका घेतली, ती त्यामुळेच स्वागतार्ह ठरते. शेवटी राष्ट्र सुरक्षित असेल तर राजकारण होऊ शकेल आणि राष्ट्र सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वांनी अशा प्रसंगी राजकारण बाजूला ठेवून राष्ट्रकारणच केले पाहिजे.

---

## अर्थविशेष

हितेश पारसे

# जमीन विकास करार : करदायित्व समजून घेताना होणाऱ्या चुका आणि त्यावरील उपाय

अलिकडच्या काळात जमीन विकास करार (जॉईंट डेव्हलपमेंट ॲग्रिमेंट : जेडीए) या प्रकारातील व्यवहारांवर आयकर विभागाने विशेष लक्ष केंद्रित केलेले दिसून येते. काही वर्षांपूर्वी अशा करारात सहभागी झालेल्या अनेक जमीनमालकांना आज अचानक नोटीस प्राप्त होत आहेत. या घडामोडींचे मुख्य कारण कर टाळण्याचा हेतू नसून, कर कायद्यांबाबत असलेली अपुरी माहिती आणि चुकीचे आकलन हे आहे. जमीनमालकांमध्ये एक सर्वसाधारण समज आढळतो की, ''जमीन विकलेली नाही, फक्त विकासासाठी दिली आहे, त्यामुळे कर लागू होणार नाही.'' परंतु आयकर कायद्याच्या दृष्टीने हा दृष्टिकोन योग्य नाही. जेडीए हा व्यवहार केवळ विकासापुरता मर्यादित नसून त्यामध्ये जमिनीवरील विकास हक्कांचे हस्तांतरण (ट्रान्स्फर ऑफ डेव्हलपमेंट राईट्स) समाविष्ट असते, जे करपात्र घटक मानले जाऊ शकते.

**मोबदल्याचे स्वरूप आणि कर परिणाम** : जेडीएमध्ये जमीनमालकाला मिळणारा मोबदला विविध स्वरूपात असू शकतो रोख रक्कम, फ्लॅट्स/दुकाने किंवा दोन्हींचा संमिश्र प्रकार. अनेक जमीनमालक असा समज करतात की कर फक्त रोख रक्कम मिळाल्यावरच लागू होतो. मात्र, कराचा संबंध मोबदल्याच्या स्वरूपाशी नसून त्या व्यवहाराच्या स्वरूपाशी आणि त्यातील हक्कांच्या हस्तांतरणाशी असतो.

उदाहरणार्थ, जर जमीनमालकाला बांधकाम पूर्ण झाल्यानंतर फ्लॅट्स मिळणार असतील, तरीही तो मोबदला मानला जातो आणि त्यावर कर लागू होऊ शकतो. त्यामुळे ''पैसे मिळाले नाहीत म्हणून कर नाही'' हा समज चुकीचा आहे.

**कलम ४५(५ ए ) योग्य समज आवश्यक** : आयकर कायद्यातील कलम ४५(५ ए ) हे विशेषतः जेडीए संदर्भात लागू होते, परंतु त्याबाबत मोठ्या प्रमाणात गैरसमज आढळतात. हे कलम सर्व जेडीएवर लागू होत नाही.


हे कलम लागू होण्यासाठी खालील अटी पूर्ण होणे आवश्यक आहे :

जमीनमालक हा इंडिविज्युअल किंवा एचयूएफ असावा.

मोबदल्यात रोख रक्कम आणि बांधकामाचा हिस्सा दोन्ही असावेत.

जर मोबदला पूर्णपणे फ्लॅट्समध्ये किंवा पूर्णपणे रोख स्वरूपात असेल, तर या कलमाचा लाभ मिळत नाही. अशा वेळी कराची गणना आणि वर्ष निश्चिती सामान्य नियमांनुसार करावी लागते.

**कर लागू होण्याचे वर्ष निर्णायक घटक** : जेडीएमधील सर्वांत जास्त गोंधळ कर लागू होण्याच्या वर्षाबाबत दिसून येतो. अनेक वेळा जमीनमालक



चुकीच्या वर्षात उत्पन्न दाखवतात किंवा कर पुढे ढकलतात.

कलम ४५ (५ ए ) लागू असल्यास, कर कम्प्लिशन सर्टिफिकेट (सीसी) किंवा ऑक्युपन्सी सर्टिफिकेट (ओसी) मिळालेल्या वर्षात लागतो अन्य प्रकरणांमध्ये, करारातील अटी आणि 'ट्रान्स्फर'ची वेळ यावर कर लागू होण्याचे वर्ष ठरते. या बाबतीत चुकीचा निर्णय घेतल्यास भविष्यात कर नोटिसा आणि दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

**टीडीएस क्रेडिट वेळेचा समन्वय आवश्यक** : अनेक जेडीए व्यवहारांमध्ये डेव्हलपर रोख मोबदल्यावर टीडीएस कापतो. परंतु अनेक करदाते टीडीएस कापलेल्या वर्षातच त्याचा क्रेडिट घेतात, जे चुकीचे आहे.

कर नियमांनुसार टीडीएस क्रेडिट त्या वर्षातच घ्यावा ज्यात संबंधित उत्पन्न करासाठी दाखवले जाते. या बाबतीत विसंगती आल्यास सीपीसीकडून ॲडजस्टमेन्ट होऊन अनावश्यक कर मागणी निर्माण होऊ शकते.

**रिटर्नमध्ये व्यवहार न दाखवणे मोठी चूक** : काही जमीनमालक असा समज करतात की त्या वर्षात कर देय नसल्यास व्यवहार रिटर्नमध्ये दाखवण्याची गरज नाही. परंतु हा दृष्टिकोन धोकादायक आहे.

आजच्या डिजिटल युगात आयकर विभागाला विविध स्रोतांमधून माहिती उपलब्ध होते :

सब-रजिस्ट्रार कार्यालय, स्टॅम्प ड्युटी नोंदी, रेरा प्राधिकरण

म्हणून जेडीए व्यवहार लपवणे शक्य नाही. योग्य वेळी योग्य माहिती न दिल्यास भविष्यात तपासणीमध्ये अडचणी निर्माण होतात.

**मूल्यांकन आणि स्टॅम्प ड्युटीचे महत्त्व** : जेडीए व्यवहारांमध्ये स्टॅम्प ड्युटी मूल्य (स्टॅम्प ड्युटी व्हॅल्यू ) आणि मोबदल्याचे योग्य मूल्यांकन अत्यंत महत्त्वाचे असते. कमी मूल्य दाखवणे किंवा अस्पष्ट माहिती देणे हे कर तपासणीसाठी संशयास्पद ठरते.

तसेच, जमीनमालकाला मिळणाऱ्या फ्लॅट्स किंवा बांधकामाच्या भागाचे योग्य आणि आधारभूत मूल्यांकन करणे आवश्यक आहे. अन्यथा कर अधिकाऱ्यांकडून पुनर्मूल्यांकन होऊन अतिरिक्त कर लावला जाऊ शकतो.

**डेव्हलपरवर पूर्ण अवलंबित्व चुकीचा दृष्टिकोन** : अनेक वेळा जमीनमालक असा समज करतात की डेव्हलपर सर्व कर संबंधित जबाबदाऱ्या पार पाडेल. परंतु प्रत्यक्षात जमीनमालक आणि डेव्हलपर यांची कर जबाबदारी स्वतंत्र असते. डेव्हलपरने टीडीएस कापला असला किंवा त्याचे रिटर्न भरले असले तरी जमीनमालकाने स्वतःच्या उत्पन्नाची अचूक नोंद करून कर भरणे आवश्यक आहे.

**कर सवलतींचे नियोजन दुर्लक्षित पण महत्त्वाचे** : कलम ५४ आणि ५४ फ अंतर्गत उपलब्ध असलेल्या कर सवलतींचा योग्य वापर केल्यास मोठ्या प्रमाणात कर बचत होऊ शकते. परंतु अनेक जमीनमालक योग्य वेळेत नियोजन करत नाहीत किंवा नियमांची चुकीची समज ठेवतात.

विशेषतः, ''फ्लॅट मिळाला म्हणजे सवलत मिळेल'' हा समज नेहमीच योग्य नसतो. सवलतीसाठी ठरावीक अटी आणि वेळमर्यादा पाळणे आवश्यक असते.

**वाढती तपासणी आणि बदलते वास्तव** : आज जेडीए व्यवहार पूर्णपणे पारदर्शक झाले आहेत. आयकर विभाग विविध डेटाबेस एकत्रित करून अशा व्यवहारांचे विश्लेषण करत आहे. करार झाल्यानंतर अनेक वर्षांनीही तपासणी होऊ शकते. यामुळेच, सुरुवातीपासूनच योग्य कागदपत्रे, मूल्यांकन आणि कर नियोजन करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**निष्कर्ष** : जमीन विकास करार हे केवळ बांधकामाशी संबंधित व्यवहार नसून कराच्या दृष्टीने अत्यंत गुंतागुंतीचे आहेत. चुकीच्या समजुती, अपुरी माहिती आणि नियोजनाचा अभाव यामुळे अनेक जमीनमालकांना अनावश्यक करदायित्व आणि कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत आहे.

योग्य कर सल्ला, वेळेवर नियोजन आणि अचूक माहिती सादर करणे हेच या समस्यांपासून वाचण्याचे प्रमुख साधन आहे.

(९०९६३३२३५३, कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार)

---

## वेध

प्रफुल्ल व्यास

# सारा अफवांचा बाजार

गेल्या काही वर्षांत आपल्या दैनंदिन आयुष्यात एका गोष्टीने अत्यंत वेगाने प्रवेश केला ती म्हणजे□'अफवा!'. या अफवांचा वेग इतका प्रचंड आहे की त्या सत्यापेक्षा आधी पोहोचतात आणि परिणामही करून जातात. युद्धामुळे उद्यापासून पेट्रोल, डिझेल मिळणार नाही, गॅस सिलेंडर बंद होणार अशा प्रकारचे संदेश वाऱ्यासारखे समाजात पसरतात आणि भीती निर्माण होते. या भीतीचा परिणाम मानसिक, आर्थिक, सामाजिक तर होतोच शिवाय व्यवस्था, व्यवस्थापनावरही होतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर युद्ध सुरू होतं आणि लगेच तेल आयात बंद होणार, ज्वलनशील पदार्थांचे दर दुप्पट होणार, साठा संपणार□ हे पेरलं जातं. त्यानंतर व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटी त्याच्या दिमतीला हजरच असते. 'सीपी' ॲण्ड 'एफडब्ल्यू' (एकाचं दुसऱ्याला चिकटवणं आणि पुढे ढकलणं)च्या माध्यमातून ते काही तासांतच लाखोंपर्यंत पोहोचलेलं असतं. तेल आयात केलं जातं. ही वस्तुस्थिती खरी असली तरी भारतात अचानक पेट्रोल संपणार आहे. शासकीय आणि प्रशासकीयदृष्ट्या साधारणत: ७० ते ९० दिवस पुरेल इतका धोरणात्मक साठा उपलब्ध असतो. याशिवाय सार्वजनिक आणि खाजगी कंपन्यांचे वेगळे साठे असतातच. त्यामुळे उद्या पेट्रोल संपणार ही अफवा ठरते. गॅसच्या बाबतीतही परिस्थिती फार वेगळी नाही.

देशातील सुमारे ९० टक्क्यांपेक्षा जास्त घरांमध्ये स्वयंपाकासाठी एलपीजी गॅसचा वापर होतो. देशभरात लाखो वितरकांच्या माध्यमातून गॅस पोहोचवतात. वाहतूक व्यवस्था वा अन्य नैसर्गिक अडचणींमुळे टंचाई, अनियमितता होऊ शकते. मात्र, अफवांमुळे लोक अतिरिक्त सिलेंडर बुक करतात, साठवणूक करतात आणि यामुळेच काही ठिकाणी कृत्रिम टंचाई निर्माण होते. राज्यात गेल्या दोन दिवसांत हेच अनुभव येत आहेत. आता गॅस मिळणार नसल्याची चर्चा सुरू झाली आणि गॅस एजन्सी पुढे रिकामे सिलेंडर घेऊन रांगा लागल्या. ज्यांच्याकडे दोन कनेक्शन आहेत त्यांनी अतिरिक्त सिलेंडर मिळवण्यासाठी 'जुगाड' लावणे सुरू केले. वास्तविक व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठ्याविषयी शासनाने धोरण ठरवले आहे. घरगुती वापराचे सिलेंडर उपलब्ध आहेत. फक्त त्यासाठी ठरावीक मुदत देण्यात आली. सिलेंडरची 'आग' शांत होत नाही तोच सोमवारी दुपारपासून सर्वत्र पेट्रोल संपल्याची अफवा पसरली आणि पेट्रोप पंपांपुढे वाहनांच्या रांगा लागल्या. मग, पेट्रोल तरी किती भरून घ्यायचं तर ते आवश्यकेपेक्षा जास्त आणि वाहनात पेट्रोल आहे म्हणून वीक एन्ड म्हणून 'लाँग ड्राईव्ह' जाऊन यायचं!

अफवांचा परिणाम कोरोना काळात अनुभवला. टाळेबंदी जाहीर होताच लोकांनी किराणा, औषधं, सॅनिटायझर, मास्क महिनाभराचा साठा घरात भरून ठेवला. परिणामी, दुकानांमध्ये तात्पुरती टंचाई निर्माण झाली. सोशल मीडियाच्या वाढता वापर आणि २४ तास बातम्यांच्या ओढाताणीत अफवांचा वेग सूर्यकिरणांपेक्षा काही पटीने पसरतो आहे. व्हॉट्सॲपवर दररोज अब्जावधी संदेशांची देवाणघेवाण होते. एका अभ्यासानुसार, भारतात व्हायरल होणाऱ्या संदेशांपैकी सुमारे ३० टक्के संदेश हे अपूर्ण किंवा चुकीच्या माहितीवर आधारित असतात. यातील मोठा भाग हा इकडचे तिकडे करण्याचा असतो. मेसेज पाठवणारी व्यक्ती नात्यातली, ओळखीची, मित्र असेल तर त्यावर सहज विश्वास ठेवला जातो आणि ती माहिती पुढे पाठवली जाते. काही वेळा टीआरपी आणि ब्रेकिंगच्या स्पर्धेत मोठा धक्का!, संकटाची घंटा!, संपणार का इंधन? अशी वाक्ये भीती वाढवतात. याची कल्पना सांगणाऱ्याला नसते. सरकार आणि अधिकृत यंत्रणांनी पुरेसा साठा असल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र, अधिकृत माहिती थंड असते आणि अफवा गरम होते. व्हॉट्सॲपवर पसरलेल्या अफवांमुळे काही ठिकाणी हिंसक घटना घडल्याचे अनेक उदाहरणे आहेत. अफवांचा आवाज दाबण्यासाठी सरकारच्या काही उपाययोजना आहेत. माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत खोटी माहिती पसरवणाऱ्यांवर कारवाई केली जाते. परंतु, त्याची संख्या फारच कमी आहे.

अफवा पसरविण्याचा शोध घेताना पोलिस प्रशासनाला तक्रारींची गरज भासते. परंतु, ज्याने कोणाच्या धार्मिक, सामाजिक वा वैयक्तिक भावना दुखावत नाहीत तोपर्यंत कोणी पोलिसात जात नाही. त्यामुळे अशा अफवा पसरविणाऱ्यांवर कारवाईसाठी पोलिस प्रशासनाने 'सुमोटो'चा वापर केला पाहिजे. परंतु, जोपर्यंत या अफवांचे गंभीर परिणाम झाल्याचे पोलिसांना दिसत नाही, त्याची तक्रार येत नाही तोपर्यंत काहीच कारवाई केली जात नाही. तक्रार येत नाही अन् अफवा पसरविणाऱ्यांवर कारवाईही होत नाही. त्यामुळे अफवांसाठी रान मोकळे होते. त्यातही राजकीय विरोधक सरकार विरोधात सामान्य माणसांच्या भावना भडकवण्यासाठी अशा अफवा पसरविण्यात धन्यता मानतात. अफवा ही लाट आहे□ती येते आणि जाते. पण, तिच्यामुळे आपण बुडायचं की तिला पलटवून लावायचं हे आपल्यालाच ठरवायचं आहे. जे काही ते ठरवा... पण, अफवांचे बळी ठरू नका म्हणजे झाले...

९८८१९०३७६५

---

## गुंतवणुकीची गोष्ट

शिवानी दाणी-वखरे

# जागतिक राजकारण आणि खिशातील पैसा

जगभरातील सध्याच्या घडामोडींनी पुन्हा एकदा हे स्पष्ट केले आहे की, जागतिक राजकारण आणि आपल्या खिशातील पैसा यांचा संबंध अतूट आहे. इस्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेला तणाव, त्यात अमेरिकेची भूमिका तसेच मध्यपूर्वेतील अस्थिरता या सर्वांचा परिणाम थेट जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहे. विशेषतः होर्मुजची खाडी हा या संपूर्ण समीकरणातील अत्यंत संवेदनशील भाग ठरतो. जगातील जवळपास २० टक्के कच्च्या तेलाची वाहतूक या अरुंद समुद्री मार्गातून होते. त्यामुळे या भागात कोणताही तणाव निर्माण झाला, तर त्याचा परिणाम थेट जागतिक तेलपुरवठ्यावर आणि किमतींवर होतो.

इस्रायल-इराण संघर्ष तीव्र झाला किंवा या भागात लष्करी हालचाली वाढल्या, तर होर्मुज खाडीतील वाहतूक धोक्यात येऊ शकते. अशा परिस्थितीत तेलाच्या किमती झपाट्याने वाढतात आणि त्याचा सर्वाधिक फटका भारतासारख्या देशांना बसतो. भारत आपल्या गरजेपैकी मोठ्या प्रमाणात तेल आयात करतो, त्यामुळे तेल महागले की त्याचा थेट परिणाम पेट्रोल-डिझेलच्या दरांवर, वाहतूक खर्चावर आणि शेवटी सर्वसामान्यांच्या घरखर्चावर होतो.

तेलाच्या वाढत्या किमती ही केवळ एक सुरुवात असते. त्यानंतर महागाई वाढते, वस्तू आणि सेवांचे दर वाढतात आणि मध्यवर्ती बँकांना व्याजदर वाढविण्याचा दबाव येतो. व्याजदर वाढले की कर्ज महाग होते, ईएमआय वाढतात आणि उद्योगांच्या गुंतवणुकीवर परिणाम होतो. परिणामी, शेअर बाजारात अस्थिरता वाढते. गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास डळमळतो आणि अनेक जण घाबरून चुकीचे निर्णय घेतात.

अमेरिकेची भूमिका या सगळ्यात निर्णायक ठरते. जर अमेरिका या संघर्षात अधिक सक्रिय झाली, तर जागतिक बाजारात आणखी मोठी अस्थिरता निर्माण होऊ शकते. डॉलर मजबूत होतो आणि रुपयावर दबाव वाढतो. रुपया कमजोर झाला की आयात आणखी महाग होते, ज्यामुळे महागाईचे चक्र अधिक तीव्र होते. अशा वेळी एक लहानसा प्रादेशिक संघर्षही जागतिक आर्थिक संकटाचे रूप घेऊ शकतो.



मात्र, या सगळ्या नकारात्मक चित्रामध्येही एक महत्त्वाची सकारात्मक बाजू आहे. इतिहासात पाहिले, तर प्रत्येक युद्ध आणि संकटानंतर अर्थव्यवस्था आणि बाजार पुन्हा सावरले आहेत. त्यामुळेच अनुभवी गुंतवणूकदार या काळात घाबरत नाहीत, तर शांत राहून नियोजन करतात.

सामान्य गुंतवणूकदारांसाठी सर्वांत पहिली गरज म्हणजे भावनिक निर्णय टाळणे. बाजार पडत असताना शेअर्स विकणे किंवा एसआयपी थांबवणे ही सर्वांत मोठी चूक ठरते. उलट, अशा वेळी एसआयपी चालू ठेवणे अधिक फायदेशीर ठरते. कारण बाजार खाली असताना कमी किमतीत जास्त युनिट्स मिळतात आणि बाजार वाढल्यावर त्याचा मोठा फायदा होतो. याचबरोबर टप्प्याटप्प्याने गुंतवणूक वाढवणे हा एक प्रभावी मार्ग आहे. एकदम मोठी रक्कम गुंतवण्याऐवजी हळूहळू गुंतवणूक केल्यास बाजारातील अस्थिरतेचा धोका कमी होतो. याला 'रुपी कॉस्ट ॲव्हरेजिंग' असे म्हटले जाते आणि सध्याच्या परिस्थितीत ही पद्धत विशेष उपयुक्त ठरते.

विविधीकरण हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. केवळ शेअर बाजारावर अवलंबून न राहता काही हिस्सा सोन्यात ठेवणे योग्य ठरते. युद्धाच्या काळात सोने सुरक्षित गुंतवणूक मानले जाते, कारण अनिश्चिततेच्या काळात त्याची मागणी वाढते. साधारणपणे १० ते १५ टक्के गुंतवणूक सोन्यात ठेवणे संतुलित मानले जाते.

याचबरोबर, संरक्षण, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये संधी निर्माण होतात. युद्धाच्या पृष्ठभूमीवर सरकार या क्षेत्रांवर अधिक खर्च करते, त्यामुळे दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी ही क्षेत्रे लक्षात ठेवण्यासारखी आहेत. आपत्कालीन निधी तयार ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. किमान सहा महिन्यांच्या खर्चाएवढी रक्कम लिक्विड स्वरूपात ठेवली, तर अशा अनिश्चित काळात आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवता येते आणि गुंतवणूक मोडावी लागत नाही.

नागपूरसारख्या शहरातील गुंतवणूकदारांसाठी ही सर्व समीकरणे अधिक वास्तववादी ठरतात. वाढते खर्च, ईएमआयचा ताण आणि भविष्यासाठीची जबाबदारी या सर्वांच्या दरम्यान योग्य आर्थिक निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यामुळे अफवांवर किंवा भावनांवर आधारित निर्णय घेण्याऐवजी, माहिती आणि नियोजनावर आधारित गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

जागतिक तणाव, इस्रायल-इराण संघर्ष, होर्मुज खाडीतील धोके आणि तेलाच्या किमतीतील चढ-उतार हे सगळे घटक आपल्या नियंत्रणाबाहेर आहेत. मात्र, या सगळ्या परिस्थितीत आपली भूमिका काय असावी, हे ठरवणे पूर्णपणे आपल्या हातात आहे. संयम, शिस्त आणि योग्य धोरण यांच्या मदतीने आपण या अस्थिरतेतही आपले आर्थिक भविष्य मजबूत करू शकतो. बघा पटतंय का?

**तळटीप** : हा लेख शैक्षणिक उद्देशाने असून, दिलेली उदाहरणे अभ्यासासाठी आहेत. गुंतवणूक करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

(संचालिका, मनी बी इन्स्टिट्यूट प्रा. लि.)
९८६०१३३८६०

---

## वाचक पत्रे

### 'जनआक्रोश'च्या सदस्यांचे अभिनंदन

'जनआक्रोश'ला १४ वर्षे पूर्ण झाली, ही बाब संस्थेच्या सर्व सदस्यांसाठी अभिमानाची तसेच कौतुकाची आहे. सर्वांचे अभिनंदन. १४ वर्षांपूर्वी रोवलेले रोप आता झपाट्याने वाढत आहे. त्यांनी ज्या चिकाटीने आणि उत्साहाने संस्थेचे कार्य ऊन-पावसाची तमा न बाळगता पुढे चालू ठेवले याकरिता त्यांचे खास अभिनंदन. ३ ची सदस्य संख्या आता २०० च्या वर गेली आहे हे दर्शवते की कार्यहेतू शुद्ध असला की समाजासाठी काम करायला आपण तत्पर आहोत. त्या आकड्यामध्ये जास्त योगदान ज्येष्ठ नागरिकांचे आहे.

नागपूरला रोवलेल्या या वृक्षाच्या शाखा भारतभर पसरत आहेत. तसेच या संस्थेला आता सरकारी संस्थेकडून (पोलिस, राष्ट्रीय महामार्ग, शैक्षणिक संस्था, औद्योगिक संस्था, महानगरपालिका, आरटीओ, इत्यादी) बोलावणे येत आहे ही बाब संस्थेच्या कार्याचे महत्त्व दर्शवते. भारतातील रस्ता अपघातांची वाढती संख्या बघता 'रस्ता सुरक्षा'चे धडे लहान-मोठ्या नागरिकांसाठी आवश्यक असल्याचे अधोरेखित झाले आहे. कार्य न संपणारे आहे त्यामुळे सदस्यांना कायम उत्साही राहणे आवश्यक आहे. आतापर्यंत झालेल्या सर्व कार्यकारिणीचे तसेच सर्व सदस्यांचे पुन्हा एकदा अभिनंदन आणि खूप खूप शुभेच्छा.

**अनिल जोशी**/पुणे. ९४२२८०२५६५

### पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था आवश्यक

उन्हाळा सुरू झाला की तापमान खूप वाढते. प्रखर उन्हामुळे माणसांप्रमाणेच पक्ष्यांनाही खूप त्रास होतो. पाणी आणि अन्न शोधण्यासाठी त्यांना खूप भटकावे लागते. त्यामुळे उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आजकाल शहरांमध्ये झाडांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे पक्ष्यांना सावली, अन्न आणि पाणी मिळणे कठीण झाले आहे. गरम हवेमुळे छोटे पक्षी तहानेने व्याकुळ होतात. अशा वेळी आपण थोडी मदत केली तर त्यांचे प्राण वाचू शकतात. पूर्वी गावांमध्ये झाडे, तलाव आणि विहिरी जास्त असल्यामुळे पक्ष्यांना पाणी सहज मिळत असे. पण आज झाडांची संख्या कमी झाली आहे आणि पाण्याचे स्रोतही कमी झाले आहेत. त्यामुळे उन्हाळ्यात पक्ष्यांना पाणी मिळणे कठीण होते. पक्ष्यांना तहान लागते आणि पाण्याच्या शोधात ते इकडे-तिकडे फिरत राहतात. अशा वेळी आपण घराच्या गच्चीवर, बाल्कनीत, अंगणात किंवा खिडकीजवळ एका भांड्यात स्वच्छ पाणी ठेवले तर पक्ष्यांना मोठा आधार मिळतो. यामुळे चिमणी, कावळा, कबूतर यांसारखे अनेक पक्षी पाणी पिऊ शकतात. पक्ष्यांसाठी पाणी ठेवताना रोज ते बदलणे आणि भांडे स्वच्छ ठेवणेही महत्त्वाचे आहे. या छोट्या कृतीमुळे पक्ष्यांचे प्राण वाचू शकतात आणि आपल्यात निसर्गप्रेम वाढते. कधी कधी त्या ठिकाणी थोडे धान्यही ठेवले तर पक्ष्यांना अन्न मिळते. झाडे लावणे आणि त्यांचे संरक्षण करणेही महत्त्वाचे आहे, कारण झाडांमुळे पक्ष्यांना सावली आणि निवारा मिळतो.

पक्ष्यांसाठी पाणी ठेवणे ही एक छोटी पण खूप महत्त्वाची सवय आहे. यामुळे आपण निसर्गातील जीवांना मदत करतो आणि पर्यावरणाशी आपले नाते अधिक घट्ट होते. म्हणूनच प्रत्येकाने उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याचे भांडे ठेवले तर पक्ष्यांना मोठी मदत होते. या छोट्या कृतीमुळे पक्ष्यांचे जीवन वाचेल आणि निसर्ग अधिक सुंदर व आनंदी बनेल. आपण घराजवळ पाण्याची छोटी व्यवस्था केली तर अनेक पक्ष्यांची तहान भागू शकते. या कामातून आपल्या लहान मुलांमध्येही प्राणी-पक्ष्यांविषयी प्रेम आणि संवेदनशीलता वाढते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या घराजवळ किंवा झाडाखाली पाण्याचे भांडे ठेवून त्यांना मदत करावी. प्रत्येकाने उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाणी ठेवण्याची सवय लावली पाहिजे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

स्विस संस्था आयक्यूएआरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे. कारण या अहवालानुसार भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा प्रदूषित देश बनला असून देशातील सर्व प्रमुख शहरे प्रदूषणाच्या विळख्यात अडकले असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. आज देशातील सर्वच महत्त्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करून ते वृक्ष जगवले पाहिजेत.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# सोलापूरात उद्यापासून 'महिला महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेचा थरार

## विजेत्या व उपविजेत्यांना कार आणि बुलेटचे बक्षीस; पुरुषांच्याही खुल्या गटाच्या स्पर्धा होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

कै. सिद्धराम साखरे यांच्या स्मरणार्थ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने 'महिला महाराष्ट्र केसरी' तसेच वरिष्ठ गट महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. तसेच खुल्या पुरुष गटातील कुस्ती स्पर्धांचाही समावेश करण्यात आला असून राज्यभरातील नामांकित महिला व पुरुष पैलवानांचा सहभाग राहणार आहे, अशी माहिती निर्झरा केअर फाउंडेशनच्या अध्यक्षा स्वाती अळळीमोरे-साखरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



**अशी असणार बक्षिसे**
**महिला महाराष्ट्र केसरी विजेत्यास :** किया सोनेट कार
**उपविजेत्यास :** रॉयल इनफिल्ड बुलेट
महिला १० वजनी गटातील प्रथम चार मल्लांना : ५१, २५, १५, १५ हजार रुपये रोख
पुरुष १३ वजनी गटातील प्रथम चार मल्लांना : ५, २.५, १.५ व १.५० हजार

ही स्पर्धा दि. २८ व २९ मार्च रोजी सायंकाळी ५ ते ९ या वेळेत येथील हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर रंगणार आहे. महिलांची स्पर्धा १० तर पुरुषांची स्पर्धा १३ वजनी गटात होणार आहे. यासाठी राज्यातील ४५० मल्ल यात भाग घेणार असून सुमारे ७५० कुसत्या होतील. महिलाचे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून १० मल्ल भाग घेतील. यासाठी मॅटची तीन आखाडे तयार करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार असून सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मघना बोर्डीकर व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, उपाध्यक्ष तथा मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यसभा खा. डॉ. ज्योती वाघमारे, आ. देवेंद्र कोठे, विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, समाधान आवताडे, दिलीप सोपल, नारायण पाटील, उत्तमराव जानकर तसेच महापौर विनायक कोंड्याल आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेचे आयोजन निरझरा केअर फाउंडेशनच्या अध्यक्षा स्वाती अळळीमोरे-साखरे यांच्या पुढाकारातून करण्यात आले असून कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस केदारलिंग विभुते, सोमनाथ पटणे, सत्येन जाधव, पै. भरत मेकाले, भीमराव बाळगे, मनोज घोडके, लक्ष्मण सरवदे आदी उपस्थित होते.

# बार असोसिएशनची क्रिकेट स्पर्धा सुरु

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

बार असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेस सुरवात झाली.

२९ मार्चपर्यंत ही स्पर्धा सोलापूर शहर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर होईल. यात जिल्ह्यातील १९ संघानी भाग घेतला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या हस्ते झाले. यावेळी पोलीस उपायुक्त राजन माने, महाराष्ट्र ॲण्ड गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड. मिलिंद थोबडे, चॅरिटी कोर्ट अध्यक्ष ॲड. खतीब, ॲड. संजीव सदाफुले, ॲड. सुभाष देशपांडे, ॲड. विक्रांत फताटे, ॲड. निशिकांत देगावकर, ॲड. शिरीष जगताप, सोलापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. निलेश ठोकडे, निलेश जोशी, माजी सचिव ॲड. मनोज पामुल, ॲड. प्रशांत कांबळे, ॲड. रवि सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते. असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोलापूर बार असोसिएशनचे सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी केले. सहसचिवा ॲड. मिरा प्रसाद यांनी आभार मानले.



# जुळे सोलापुरातील डी मार्ट चौकाला अतिक्रमणाचा विळखा

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

जुळे सोलापुरातील गजबजलेल्या डी मार्ट चौक परिसराला अतिक्रमणाचा मोठा विळखा बसला आहे. चारचाकी फेरीवाले, भाजी विक्रेते, चायनीज गाड्या यांनी या चौकात असे ठाण मांडले आहे की, संध्याकाळी वाहन चालविणेच काय पण चालणे देखील कठीण झाले आहे. महापालिकेने लक्ष दिले पाहिजे.

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**सिग्नलींग कामे**

**निविदा सूचना क्र.: SUR-N-T-2025-26-47 दिनांक: 24/03/2026.** DRM (S&T) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर (e-procurement website) www.ireps.gov.in येथे खालील कामांसाठी सक्षम आणि प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहे: कामाचे नाव आणि ठिकाण: सोलापूर विभागातील सोलापूर-कुर्डुवाडी सेक्शनमध्ये LC-40 आणि LC-42 च्या जागी ROB (रेल्वे ओव्हर ब्रिज) बांधकामाशी संबंधित सिग्नलींग कामे. निविदा क्र.: SUR-N-T-2025-26-47. कामाचा अंदाजित खर्च: रु. 1,33,43,324.27. निविदा अर्जाची किंमत: NIL (शून्य). जमा करावयाची अनामत रक्कम (EMD): रु. 2,16,700. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 20/04/2026 रोजी 15:30 वाजल्यानंतर. कामाचा सविस्तर तपशील IREPS संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही शुद्धीपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष (Manual)/टपालाद्वारे/ई-मेल/फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने 'वर्ग III' (Class III) डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (Digital Signature Certificate) प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटी या पर्यायांचा स्वीकार केला जाईल; तसेच बँक गॅरंटीच्या मूळ प्रती निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच अंतिम तारीख वगळून), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष पोहोचवणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

**रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.** 06

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**रेल्वे क्रॉसिंग (LC) गेट्सवरील पेडस्टल इत्यादींची बदली**

**निविदा सूचना क्र.: SUR-N-T-2025-26-48 दिनांक: 24/03/2026.** DRM (ST) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांसाठी सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर (e-procurement website) www.ireps.gov.in द्वारे ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे:- कामाचे नाव व ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील रेल्वे क्रॉसिंग (LC) गेट्सवरील, मुदत संपलेल्या (overaged) गेट पेडस्टलची आणि संबंधित उपकरणांची बदली करणे. निविदा क्र.: SUR-N-T-2025-26-48. कामाचा अंदाजित खर्च: रु. 1,59,35,211.54. निविदा अर्जाची किंमत: शून्य (NIL). जमा करावयाची अनामत रक्कम (EMD): रु. 2,29,700. कामाचा पूर्तता कालावधी: 12 महिने. निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: 20/04/2026 रोजी 15:30 वाजल्यानंतर. सविस्तर माहिती ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. काही शुद्धीपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष (Manual)/टपालाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती आहे की, त्यांनी कंपनीच्या नावासह 'वर्ग III' (Class III) डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in वर करावी. अनामत रक्कम (EMD) भरणा नेट बँकिंग, पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक हमीपत्राच्या (Bank Guarantee) स्वरूपात स्वीकारला जाईल; तसेच मूळ बँक हमीपत्र हे निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.** 07

## परिशिष्ट - ३
**(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ यांचे कार्यालय,**
पत्ता - नविन मुठा कालव्याशेजारी, स्वारगेट, पुणे - ४११०३७.
ई मेल - eemd123@gmail.com दूरध्वनी क्र :- ०२०-२४२६६०११

**ई-निविदा सुचना क्रमांक १६ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्यावतीने कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र.२ पुणे ३७ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र.२ पुणे ३७ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल..

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदा किंमत (वस्तू व सेवाकर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | उजनी प्रकल्प धरणावरील वक्रव्दारे क्र. १७ ते ४१ (१२ X ६.५) मधील द्वारांचे टर्न बकल बदलणे (एकूण २१ नग), पावर आऊटलेट आपत्कालीन द्वारांचे रबरसील बदलणे व गोलीएथ क्रेन दुरुस्ती, विभाजक भिंतीवरील शिड्यांना रेलिंग करणे, प्रकल्पावरील वॉटर लुब्रीकेशन व्यवस्था बदलणे व पर्जन्यपूर्व अहवालातील गंभीर त्रुटींची पुर्तता करणे कामी दुरुस्ती कामाबाबत. | सोलापूर | रु.१,२९,६९५,४५/- |
| २ | उजनी प्रकल्पावरील थोपव्दारे १२ x १ मी-०७ नग निर्मिती वाहतूक, व उभारणी कामाबाबत. | सोलापूर | रु.१,००,८६,७८६/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** दि: २७/०३/२०२६ वेळ : ११.०० ते दि. ०६/०४/२०२६ वेळ : १८.००
**ई-निविदा उघडण्याचा दिनांक :** दिनांक ०८/०४/२०२६ वेळ : १२.०० (शक्य झाल्यास)

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण - ०५२३/(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७/प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील. खालील संकेतस्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

**जा. क्र. ८०५ दिनांक : १८/३/२०२६**
**कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे. ३७**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग क्र.२, पुणे-३७**

**DGIPR/ROC-2025-26/N0.5/C6795.**

Panchakshari Shivacharya Trust's
**CHANNABASWESHWAR PHARMACY COLLEGE (DEGREE)**
**Kava Road, Basweshwar Chowk, Latur-413512 (Maharashtra) Tel./Fax: (02382) 243855**
**DTE Code :- 2253, University Code :- 947, MSBTE Code :- 2041**
Email:- channabasweshwar@gmail.com/principalcbpc@gmail.com
Website:- www.channabasweshwar.org
**Approved by:- Govt. of Maharashtra, PCI, New Delhi,**
**Affiliated to:- S.R.T.M. University, Nanded, MSBTE, Mumbai.**

**RECRUITMENT**

Applications are invited from the Eligible candidates for the following posts. The applications should be in the format prescribed by University duly completed in all respect should reach the undersigned within 15 days from the date of publication of the advertisement at the college address. Candidates of reserved category should submit one copy of Application to the Assistant Registrar, (Special Cell) S.R.T.M. University, Nanded.

| Sr.No. | Post | No. of Posts | Subject & Vacancies | Reservation |
|---|---|---|---|---|
| 1 | Professor | 10 | 1) Pharmaceutics<br>2) Pharmaceutical Chemistry<br>3) Pharmacology<br>4) Pharmacy Practice<br>5) Quality Assurance<br>6) Pharmacognosy | Open-01, SC-02, ST-01, VJ(A)-01, NT-B-01, OBC-02, SEBC-01, EWS-01 |
| 2 | Associate Professor | 11 | 1) Pharmaceutics<br>2) Pharmaceutical Chemistry<br>3) Pharmacology<br>4) Pharmacy Practice<br>5) Quality Assurance<br>6) Pharmacognosy | Open-03, SC-01, ST-01, VJ(A)-01, NT-B-01, OBC-02, SEBC-01, EWS-01 |
| 3 | Assistant Professor | 05 | 1) Pharmaceutics<br>2) Pharmaceutical Chemistry<br>3) Pharmacology<br>4) Pharmacy Practice<br>5) Pharmacognosy | SC-01, VJ(A)-01, OBC-01, SEBC-01, EWS-01 |

**Note :-** The Government resolution dated. 25/01/2024, for Parallel (horizontal) reservation should be implemented strictly as per rules.
**Professor :–** Women – 04, Sports Person – 01, **Associate Professor :-** Women – 03, Sports Person – 01, **Assistant Professor :–** Women -04, Person with Disability – 01, Sports Person – 01.

**Essential Educational Qualification & Experience: -** As per the norms prescribed by PCI, New Delhi, Govt. of Maharashtra and SRTM University, Nanded.
For Detailed advertisement visit to university website:
**https://srtmun.ac.in/advt-for-the-teaching-post-channabasweshwar-pharmacy-collegekava-road-latur/**
Address:
To,

**sd/-**
**Principal**

**sd/-**
**Secretary**

# राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी सोलापूरचा संघ जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

पिंपरी चिंचवड पुणे येथे होणाऱ्या ६६व्या राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी सोलापूरचा संघ सोलापूर जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे सचिव प्रमोद काटे यांनी जाहीर केला आहे. संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांनी संघास शुभेच्छा दिल्या.

शोएब कुरेशी, शानवाज नदाफ, लक्ष सुरवसे व जावेद शेख असे जिल्हा संघात निवड झालेले खेळाडू आहेत. या स्पर्धेत ४०० पेक्षा जास्त स्पर्धक भाग घेण्याची शक्यता आहे. या स्पर्धेसाठी २५ लाख रुपयांची रोख बक्षिसे ठेवण्यात आल्याचे आयोजकांनी जाहीर केले आहे.

## भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) नुसार अधिसुचना

**क्र./एलएक्यू/एसआर/वरवडे /०८/२०२२**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग, कुर्डूवाडी दि.१२/०३/२०२६**

ज्या अर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस-११/२०१४/सी.आर.७७ (पार्ट-२)/ए-२ दि.११ सप्टेंबर २०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापार करुन असेल अधिसुचीत केले आहे की सदर अधिनियमाच्या कलम ३(झ अ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत १०,००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत भूसंपादना संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, '**समुचित शासन**' असल्याचे मानण्यात येईल.

त्या अर्थी, सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्या अर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायदद्याच्या कलम ११ उपकलम ४ अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती, प्राथमिक अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतर करणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमिन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतूदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकलम ५ व भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २००४ चे कलम ५० उपकलम ३ अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्या अर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन असल्याने उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुर्डूवाडी यांना जिल्हाधिकारी यांचेवतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट १**
**जमिनीचे वर्णन**
**गावाचे नाव :** वरवडे **तालुका :-** माढा **जिल्हा :-** सोलापूर

| अ.क्रं. | गट नंबर | क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | २९६ पै | ०.२८ |
| २ | २९७ पै | ०.९२ |
| ३ | ३०४ पै | ०.४३ |
| **एकूण** | | **१.६३** |

**परिशिष्ट २**
**प्रकल्पाचे नाव :** गाव तलाव वरवडे क्र.२ करिता मौजे वरवडे, ता. माढा, जि. सोलापूर
**प्रकल्पाचे विवरण :-** गाव तलाव वरवडे क्र.२ करिता मौजे वरवडे, ता. माढा, जि. सोलापूर
**सामाजिक फायदे:** जलसिंचन
(सामाजिक, आर्थिक व इतर फायदे)

**परिशिष्ट ३**
**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण**
**गावाचे नाव :** वरवडे **तालुका :-** माढा **जिल्हा :-** सोलापूर

| अ.क्रं. | स.नं/गट नं. | क्षेत्र (हे-आर) |
|---|---|---|
| | लागू नाही. | |

**परिशिष्ट ४**
**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा**
**अनुसूची - चार**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शसन यांचेकडील क्रमांक संकीर्ण-२०२५ प्र.क्र.४७/अ-३, दिनांक १६ सप्टेंबर २०२५ अन्वये सदर प्रकल्पाचे काम संपादन मडंळाने ताबा घेऊन पूर्ण झाले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाला असल्याने विधी व न्याय विभागाने अन्य प्रकरणी दिलेल्या अभिप्रायानुसार भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १० (क) नुसार सदर प्रस्तावास पूर्वलक्षी प्रभावाने SIA सूट देता येऊ शकत नाही.

**परिशिष्ट ५**
**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

**१) प्रशासकाचे पदनाम :-** लागू नाही
**२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :-** लागू नाही
**३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमूद करावे :-** लागू नाही

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम १ खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुर्डूवाडी यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल. नोट प्रस्तूत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उपविभागीय अधिकारी माढा विभाग, कुर्डूवाडी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**नोट - प्रस्तूत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उपविभागीय अधिकारी माढा विभाग, कुर्डूवाडी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.**

**स्थळ:- कुर्डूवाडी**
**दिनांक :- १२/०३/२०२६**

**सही/-**
**(जयश्री आव्हाड)**
**उपविभागीय अधिकारी**
**माढा विभाग कुर्डूवाडी**

**जिमाका/सो/जाहि/४१३/२०२५-२६**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ऑलिम्पिक सुवर्ण विजेती कॅरोलिना मारिन निवृत्त



**मद्रिद :** २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमधील सुवर्णपदक विजेती, स्पेनची कॅरोलिना मारिन हिने गुरुवारी व्यावसायिक बॅडमिंटनमधून निवृत्ती जाहीर केली. यासह, तिच्या एका शानदार कारकिर्दीचा समारोप झाला, यात तिने तीन वेळा जागतिक अजिंक्यपद स्पर्धा जिंकल्या होत्या. व्यावसायिक बॅडमिंटनमधील माझा प्रवास आता संपला आहे व म्हणूनच, मी माझ्या मूळ गावी हुएल्वा येथील युरोपियन अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणार नाही, असे मारिनने समाज माध्यमावर एक भावूक संदेश शेअर केला. आपण सर्वांनी मला शेवटच्या वेळी मैदानात खेळताना पाहावे, अशी माझी इच्छा होती; परंतु त्यासाठी मला माझ्या शरीराला पुन्हा कोणत्याही धोक्यात घालायचे नाही, असे ३१ वर्षीय मारिन म्हणाली. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकच्या अंतिम फेरीत भारताची पी.व्ही. सिंधूचा पराभव करून सुवर्णपदक जिंकणाऱ्या मारिनची गणना बॅडमिंटनच्या इतिहासातील सर्वात यशस्वी खेळाडूंमध्ये केली जाते. ती तीन वेळा जागतिक विजेती आणि अनेक वेळा युरोपियन विजेती ठरली आहे; तसेच ऑलिम्पिक बॅडमिंटनमध्ये सुवर्णपदक जिंकणारी ती पहिलीच स्पॅनिश खेळाडू झाली आहे.

### पॅट कमिन्सने केला हलका सराव

**बंगळुरू :** तंदुरुस्तीच्या समस्यांशी झुंज देत असलेल्या ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स सनरायझर्स हैदराबादच्या सराव सत्रात सहभागी झाला. दुखापतग्रस्त पॅट कमिन्सच्या जागी ईशान किशनकडे सनरायझर्स हैदराबाद संघाचे कर्णधारपद सोपविण्यात आले आहे. ३२ वर्षीय कमिन्सने या सत्रात स्वतःवर अतिरिक्त ताण येऊ दिला नाही. त्याने हलकासा व्यायाम केला तसेच क्षेत्ररक्षण व झेल घेण्याच्या सरावात भाग घेतला. त्याचे सहकारी नेट्समध्ये पूर्ण क्षमतेने सराव करत असताना, कमिन्सने मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेटोरी व त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली जलद धावण्याचा सराव केला. शनिवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध होणाऱ्या आयपीएल २०२६ च्या सलामीच्या सामन्यासाठी संघ या शहरात दाखल झाला आहे.

### यजमानाचे भवितव्य ठरविणारी लढाई एप्रिलमध्ये होणार सुरू

**नवी दिल्ली :** २०२७ चा आयलीली एकदिवसीय विश्वचषक पुढील वर्षी होणार आहे, पण सहभागी संघांचा अंतिम निर्णय अजून शिल्लक आहे. दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे यजमान म्हणून पात्र आहेत, तर नामिबियाला पात्रता फेरीतून स्थान मिळवावे लागणार आहे. पात्रता फेरी २ एप्रिलपासून सुरू होईल. पात्रता फेरीतील पहिला सामना स्कॉटलंड आणि ओमान यांच्यात होईल, तर ४ एप्रिलला नामिबिया आणि ओमान सामन्यात भेटतील. ६ एप्रिलला नामिबिया स्कॉटलंडशी खेळेल आणि ही फेरी १२ एप्रिलपर्यंत चालेल. नामिबियाची स्थिती सध्या नाजूक आहे. आठ संघांमध्ये ते सहाव्या स्थानावर आहेत. त्यामुळे त्यांच्या पुढील कामगिरीवर सर्वांचे लक्ष असणार आहे.

### लेग-स्पिनर राहुल चहर सरे संघात सहभागी होणार

**लंडन :** भारताचा लेग-स्पिनर राहुल चहर आगामी काऊंटी क्रिकेट हंगामातील सरे संघाच्या शेवटच्या आठ सामन्यांसाठी पुन्हा संघात परतणार असल्याची माहिती क्लबने गुरुवारी दिली. २६ वर्षीय चहरने गत वर्षी सरे संघाकडून पदार्पण करताना शानदार कामगिरी केली होती. हॅम्पशायरविरुद्धच्या विजयात त्याने १० बळी टिपले होते, यात दुसऱ्या डावातील ८ बळींचा समावेश होता. क्लबच्या इतिहासात पदार्पण करणाऱ्या गोलंदाजाची ही सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे.

# भारताच्या घरच्या मालिकेचा कार्यक्रम जाहीर

**नागपुरात बॉर्डर-गावस्कर चषकाचा पहिला कसोटी सामना २१ जानेवारीपासून**

**पुण्यात भारत-श्रीलंका टी-२० सामना २७ डिसेंबर रोजी**

**वन-डेमध्ये कोहली, रोहित खेळण्याची अपेक्षा**



◆ **नवी दिल्ली, २६ मार्च**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) गुरुवारी राष्ट्रीय वरिष्ठ पुरुष संघाच्या घरच्या हंगामाचे वेळापत्रक जाहीर केले असून, यामध्ये पाच कसोटी, नऊ एकदिवसीय (वन-डे) आणि आठ टी-२० सामन्यांचा समावेश आहे. या वेळापत्रकानुसार पुण्यात २७ डिसेंबर रोजी भारत-श्रीलंका टी-२० सामना, तर नागपुरात २१ जानेवारी २०२७ पासून गावस्कर-बॉर्डर चषक मालिकेतील भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यादरम्यानचा पहिला कसोटी क्रिकेट सामना खेळला जाणार आहे.

गत वर्षी नोव्हेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एका कसोटी सामन्याचे यजमानपद भूषवल्यानंतर, गुवाहाटीच्या बरसापारा स्टेडियमला आता भारत व ऑस्ट्रेलिया यांच्यातील २०२७ च्या बॉर्डर-गावस्कर चषक मालिकेत एका सामन्याचे यजमानपद मिळाले आहे. घरच्या हंगामाच्या वेळापत्रकातील हा सामना मुख्य आकर्षण ठरणार आहे.

एकदिवसीय सामन्यांकडे क्रिकेटप्रेमींचे विशेष लक्ष लागून राहील, कारण मर्यादित षटकांच्या क्रिकेटमधील दिग्गज जोडी असलेल्या विराट कोहली व रोहित शर्मा या दोघांचाही या सर्व सामन्यांमध्ये सहभाग असेल, अशी अपेक्षा आहे.

जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च २०२७ या तीन महिन्यांत चालणारी ऑस्ट्रेलियाविरुद्धची ही मालिका २१ जानेवारीपासून नागपूर येथे सुरू होईल. त्यानंतर चेन्नई (२९ जानेवारी ते २ फेब्रुवारी) येथे सामने होतील व आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर, ११ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत गुवाहाटी येथे तिसरा कसोटी सामना खेळला जाईल. रांची येथे चौथा कसोटी सामना १९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान खेळला जाईल, तर अहमदाबाद येथे होणारा मालिकेतील शेवटचा कसोटी सामना २७ फेब्रुवारीपासून सुरू होईल.

पाच यजमान शहरांपैकी, रोटेशन (पाळी) पद्धतीनुसार नागपूर, चेन्नई, रांची व अहमदाबाद या सर्व शहरांना त्यांचे नियोजित सामने मिळाले आहेत. नागपूरने शेवटचा कसोटी सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०२३ मध्ये आयोजित केला होता, तर चेन्नईने बांगलादेशविरुद्ध २०२४ मध्ये, रांचीने इंग्लंडविरुद्ध २०२४ मध्ये व अहमदाबादने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०२३ मध्ये भारताच्या कसोटी सामन्याचे आयोजन केले होते.

#### झिम्बाब्वे संघ भारत दौऱ्यावर

नवीन वर्षाच्या सुरुवातीला, म्हणजेच जानेवारी २०२७ मध्ये, झिम्बाब्वे तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारताच्या दौऱ्यावर येईल. हे सामने कोलकाता (३ जानेवारी), हैदराबाद (६ जानेवारी) आणि मुंबई (९ जानेवारी) येथे खेळले जातील.

तथापि, गुवाहाटीने भारताचा शेवटचा घरचा कसोटी सामना नोव्हेंबर २०२५ मध्ये आयोजित केला होता. तेव्हा त्यांना पुन्हा एकदा रोटेशनमध्ये स्थान कसे मिळाले, हे स्पष्ट झालेले नाही; विशेषतः जेव्हा मुंबई व कोलकाता यांसारखी प्रमुख शहरे या प्रतिष्ठेच्या मालिकेचा भाग नाहीत.

क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगाल (सीएबी) किंवा मुंबई क्रिकेट असोसिएशनने (एमसीए) ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्याचे यजमानपद स्वीकारण्यास असमर्थता दर्शविली होती की नाही, हे अद्याप समजू शकलेले नाही.

घरच्या हंगामात ऑस्ट्रेलियाविरुद्धची कसोटी मालिका हे मुख्य आकर्षण असले, तरी भारत वेस्ट इंडीज, श्रीलंका व झिम्बाब्वे या संघांचेही यजमानपद भूषविणार आहे.

विशेष म्हणजे, २००२ नंतर पहिल्यांदाच झिम्बाब्वेचा संघ द्विपक्षीय मालिकेसाठी भारतात खेळणार आहे. २००२ मध्ये त्यावेळी सौरव गांगुली भारतीय संघाचे नेतृत्व करत होता . या वर्षी २७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या वेस्ट इंडीजच्या भारत दौऱ्यासह, या हंगामात १७ शहरांमध्ये एकूण २२ आंतरराष्ट्रीय सामने खेळले जातील. या दौऱ्यामध्ये तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेचा समावेश असेल, त्यानंतर पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाईल.

एकदिवसीय सामने तिरुवनंतपुरम् (२७ सप्टेंबर), गुवाहाटी (३० सप्टेंबर) आणि न्यू चंदीगड (३ ऑक्टोबर) येथे खेळले जातील; त्यानंतर सामन्यांचे केंद्र टी-२० मालिकेसाठी बदलेल, त्याचे यजमानपद लखनौ (६ ऑक्टोबर), रांची (९ ऑक्टोबर), इंदूर (११ ऑक्टोबर), हैदराबाद (१४ ऑक्टोबर) आणि बंगळुरू (१७ ऑक्टोबर) ही शहरे भूषवतील.

त्यानंतर, डिसेंबरमध्ये भारत श्रीलंकेचे यजमानपद भूषवेल. या पांढऱ्या चेंडूच्या मालिकेत प्रत्येकी तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा समावेश असेल.

एकदिवसीय सामने दिल्ली (१३ डिसेंबर), बंगळुरू (१६ डिसेंबर) व अहमदाबाद (१९ डिसेंबर) येथे खेळले जातील, तर टी-२० सामन्यांचे यजमानपद राजकोट (२२ डिसेंबर), कटक (२४ डिसेंबर) आणि पुणे (२७ डिसेंबर) ही शहरे भूषवतील.

(वृत्तसंस्था)

## आयपीएलमध्ये पहिल्यांदाच १० भारतीय कर्णधार एकत्र



◆ **मुंबई, २६ मार्च**

बुधवारी मुंबई येथे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) व इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) पदाधिकाऱ्यांसोबतच्या वार्षिक बैठकीसाठी हे १० भारतीय कर्णधार एकत्र आले होते. आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच, या हंगामात सर्व १० संघांचे नेतृत्व भारतीय खेळाडू करतील.

या बैठकीत त्यांनी इम्पॅक्ट प्लेयर नियम व चेंडू बदलण्याबाबतचे नियम यांसारख्या काही नियमांमधील बदलांवर चर्चा केली.

बैठकीच्या कामकाजाव्यतिरिक्त, या कर्णधारांनी एकमेकांसोबत काही मनोरंजक खेळ आणि गमतीजमतींमध्येही सहभाग घेतला.

आयपीएल २०२६ मधील सर्व १० संघांचे कर्णधारपद भारतीय खेळाडूंकडे असेल. या हंगामात राजस्थान रॉयल्सला रियान परागच्या रूपाने नवीन कर्णधार मिळाला आहे. ईशान किशनने सनरायझर्स हैदराबादच्या कर्णधारपदाची धुरा स्वीकारली आहे.

आयपीएलच्या सुरुवातीलाच, दुखापतग्रस्त पॅट कमिन्सच्या जागी ईशान किशनने सनरायझर्स हैदराबादच्या कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतल्यामुळे, आता सर्वच्या सर्व १० संघांचे नेतृत्व भारतीय कर्णधारांकडे आले आहे.

या हंगामात राजस्थान रॉयल्सलाही नवीन कर्णधार मिळाला आहे. संजू सॅमसन चेन्नई सुपर किंग्ज संघात गेला आहे. संजूकडून रियान परागने संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारली आहे.

(वृत्तसंस्था)



रायपूर, छत्तीसगड येथे खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई आणि इतर मान्यवर

# मणिकांतची सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक

### खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धा

### अंजली मुंडाची पुन्हा चमकदार कामगिरी

◆ **रायपूर, २६ मार्च**

कर्नाटकचा जलतरणपटू मणिकांत एल. याने आपली सुवर्ण कामगिरीची मालिका कायम राखत सलग तिसरे सुवर्णपदक पटकावले. दुसरीकडे, गुरुवारी येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी ओडिशाच्या अंजली मुंडाने आपले दुसरे सुवर्णपदक निश्चित केले.

पुरुषांच्या २०० मीटर वैयक्तिक मेडले प्रकारात मणिकांतने वर्चस्व गाजविले. त्याने २:२५.९३ सेकंदांची वेळ नोंदवित सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक साजरी केली. यापूर्वी त्याने १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक आणि ५० मीटर बटरफ्लाय स्पर्धांमध्येही सुवर्णपदके जिंकली होती. त्रिपुराच्या रियाज त्रिपुराने (२:३४.०४ सेकंद) रौप्यपदक मिळवले, तर ओडिशाच्या कान्हू सोरेनला (२:३६.२१ सेकंद) कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

महिलांच्या २०० मीटर फ्री स्टाईल प्रकारात, बुधवारीच २०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या अंजली मुंडाने पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावले. तिने २:५३.८२ सेकंदांची वेळ नोंदवत आणखी एका सुवर्णपदकाची कमाई केली. छत्तीसगडच्या अनुष्का भगतने २:५९.३३ सेकंदांची वेळ नोंदवित रौप्यपदक जिंकले. या स्पर्धेतील तिचे हे दुसरे पदक ठरले. तर, ओदिशाच्या अंजली मल्लिकने ३:०६.१३ सेकंदांच्या वेळेसह कांस्यपदक मिळविले.

पदकतालिकेत सध्या कर्नाटक राज्य सहा सुवर्ण आणि दोन रौप्यपदकांसह आघाडीवर आहे. त्यानंतर ओडिशाचा क्रमांक लागतो. ओडिशाने तीन सुवर्ण, एक रौप्य आणि चार कांस्यपदके जिंकली आहेत.

(वृत्तसंस्था)

#### भारोत्तोलनात आसामच्या मोनिखा सोनोवालला सुवर्ण

भारोत्तोलनात, आसामच्या मोनिखा सोनोवाल आणि मिझोरमच्या इसाक माल्सावमतलुआंगा यांनी दुखापतीची चिंता बाजूला सारत सुवर्णपदक विजेती कामगिरी करून दाखवली. महिलांच्या ४८ किलो वजनी गटात स्पर्धा करताना, मोनिकाने स्नॅच प्रकारात ५७ किलो आणि क्लीन अँड जर्क प्रकारात ७५ किलो असे एकूण १३२ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. ओदिशाची दीपा राणी मलिक (१२० किलो) आणि अंदमान-निकोबार बेटांची अलास्का अलीना (११५ किलो) यांनी अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक मिळवले. पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात, माल्सावमतलुआंगाने पाठीच्या दुखापतीशी झुंज देत, एकूण २३५ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले.

# सोलापूरचा विक्रम 'शिवकेसरी'

### विदर्भस्तरावर अकोल्याचा सिद्धार्थ गवई प्रथम

◆ **अमरावती, २६ मार्च**

करण डेंढवाल मित्रपरिवार व विदर्भ कुस्तिगीर संघ यांच्या मान्यतेने व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती यांच्या सहयोगाने, नमो युवक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरू मैदान येथे आयोजित पुरुष व महिला शिवकेसरी कुस्ती स्पर्धेत सोलापूरचा विक्रम गायकवाड शिवकेसरी ठरला. विक्रमला बक्षीस म्हणून चांदीची गदा व ७१ हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याच राज्यस्तरावरच्या स्पर्धेत द्वितीय बक्षीस वाशीमच्या विजय शिंदेने पटकाविले असून त्याला ४१ हजार रुपये रोख देण्यात आले. विदर्भस्तरीय स्पर्धेत अकोल्याच्या सिद्धार्थ गवईने प्रथम क्रमांक पटकावला व त्याला ३१ हजार रुपये रोख व चांदीची गदा, तर द्वितीय क्रमांकाच्या अमरावतीच्या अर्जुन यादवला २१ हजार रुपये रोख देण्यात आले. महिला केसरी गटातील प्रथम बक्षीस २१ हजार रुपये रोख कल्याणी गादेकर (वाशीम) तसेच द्वितीय बक्षीस ११ हजार रुपये रोख अनुष्का गादेकरला (वाशीम) देण्यात आले. इतर सहभागी स्पर्धकांना लाखो रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षिसेसुद्धा देण्यात आलीत.



विक्रम गायकवाड

नेहरू मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य शिवकेसरी कुस्ती स्पर्धेच्या अंतिम सामन्यांना उपस्थित राहण्याचा मला अतिशय आनंद व अभिमान वाटतो, असे यावेळी सुनील राणा म्हणाले.

कुस्ती हा आपल्या महाराष्ट्राचा परंपरागत आणि अभिमानाचा खेळ आहे. या स्पर्धेमुळे आपल्या तरुण पिढीमध्ये खेळाची आवड वाढीस लागते आणि त्यांना स्वतःची क्षमता सिद्ध करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ मिळते.

यावेळी जितेंद्र भुयार, समीर देशमुख, राहुल बागडे, आरिफ खान, नदिम खान, जितेंद्र डिके, रोहीत बोखडे, त्रिदेव ढेडवाल, समीर डोंगरे, लखन शेरेकर, रोहीत बकरे, नितीन इंगोले, भुषण वाटकर, किसना श्रीवास, राम अहेरवार, गोलु पार्डीकर, विशाल वत्रे, अर्जुन डेढवाल, उमेश संकत, रिंकु काकडे आदी उपस्थित होते.

(तभा वृत्तसेवा)

### आशियाई पदक जिंकण्याचे ध्येय : मीराबाई चानू

◆ **रायपूर, २६ मार्च**

आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक जिंकणे हा असा एक महत्त्वाचा टप्पा आहे, हे माझ्या कारकिर्दीतील 'अपूर्ण राहिलेले काम' आहे, ते या वर्षी गाठण्यासाठी अत्यंत उत्सुक आहे, असे टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकणारी भारोत्तोलक मीराबाई चानू म्हणाली.

एका दशकाहून अधिक काळापासून मीराबाई चानू ही भारतीय भारोत्तोलकाची ओळख झाली आहे. मणिपूरची असलेल्या या खेळाडूच्या पदकांच्या गौरवशाली संग्रहामध्ये केवळ आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदकाचीच उणीव आहे; या संग्रहात टोकियो ऑलिम्पिकचे रौप्यपदक, तीन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील पदके आणि तितक्याच राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदकांचा समावेश आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा माझ्यासाठी वैयक्तिकरित्या खूप महत्त्वाची आहे, कारण तिथे माझे अजूनही एक काम अपूर्ण राहिले आहे. तिथे स्पर्धेचा दर्जा खूप उच्च असतो, त्यामुळे ती स्पर्धा अधिकच आव्हानात्मक व रोमांचक होते, असे चानूने येथे आयोजित पहिल्या खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील चानूचा प्रवास हा पदकाच्या अगदी जवळ पोहोचूनही ते हुकणे आणि विविध अडथळ्यांनी भरलेला राहिला आहे.

(वृत्तसंस्था)

### शिवसंभो, विशाल संघाचे शानदार विजय

**इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग सिझन-१६**





**सोलापूर, दि. २६ मार्च-** इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग सिझन-१६ स्पर्धेत शिवसंभो, विशाल संघाचे शानदार विजय मिळविले. श्री अरुणोदय मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. प्रायोजित केलेली ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम, रेल्वे मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत पाचव्या सामन्यात शिवसंभो संघाने मॉडर्न संघास २८ धावांनी हरविले. संदीप पाचंगे सामन्याचा मानकरी ठरला. सहाव्या सामन्यात विशाल संघाने रॉयल इंडियन्सला १२ धावांनी नमविले. प्रविण शिंदे सामनावीर ठरला.

**संक्षिप्त धावफलक :**

**विशाल :** १२ षटकात ५ बाद ११७ (सागर माळी २५, विजय पवार २९, कौस्तुभ सुरू १-१५, राजकिरण वडनाल १-२८) **वि. वि. रॉयल इंडियन्स :** १२ षटकात ७ बाद १०५ ( कौस्तुभ सुरू २६, हरीष कुलकर्णी१७, प्रवीण शिंदे ३-६, विलास कोडक १-१३, कुरबान १-५).

**शिवशंभो :** १२ षटकात ४ बाद १०१ (अनिल पटेल ४१, गिरीष देवरमणी ३३, अंबादास तोरा १-१४, हाजी तांबोळी १-१३, शंकर सरवदे १-१७) **वि. वि. मॉडर्न :** १२ षटकात ९ बाद ७३ (हाजी तांबोळी १८, निलेष वडनाल १८, अनिरुद्ध येक्कलदेवी ३-११, संदीप पाचंगे ३-६).

# आयपीएलचा उद्घाटन सोहळा रद्द

### चिन्नास्वामीतील ११ मृतकांची आठवण

◆ **बंगळुरू, २६ मार्च**

आयपीएलच्या १९व्या हंगामाच्या पहिल्या सामन्यापूर्वी बीसीसीआयने उद्घाटन सोहळा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. २८ मार्च रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) यांच्यात होणाऱ्या पहिल्या सामन्यापूर्वी कोणताही जल्लोष न करता, स्टेडियममध्ये ११ जागा रिकाम्या ठेवून ११ मृतकांची आठवण ठेवली जाईल.

गत वर्षी चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ निष्पाप लोकांचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळली होती. त्या आठवणींना सम्मान देत बीसीसीआयने यंदा उद्घाटन सोहळा आयोजित न करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय, आरसीबीने सामन्यापूर्वी मृतकांच्या स्मरणार्थ एक मिनिट मौन पाळण्याचे ठरवले आहे.

आरसीबीने गत हंगामात अंतिम सामन्यात पंजाब किंग्सवर विजय मिळवून आपले पहिले विजेतेपद पटकावले होते. या हंगामात बंगळुरू संघ आपले विजेतेपद टिकवण्याचा प्रयत्न करेल, तर सनरायझर्स हैदराबाद दुसऱ्या विजेतेपदासाठी मैदानात उतरतील. २८ मार्च रोजी एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये होणारा हा सामना सर्व लक्ष वेधून घेईल, पण उद्घाटन सोहळ्याशिवाय शांत आणि संवेदनशील वातावरणात पार पडेल.

(वृत्तसंस्था)

# लखनौला पहिली ट्रॉफी जिंकावीच लागेल : गोएंका

◆ **नवी दिल्ली, २६ मार्च**

दोन वेळा प्लेऑफमध्ये पोहोचणे पुरेसे नाही, यंदाच्या आयपीएल हंगामात लखनौ सुपर जायण्ट्सला आपली पहिली ट्रॉफी जिंकावीच लागेल, असे संघाचे मालक मालक संजीव गोएंका म्हणाले.

नव्या संघासह व भूतकाळातील अनुभवातून स्पष्ट धडा घेत गोएंका यांनी आयपीएलच्या पृष्ठभूमीवर फ्रॅन्चायझीच्या विकासाची रूपरेषा मांडली आहे. आयपीएल २०२५ वर भाष्य करताना, गोएंका यांनी विशेषतः गोलंदाजी विभागात मोठ्या प्रमाणात दुखापती होऊनही संघाच्या लवचिकतेकडे लक्ष वेधले. 'सकारात्मक बाब ही होती की आमचे बहुतेक आघाडीचे गोलंदाज जखमी असूनही आम्ही आमच्या पहिल्या सहा




सामन्यांपैकी चार सामने जिंकलो, असे त्यांनी सांगितले. संघ व्यवस्थापनाची प्रयोगशील वृत्तीही प्रशंसनीय होती. त्याचे अनपेक्षित फायदेही मिळाले. एडन मार्कराम व मिचेल मार्शला सलामीच्या भूमिकेत बढती देणे, हा एक मास्टरस्ट्रोक ठरला, असेही त्यांनी सांगितले. संघ व्यवस्थापनाने मार्कराम व मार्शला सलामीला फलंदाजीला पाठविण्याचा निर्णय घेतला, ही त्यांची नेहमीची जागा नाही, आणि हा त्या दोघांसाठीही त्यांचा सर्वोत्तम आयपीएल हंगाम ठरला, असे गोएंका यांनी नमूद केले.

उदयास आलेल्या सकारात्मक बाबींपैकी एक म्हणजे दिग्वेश राठीसारख्या नवीन प्रतिभेचा उदय आहे. त्याने आपल्या पदार्पणाच्या हंगामात छाप पाडली. दिग्वेश राठी एक पूर्णपणे नवखा खेळाडू म्हणून संघात आला आणि त्याने आमच्यासाठी चांगली कामगिरी केली, असे ते म्हणाले तथापि, आमच्याकडे एका मजबूत गोलंदाजीच्या गाभ्याची कमतरता आहे व आम्ही या वेळी देशांतर्गत भारतीय गोलंदाजी विभाग तयार करून जाणीवपूर्वक ती उणीव भरून काढली आहे, असे ते म्हणाले.

(वृत्तसंस्था)

# भारतीय स्किट नेमबाजांसमोर कठीण आव्हान



दर्शना राठोड



यशस्वी राठोड



ज्योतीरादित्य सिंग सिसोदिया

◆ **टांजियर, मोरोक्को, २६ मार्च**

शुक्रवारपासून येथील क्लब टांजेरोइस डी टिरमध्ये हंगामातील पहिलीच स्पर्धा- शॉटगन विश्वचषक नेमबाजी स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेत पहिल्या दिवशी भारतीय स्किट नेमबाजांना स्पर्धकांच्या एका अत्यंत बलाढ्य फळीचा सामना करावा लागणार असून त्यांचे काम नक्कीच आव्हानात्मक असणार आहे.

ऑलिम्पिक आणि जागतिक विजेत्यांचा समावेश असलेली एक अत्यंत स्पर्धात्मक फळी या स्पर्धेत उतरली आहे. या स्पर्धेत जगातील काही अत्यंत निष्णात खेळाडूंचा सहभाग असणार आहे. स्पर्धेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात पुरुष आणि महिला या दोन्ही गटांसाठी प्रत्येकी ७५ लक्ष्यांच्या फेरीने होईल; त्यानंतर ५० लक्ष्यांची फेरी आणि रविवारी अंतिम फेरी पार पडेल.

भारताने पुरुष आणि महिला या दोन्ही गटांत प्रत्येकी सहा खेळाडूंचा संघ स्पर्धेसाठी पाठवला आहे. याशिवाय दोन्ही गटांत प्रत्येकी दोन असे आणखी चार नेमबाज केवळ रँकिंग गुण मिळवण्यासाठी स्पर्धेत सहभागी होत आहेत.

भारतीय संघात ऑलिम्पियन नेमबाज महेश्वरी चौहान व सख्ख्या भगिनी असलेल्या दर्शना राठोड व यशस्वी राठोड यांचा समावेश आहे. या दोन भगिनींपैकी धाकटी असलेली यशस्वी, ६८ व्या राष्ट्रीय स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकावर राहिली होती; तसेच, गेल्या वर्षी शिमकेंट येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेच्या कनिष्ठ गटात तिने रौप्यपदकही पटकावले होते. अरीबा खान आणि मानसी रघुवंशी या देखील या स्पर्धेत सहभागी होत आहेत, परंतु त्या केवळ रँकिंग गुण मिळवण्यासाठीच खेळतील.

पुरुष गटाच्या स्पर्धेत एकूण ८२ खेळाडू सहभागी झाले आहेत.

भारताच्या आशा अनुभवी मन सिंग आणि परमपाल सिंग गुरोन यांच्यावर, तसेच वरिष्ठ आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण करणाऱ्या ज्योतीरादित्य सिंग सिसोदियावर अवलंबून असतील.

माजी आशियाई विजेता असलेला मन, तीन वर्षांनंतर संघात पुनरागमन करत आहे; तर परमपालने अखेरचे भारताचे प्रतिनिधित्व २०२२ मध्ये केले होते.

ज्योतीरादित्यने गेल्या वर्षी श्यमकेंट येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत कनिष्ठ गटात कांस्यपदक जिंकले होते. सुखबीर सिंग हरिका व कनिष्ठ राष्ट्रीय विजेता हरमेहर सिंग लाली हे रँकिंग गुण मिळवण्यासाठी स्पर्धा करतील.

ऑलिम्पिक विजेते, विश्वविजेते, अनुभवी अंतिम फेरीतील स्पर्धक आणि उदयोन्मुख गुणवान खेळाडूअसे सर्वजण या स्पर्धेत सहभागी होत असल्याने, या स्पर्धेद्वारे हंगामाची अत्यंत रोमांचक सुरुवात होईल अशी अपेक्षा आहे.

महिला गटात चिलीची विद्यमान ऑलिम्पिक विजेती फ्रान्सिस्का क्रोव्हेटो चादिद व अमेरिकेची जागतिक विजेती समंथा सिमोंटन या दोघी तसेच इटलीची दुहेरी ऑलिम्पिक आणि दुहेरी जागतिक विजेती डायना बाकोसी या गटातील प्रमुख आकर्षण आहेत.

पुरुष गटात डेन्मार्कचा २०१५ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील कांस्यपदक विजेता एमिल केल्डगार्ड पीटरसन तसेच गत विश्वचषक विजेता अमेरिकेचा ख्रिश्चन इलियट, इटलीचा दुहेरी ऑलिम्पिक विजेता गॅब्रिएल रोसेटी या गटातील प्रमुख खेळाडू आहे.

(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# बार्शी शहर व तालुक्यात अवकाळी पावसाचा तडाखा

### विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि, २६ मार्च-**

बार्शी शहर व तालुक्यातील बावी (आ), पिंपळगाव (ढाळे), साकत, महागांव तसेच आसपासच्या गावांमध्ये बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास अचानक विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली. ऐन उन्हाळ्यात पडलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांसमोर पुन्हा एकदा संकट उभे राहिले आहे.

**ज्वारी, द्राक्ष आणि कांदा पिकांचे नुकसान**

मार्च महिन्यात सामान्यतः कडक उन्हाळा असतो; मात्र अचानक आलेल्या या पावसामुळे शेतातील पिकांना मोठा फटका बसला आहे. सध्या ज्वारी काढणीचे दिवस सुरु असताना पावसामुळे शेतात पडलेली किंवा उभी असलेली ज्वारी भिजल्याने तिच्या गुणवत्तेवर परिणाम होऊन ज्वारी काळी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. द्राक्ष बागायतदारांनाही या पावसाचा मोठा फटका बसला आहे. तोडणीस तयार असलेल्या द्राक्षांच्या घडांवर पावसाचे पाणी पडल्याने द्राक्ष फुटण्याची व सडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तसेच अनेक शेतकऱ्यांनी कांदा काढून वाळवण्यासाठी शेतात किंवा माळावर टाकलेला असताना अचानक पावसामुळे कांदा भिजला असून त्यामुळे साठवण क्षमता कमी होऊन बाजारात त्याला कमी दर मिळण्याची शक्यता आहे.

या अवकाळी पावसामुळे तापमानात काही प्रमाणात घट होऊन नागरिकांना उन्हापासून तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस चिंतेचा विषय ठरला आहे. आधीच शेतीमालाला कमी भाव मिळत असताना त्यात पिकांचे नुकसान झाल्याने शेतीतील खर्च आणि उत्पन्न यातील तफावत अधिक वाढणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**बार्शी शहरातही सायंकाळी पाऊस**

बार्शी शहरात सुद्धा सायंकाळी सातच्या सुमारास हलक्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली आहे. तत्पूर्वी पाऊस सुरु होण्याच्या अगोदर वातावरणात हलक्या वाऱ्यासह आभाळ दाटून आलेले होते. हा पाऊस कमी जास्त प्रमाणात रात्री ९ वाजेपर्यंत चालू होता. या वेळेत महावितरणचा लपंडाव सुरु होता.

**शासनाकडून पंचनाम्याची मागणी**

पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे. स्थानिक प्रशासनाने परिस्थितीची दखल घेऊन पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्यास सुरुवात करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## पावसामुळे पिलीव परीसरात आंब्यासह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान

**तभा वृत्त सेवा**
**पिलीव, दि. २६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात बुधवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास विजेच्या प्रचंड कडकडासह व वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली यामुळे पिलीवसह, कुसमोड, बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी, चांदापुरी, झिंजेवस्ती या भागातील आंब्यांच्या बागाचे मोठ्या प्रमाणावर, तसेच गहु, हरभरा, मका, कडवळ, शेवगा या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

गेल्या आठवडयातही अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर पुन्हा एकदा हजेरी लावली. यामध्ये सर्वाधिक नुकसान आंब्यांच्या बागांचे तसेच गहु पिकाचे झाले आहे. दिवसभर प्रचंड ऊन व उकाडा जाणवत होता. रात्री उशीरापर्यंत विजा चमकत होत्या तर रात्री अकराच्या सुमारास जोरदार विजेच्या कडकडासह पावसाने हजेरी लावली. विज लाईटच्या तारांवर पडल्यामुळे



पिलीव परिसरातील सर्वच गावांचा बुधवारी रात्रीपासुन विजपुरवठा खंडीत झाला होता तो गुरूवारी दुपारी दोन वाजेपर्यंत खंडीत होता. महावितरणच्या कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन विजपुरवठा सुरळीत केला. यामुळे पिण्याचे पाणी तसेच जनावरांना पिण्याच्या पाण्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागला. दरम्यान झिंजेवस्ती येथील बाबुराव कदम यांच्या नारळाच्या झाडावर विज पडल्यामुळे झाड जळुन गेले. पिकांचे व फळबागांचे ताबडतोब पंचनामे करावेत, अशी मागणी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांमधुन होत आहे.

## महत्वाचे...



### स्वागत कमानीवर झेंडा लावताना विजेचा धक्का; तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

आनंदाच्या क्षणासाठी उभारलेल्या स्वागत कमानीनेच एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. कुमठा नाका परिसरातील स्वागतनगर रोडवर बुधवारी सायंकाळी घडलेल्या अपघातात तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. केतन रमेश पाटोळे (वय २४, रा. भारतनगर, कुमठा नाका असे मृत तरुणाचे नाव असून, तो अत्यंत मेहनती व सर्वांच्या मदतीला धावून जाणारा म्हणून ओळखला जात होता. गुरुवारी होणाऱ्या कार्यक्रमाच्या तयारीसाठी यशवंत सोसायटी, स्वागतनगर येथे मंडप उभारण्यात आला होता. त्याच मंडपासमोरील स्वागत कमानीवर झेंडा लावण्यासाठी केतन वर चढला होता.झेंड्यासाठी वापरलेल्या कापडाला जोडलेला स्टीलचा पाइप आणि कमानीच्या अगदी शेजारी असलेली विद्युत तार यांचा संपर्क आला आणि क्षणार्धात सर्व काही बदलून गेले. जोरदार विजेचा धक्का बसताच केतन सुमारे २० फूट उंचीवरून खाली कोसळला. हा थरारक प्रसंग पाहून आजूबाजूचे तरुण हादरून गेले.सोबत असलेल्या मित्राने तत्काळ आरडाओरडा करत मदतीसाठी धाव घेतली. उमेश पाटोळे यांनी केतनला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. घरातील कर्ता तरुण अशा अचानक निघून गेल्याने आईवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रुग्णालय परिसरात मित्र-नातेवाइकांची झालेली गर्दी आणि त्यांच्या डोळ्यातील अश्रू हीच या घटनेची तीव्रता सांगून जात होती.

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी मंडप कॉन्ट्रॅक्टरवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

एम एस ई बी ची विद्युत वाहिनी जात आहे. हे माहित असताना दि. २५ मार्च रोजी प्रशांत उर्फ जीवन विलास गायकवाड रा. वेणूगोपाल नगर, स्वागत नगर, कुमठा नाका, सोलापूर मंडप कॉन्ट्रॅक्टर याने उमेश भुजंग पाटोळे वय ४२, रा. भारत माता नगर, कुमठा नाका सोलापूर यांचा पुतण्या केशव पाटोळे वय २४ व श्रीशैल क्षीरसागर वय २८ या कामगारांना कामांवर चढवून जीविताचे, जखमीचे काम करावे लागत आहे, हे माहीत असताना सुद्धा सुरक्षेचे कोणतीही साहित्य न देता, त्यांचा विमा न उतरविता त्यांना मंडप व कमान उभारण्याचे कामास लावले त्यामुळे उमेश पाटोळे यांचा पुतण्या केतन पाटोळे हा स्टीलचे पाईप मध्ये रोवलेला झेंडा कमानीवर लावण्यासाठी वर चढला. कमानीच्यावर असलेले एम एस सी बी च्या मुख्य विद्युत तारेला झेंड्याचा स्टीलचा पाईप लागून त्यामधून विद्युत करंट लागून केतन पाटोळे हा कमानीवरून डोक्यावर खाली जमिनीवर पडून गंभीर जखमी झाला. तो उपचारापूर्वी मयत झाला. त्यामुळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात दि. २६ मार्च रोजी प्रशांत उर्फ जीवन विलास गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास गाढवे करत आहेत.

### रूम पाहण्यासाठी जात असताना झाला अपघात

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

भाड्याने रूम पाहण्यासाठी जात असताना दि. २४ मार्च रोजी गोविंद सुधाकर मुंडे (वय २७, रा. पीजी रेसिडेन्सी हॉस्टेल सोलापूर) व त्यांचा मित्र अशीष सूर्यवंशी असे दोघे कंपनीच्या दुचाकी क्रमांक एम एच १३ बीटी ९६०० वरून अशीष सूर्यवंशी शितलदेवी मंदिर बाजूच्या चौकात आले असता राज रवी धनीवाले वय २०, रा. स्लॅटर हाऊस, बापूजी नगर, सोलापूर यांच्या ताब्यातील वाहन हयगईने, निष्काळजीपणाने बेदरकारपणे, चालवून गोविंद मुंडे यांना जखमी केले. मित्र आशिष याला गंभीर जखम झाली करत दोन्ही वाहनाचे नुकसान होण्यास कारणीभूत झाल्याने दि. २५ मार्च रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मनोहर करत आहेत.

### त्या जबरी चोरीच्या घटनेनंतर भितीपोटी कुटूंबिय गेले निघून बाहेरगावी

**मंगळवेढा दि. २६ मार्च**

: शहरानजीक असलेल्या दामाजीनगर हद्दीत घरफोडी झाल्यानंतर कुटूंबिय भितीपोटी बाहेरगावी निघून गेले. दरम्यान चोरट्यांनी कुटूंबियांना चाकूचा धाक दाखवून सोने व रोख रक्कम जबरदस्तीने लुटल्याने ते कुटूंब भेदरले आहे. तसेच या परिसरात अन्य दोन ठिकाणी चोरट्यांनी घरफोडण्याचा प्रयत्न केल्याची माहिती मिळत आहे. दि.१७ मार्च रोजी यातील फिर्यादी अश्विनी हजारे व त्यांचा ११ वर्षाचा मुलगा जेवणखाण करुन रात्री झोपी गेले होते. रात्री २ ते २.१५ च्या दरम्यान तिघा चोरट्यांनी बंगल्याचे गेट उघडून आत प्रवेश केला. घराच्या मुख्य दरवाज्याच्या आतील कडी कोयंडा उचकटून त्यांनी प्रवेश करुन ११ वर्षाच्या मुलाला टॉमी मारुन उठविले. मुलाच्या ओरडण्यामुळे आई जागी झाली. या दोघांना तिघा चोरट्यांनी लांब लचक आणलेल्या मोठ्या चाकूचा धाक दाखवून पैसे व सोने कुठे ठेवले आहे सांगा म्हणाले. यावेळी फिर्यादीच्या गळ्याला चाकू लावून ९ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने चोरट्यांनी ओरबडून घेतले. यावेळी चोरट्यांनी फिर्यादीस व तिच्या मुलास आवाज कराल तर याद राखा अशी धमकीही दिली. तसेच फिर्यादी ह्या मोलमजुरी शेतावर करुन उपजिवीका जगत असल्याने इतर १० महिलांचा रोजगार ४ हजार ५०० त्यांच्याकडे होता. हे रोजगाराचे पैसे उशी खाली ठेवून फिर्यादी झोपल्या होत्या. या पैशावर ही चोरट्यांनी डल्ला मारला. चोरट्यांनी तोंडाला रुमाल बांधून कानटोप्या घातल्या होत्या त्या चॉकलेटी कलरच्या होत्या. अंगात बनियन व नाईट पँट असा पोशाख परिधान केल्याचे सांगण्यात आले. दरम्यान या जबरदस्तीच्या चोरीच्या घटनेमुळे या परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे. फिर्यादी चक्क भितीपोटी आपल्या मुलासह घराला कुलूप लावून चार दिवस बाहेरगावी निघून गेले होते. पोलीस प्रशासनाने रात्रीच्या वेळी पोलीस व्हॅन फिरवून या परिसरातील नागरिकांना भयमुक्त करुन त्यांना दिलासा दयावा अशी मागणी होत आहे. पोलीसांना ही चोरी उघड करणे अधिक महत्वाचे असून तरच चोरट्यावर पोलीसांचा जरब बसणार असल्याच्या प्रतिक्रीया या परिसरातील नागरिकाकडून व्यक्त होत आहेत.

## सारोळे येथे रामजन्मोत्सवाचा उत्साह

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २६ मार्च-**

संपूर्ण देशात प्रभू श्रीराम जन्मोत्सवाचा उत्साह असतानाच, बार्शी तालुक्यातील सारोळे येथे 'एकता महिला मंच'च्या वतीने एक अनोखा उपक्रम राबवून राम जन्मोत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. नरसिंह मंदिरासमोर साकारलेली प्रभू श्रीराम आणि माता सीता यांची विलोभनीय रांगोळी सध्या तालुक्यात आकर्षणाचे केंद्र ठरली आहे.

एकता महिला मंचच्या सदस्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक प्रभू श्रीराम आणि माता सीतेची भव्य आणि जिवंत वाटावी अशी रांगोळी साकारली. नरसिंह मंदिराच्या प्रांगणात ही कलाकृती पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. रांगोळीतील बारकावे



आणि रंगसंगतीने उपस्थितांची मने जिंकली. या उपक्रमाद्वारे महिलांनी आपली कला आणि भक्ती यांचा सुंदर मेळ घालून उत्सवाची शोभा वाढवली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी एकता महिला मंचच्या गीता पाटील, दमयंती कुलकर्णी, शोभा शिंदे यांच्यासह अन्य सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. रामायणातील आदर्श आणि रामराज्याची संकल्पना घराघरात पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

## मोडनिंब रेल्वे प्रश्नांवर आज रेल रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २६ मार्च-**

येथील ग्रामदैवत श्री वेताळ परिवार यांच्या वतीने मोडनिंब येथील रेल्वे संदर्भातील विविध प्रश्नांसाठी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. मोडनिंब येथे सर्व रेल्वे गाड्यांना थांबा देणे, बोगद्याचे काम करणे तसेच आरक्षण खिडकी सुरू करणे आदी प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन होत आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन मोडनिंब (ता. माढा) येथील रेल्वे संदर्भातील प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी मागणी केली. रेल रोको आंदोलन



बाबत माहिती दिली. दरम्यान, या मागण्यांबाबत आमदार अभिजीत पाटील यांनी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा व होणारे आंदोलन टाळावे, अशी मागणी केली आहे. त्यामुळे मोडनिंब परिसरात या प्रश्नांबाबत हालचालींना वेग आला असून प्रशासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता मोडनिंब ग्रामपंचायत कार्यालयापासून आंदोलनास सुरुवात होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वेताळ परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

**खासदारांकडून केंद्रीय मंत्र्यांची भेट**

या पार्श्वभूमीवर माढा लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन मोडनिंब येथील रेल्वे संदर्भातील प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी मागणी केली. तसेच दिनांक २७ मार्च रोजी रेल रोको आंदोलन बाबत माहिती दिली.

**तातडीने निर्णय घ्यावा आमदारांची मागणी**

दरम्यान, या मागण्यांबाबत आमदार अभिजीत पाटील यांनी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा व २७ मार्च रोजी होणारे आंदोलन टाळावे, अशी मागणी केली आहे. त्यामुळे संबंधित प्रश्नांवर लवकरात लवकर तोडगा निघावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मंगळवार बाजार मच्छी मार्केटमध्ये अतिक्रमणावर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ मार्च-**

मंगळवार बाजार मच्छी मार्केट येथे महानगरपालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने अतिक्रमित बेकायदेशीर खोक्यांवर धडक कारवाई करत तब्बल ७ खोके निष्कासित केले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली.

अतिक्रमण प्रतिबंधक विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांना कारवाई करण्यासंदर्भात पत्रान्वये सूचित करण्यात आले होते. त्यानुसार आज महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने कारवाई हाती घेतली मात्र, प्रत्यक्ष कारवाईवेळी कोणते खोके अधिकृत आणि कोणते बेकायदेशीर याबाबत स्पष्टता देण्यासाठी मंडई विभागाचे



संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी अनुपस्थित होते. यामुळे कारवाईदरम्यान मोठा गोंधळ निर्माण झाला.

ही कारवाई सुरू होताच अनेक खोकाधारकांनी जुने दंड भरल्याच्या पावत्या दाखवत आपले खोके अधिकृत असल्याचा दावा केला. यावर विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी कडक भूमिका घेत, जुने दंड भरल्याच्या पावत्या दाखवून कारवाई टाळता येणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला आणि मोहीम सुरूच ठेवली.दरम्यान, परिसरात नागरिकांची गर्दी जमली होती. उन्हाच्या कडाक्यात अधिकारी, कर्मचारी यांनी पोलीस बंदोबस्तात ही कारवाई केली. काही खोक्यांमध्ये ठेवलेल्या शेळ्यांना बाहेर काढताना कर्मचाऱ्यांना ओढाताण करावी लागली. कारवाईदरम्यान काही अनाधिकृत खोक्यांमधून बेकायदेशीरपणे वीज पुरवठा घेत असल्याचेही उघड झाले.

## डबल मर्डर प्रकरणी गणेश ढोबळे यांना उच्च न्यायालयात जामीन मंजूर

### आरोपीच्या वतीने ॲड. जयदिप माने यांनी पाहिले काम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

गुंजेगाव (ता. मंगळवेढा) येथे ११ मार्च २०२५ रोजी रिना आप्पासाहेब ढोबळे आणि चंद्रकांत तात्यासाहेब पाटील या दोघांचा पूर्ववैमनस्यावरुन लोखंडी कोयता, हातोडा व पाईपने मारुन खुन केल्याच्या आरोपावरुन अटकेत असलेला आरोपी गणेश लक्ष्मण ढोबळे (रा. गुंजेगाव ता. मंगळवेढा) याची मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच ने जामिनावर मुक्तता केली.

या प्रकरणाची हकीकत अशी की, मयत रिना ढोबळे हिचे पती पाच वर्षापुर्वी निधन पावले होते. त्यानंतर ती चंद्रकांत तात्यासाहेब पाटील याच्यासोबत राहत होती. तिचे व शेजारील शेतकरी लक्ष्मण ढोबळे यांचे पाईपलाईनच्या चेंबरच्या कारणावरुन वाद होता. याबाबत एकमेकांविरुध्द फिर्याद दाखल झाले होते.

त्यामुळे आलेल्या वैमनस्यामुळे लक्ष्मण ढोबळे, गणेश ढोबळे यांचेसह सातजणांनी रिना व चंद्रकांतचा ११ मार्च २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता खुन केल्याच्या आरोपावरुन मंगळवेढा पोलिसांनी दोषारोप पत्रक पाठवले होते. आरोपी गणेश ढोबळे याचा जामिन अर्ज पंढरपूर सेशन्स कोर्टानी फेटाळून लावला होता. त्यानंतर आरोपी गणेश ढोबळे यांचेतर्फे ॲड. जयदीप माने यांनी मुंबई उच्च न्यायालय कोल्हापुर सर्किट बेंचमध्ये जामीन अर्ज दाखल केला होता.

सुनावणी दरम्यान आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आरोपी गणेश ढोबळे याच्या सहभागाबद्दलच्या साक्षीदारांच्या विसंगती न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिल्या. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. एन. बी. पाटील यांनी काम पाहिले.

## दरोड्याच्या गुन्ह्यातील ४ आरोपींना २४ तासाच्या आत केली अटक

### सांगोला पोलीसांची दमदार कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२६ मार्च -**

शनिवार दि.२१ मार्च रोजी रा.११ वा.चे सुमारास सांगोला येथील पंढरपुर ब्रीजच्या पुढे थोड्या अंतरावर एका काळ्या रंगाची विना नंबरची थार गाडीतील अनोळखी इसमानी फिर्यादी दिलीप भागोजी पाटील (वय-५८), व्यवसाय-गाडीचे स्पेअर पार्टचे दुकान रा.भोगम कॉलनी, चिंचवड,

ता.करवीर, जि.कोल्हापुर यांचे गाडीला कट का मारला म्हणुन गाडी आडवी लावुन थांबवुन त्यातील चार अनोळखी इसमांनी फिर्यादीला दमदाटी व शिवीगाळ करुन फिर्यादीच्या डिकीतील दोन कपड्याच्या बॅगा व त्यामधील एका बॅगेमध्ये ठेवलेले २ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम असलेली बग व चालकाचे दोन मोबाईल फोन व फिर्यादीच्या पत्नीचे ओरिजनल आधारकार्ड, पॅनकार्ड, चार वेगवेगळ्या बँकांचे ए.टी.एम.कार्ड असे जबरदस्तीने चोरुन नेले होते.

याप्रकरणी सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी या गुन्ह्याच्या तपासकामी वेगवेगळी शोध पथके तयार करुन रवाना करण्यात आलेली होती. सदर पथकाने गोपनीय माहितीच्या व तांत्रिक पुराव्याच्या आधारे अज्ञात आरोपींची गोपनीय माहिती काढत सदर गुन्ह्यात वापरलेली विना नंबरची थार गाडीचा मालक गौशपाक उर्फ मुन्ना अब्दुलरजाक जमादार रा.कोरोची, कोल्हापुर यास गाडीसह ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने तसेच सदर गुन्ह्यातील फिर्यादीचा ड्रायव्हर रामचंद्र बापू सांळुखे (वय-४५), रा.गणेशनगर, मांगले ता.बत्तीस शिराळा जि.सांगली, सध्या रा.वळीवडे ता.करवीर, जि. कोल्हापूर हा मुख्य आरोपी व त्याचे सोबत संदिप बाबासो मेडगुळे (वय-३६), रा.शिवाजीनगर, कोरोची, ता.हातकणंगले जि.कोल्हापूर, महेश मारूती कांबळे (वय-३८), रा.उचगाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर, शिवाजी माळी, रा.कोल्हापुर यांनी मिळुन सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांना अटक करून न्यायालयात हजर केले असता दि.३० मार्च पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे.




सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे यांचे मार्गदर्शनाखालील सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांचे आदेशान्वये पोउपनि. चंद्रकांत पुजारी, सागर पाटील, पोहेकॉ.मच्छिद्र राजगे, दत्ता वजाळे, अस्लम काझी, पोकॉ. लक्ष्मण वाघमोडे, अमर पाटील तसेच सायबर पोलीस ठाणेचे पोकॉ.राहुल सोनकर यांनी केली.

## वाहनाने दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू; गुन्हा दाखल

**सोलापूर :** पुणे सोलापूर हायवे बाळे येथील अदिला नदीच्या पूलावर दि. १४ मार्च २०२६ रोजी दुपारी ३.४५ वाजता सोलापूर येथून फिर्यादीचे पती प्रविण अशोक नाईक वय ३९ वर्षे, तांबोळी गल्ली, शनी मंदिर रोड, खंडोबा चौक, ता. राहता, अहिल्यानगर हे मोटार सायकल क्र.एम.एच.३० व्ही २९०१ वरुन जात असताना त्यांना अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे, भरधाव वेगाने चालवून जोरात धडक दिल्याने त्यांच्या कपाळाला, छातीजवळ व सर्वांगास मुक्का मार लागुन ते जखमी झाल्याने त्यांच्यावर सिव्हील हॉस्पीटल सोलापूर येथे उपचार चालू असताना ते दि. १९ मार्च २०२६ रोजी मयत झाले आहेत. अज्ञात वाहन चालकाविरुध्द फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे.

## करमाळा शहराजवळ फिंरगाईनगर येथे घरफोडी; चोरट्यांनी केला ७० हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**करमाळा, दि. २६ मार्च-**

करमाळा तालुक्यातील फिरगाईनगर (दुधाट फ्लोटिंग परिसर) येथे अज्ञात चोरट्यांनी बंद घर फोडून सुमारे ७० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तुषार अमोल जाधव (वय २१, रा. सिंध्दार्थनगर, करमाळा) यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, त्यांचे फिरगाईनगर येथे एक रो हाऊस असून तेथे अधूनमधून कुटुंबीय राहण्यासाठी जातात. या घरात जुनी पितळेची भांडी तसेच साखरपुड्यासाठी खरेदी केलेले कपडे ठेवण्यात आले होते. २४ मार्च रोजी दुपारी सुमारास तक्रारदारांचे नातेवाईक वैभव शेलार हे संबंधित घराकडे गेले असता घराच्या पुढील दरवाज्याचा कडी-कोयंडा तुटलेला आढळला. त्यांनी याबाबत तक्रारदारांना माहिती दिली. तक्रारदार घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता घरात चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. शेजाऱ्यांकडून चौकशी केली असता मागील दोन दिवसांपासून घराचा मागील दरवाजा उघडा असल्याचे समोर आले.

या घरफोडीत सुमारे ४५ हजार रुपये किमतीचे कपडे (साड्या, शर्ट पीस, पँट पीस), १५ हजार रुपये किमतीची पितळेची भांडी (पाण्याचा बंब, डिनर सेट, घागर, कळशी आदी) तसेच १० हजार रुपये किमतीचा एलईडी टीव्ही असा एकूण ७० हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे.ही चोरी दि. २१ मार्च रोजी रात्री ८ वाजल्यापासून ते दि. २४ मार्च रोजी दुपारी ३ वाजेपर्यंतच्या कालावधीत घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अज्ञात चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून ही घरफोडी केली आहे.

या प्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक रणजीत माने यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. परिसरात वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# श्री अर्धनारी नटेश्वराचा विवाह सोहळा; भाविकांची उपस्थिती, फटाक्यांची आतषबाजी

## पूजेचे मानकरी गंगाधर होडगे व सौ. लता होडगे यांच्या हस्ते विधीवत पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २६ मार्च-**

वेळापूर नगरीचे आराध्य दैवत श्री अर्धनारी नटेश्वराचा विवाह सोहळा हजारो भाविकांच्या साक्षीने बुधवारी (दि. २५ मार्च) अत्यंत भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात पार पडला. मंदिर परिसरात विद्युत रोषणाई, फुलांची आकर्षक सजावट आणि फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे संपूर्ण परिसर भक्तीभावाने न्हाऊन निघाला होता.

अर्धनारी नटेश्वराच्या यात्रा सोहळ्याची सर्व तयारी आमदार उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आली होती. मंदिर परिसराच्या आत व बाहेर आकर्षक लाईटच्या माळा टाकून सुंदर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच विवाह सोहळ्याच्या निमित्ताने मंदिराच्या गाभाऱ्यासह संपूर्ण परिसर फुलांनी सजविण्यात आला होता.

रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास यात्रा सोहळ्याची सुरुवात झाली. यावेळी पूजेचे मानकरी गंगाधर होडगे व सौ. लता होडगे, यांचा मानाचा पोशाख शैलेश होडगे, प.स. सदस्या सौ. विमलताई जानकर, जि.प. सदस्या मिनाक्षी मिलींद सरतापे, प्रियांका आडत, रिपाई तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुसकर, रविराज गायकवाड, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे, यात्रा कमिटी अध्यक्ष काशिनाथ आडत, उपाध्यक्ष ॲड. विठ्ठल मंडले,



उपाध्यक्ष रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलीक, खजिनदार दादा तुपे, सरचिटणीस विनायक भगत, सचिव अभिजीत साठे, सेक्रेटरी विजय पवार, तसेच सदस्य मनोहर माने, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, नंदकुमार होडगे, शिवाजी मंडले, धनंजय शिवपुजे, वल्लभ देशपांडे, राहुल सराटे, शिवाजी सावंत, शंकर आडत, ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग तसेच होडगे परिवार व देशपांडे परिवार यांच्या उपस्थितीत मानाचा पोशाख देशपांडे यांच्या वाड्यातून वाजत-गाजत मिरवणुकीने अर्ध नारी नटेश्वराच्या मंदिरात

मानकरी गौरीशंकर गाढवे व अक्षय गाढवे यांनी मानाचा पोशाख मंदिरात आणला. विवाह सोहळ्यासाठी देवाला बाशिंग देण्याचा मान कै. सूर्यकांत माने देशमुख यांच्या घराण्याला असून मेटकरी यांनी त्यांच्या घराण्याकडून बाशिंग आणून मंदिरात अर्पण केले. तसेच पायातील चप्पल जोडीचे मानकरी रायचंद खाडे यांनी चप्पल जोड मंदिरात आणून दिली. त्याचबरोबर मणी मंगळसूत्र, जोडवी, पैंजण, अंगठी, सूप, टोपली, केरसुनी आदी वस्तूंचे मानकरी यांनी आपापल्या वस्तू मंदिरात आणून अर्पण केल्या. मानाच्या सर्व कावडी मंदिरात आल्यानंतर माळी समाजाची मानाची कावड वाजत-गाजत देवाच्या दारात आणण्यात आली. त्यानंतर रात्री अर्धनारी नटेश्वराच्या विवाह सोहळ्याच्या विधिवत पूजेला सुरुवात झाली.

यावेळी अर्धनारी नटेश्वर यात्रा सोहळ्याच्या पूजेचा मान असलेले गंगाधर होडगे व सौ. लता होडगे यांच्या हस्ते अर्धनारी नटेश्वराची पूजा करण्यात आली. अर्धनारी नटेश्वराला मानाचा पोशाख घालण्यात आला आणि पार्वती मातेस ओटी भरून बाशिंगे व मंडवळ्या बांधण्यात आल्या. यानंतर अक्षदा वाटण्याचा मान असणाऱ्या गाढवे परिवाराच्या वतीने शामराव गाढवे, गौरीशंकर गाढवे, अक्षय गाढवे, श्रीशैल गाढवे, सौ. सोनाली गाढवे, सौ. अदिती गाढवे, कल्याणी गाढवे यांनी महिला व पुरुष भाविकांना अक्षदा वाटल्या. त्यानंतर अर्धनारी नटेश्वरासमोर अंतरपाठ धरण्यात आला आणि मंगलाष्टिकांना सुरुवात झाली.

यावेळी विवेक जोशी, महेश स्वामी आणि रायचंद खाडे यांनी पाच मंगलाष्टिका म्हणत विवाह सोहळ्याचे मंगल वातावरण अधिकच पवित्र केले. शेवटच्या मंगलाष्टिकेनंतर भाविकांनी अर्धनारी नटेश्वरावर अक्षदा टाकल्या आणि रात्री १२ वाजून २९ मिनिटांनी अर्धनारी नटेश्वराचा विवाह सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

यानंतर यात्रा कमिटीच्या वतीने फटाक्यांची भव्य आतिषबाजी करण्यात आली. त्यानंतर अर्धनारी नटेश्वराची आरती करून विवाह सोहळ्याची सांगता करण्यात आली. या सोहळ्याचे पोरोहित्य गौरीहर गुरव, सतीश गुरव व रविराज गुरव यांनी केले.

या मंगलमय सोहळ्यास धवलसिंह मोहिते पाटील, अमृतभैय्या माने देशमुख, जीवन जानकर, धनंजय माने देशमुख, संजय मंडले, ओंकार माने देशमुख, भैय्या इनामदार, रायचंद खाडे, सौ. सीमा खाडे, सौ. अश्विनी भानवसे, काकासाहेब मेटकरी यांच्यासह हजारो महिला-पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, विवाह सोहळा शांततेत पार पडावा यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे व पोलीस उपनिरीक्षक प्रणोत कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

भक्ती, परंपरा आणि उत्साह यांचा संगम घडविणारा श्री अर्धनारी नटेश्वराचा हा विवाह सोहळा वेळापूर नगरीसाठी अविस्मरणीय ठरला.

### वरूण राजाचे विजेच्या कडकडाटासह सोहळ्यास उपस्थिती

अर्धनारी नटेश्वराच्या विवाह सोहळ्याची तयारी सुरू असताना रात्री १०:४० च्या सुमारास विजेचा कडकडाट होऊन वरूण राजाचे आगमन झाले. यावेळी मानाच्या कावडी पावसातच वाजत गाजत मंदिरामध्ये आल्या हा पाऊस अर्धा ते पाऊण तास पडल्याने विवाह सोहळ्यासाठी मंदिरे परिसरामध्ये उपस्थित असलेल्या महिला भाविक लहान मुले भिजल्याने सर्वांची तारांबळ उडाली यानंतर अनेक वेळा लाईट जाण्याचा लपंडाव सुरू होता यानंतर मात्र विवाह सोहळ्याच्या वेळेस वातावरण शांत होऊन विवाह सोहळा आनंदीमय वातावरणात संपन्न झाला

## थोडक्यात...

### देवकार्य करून बैलगाडीने घराकडे जाताना अपघात; १ महिला, २ बैल जागीच ठार

**सांगोला,दि.२६ मार्च -**

सांगोला तालुक्यातील भाविक बिरोबा देवस्थान आरेवाडी ता.कवठेमहंकाळ जि.सांगली येथे दर वर्षी चैत्र महिन्यात बैलगाडीने देवकार्या करिता जात-येत असतात. त्याप्रमाणे मेटकरवाडी, महुद येथील महादेव सुखदेव मेटकरी हे त्यांची पत्नी शालन व नात ऋतुजा असे रविवार दि.२२ मार्च रोजी सकाळी आरेवाडी ता.कवठेमहंकाळ येथे बिरोबा यात्रे निमित्त बैलगाडीने गेले होते. बुधवार दि.२५ मार्च रोजी रा.८ वा.चे सुमारास बिरोबा यात्रेच्या परतीच्या प्रवासाच्या भाविकाच्या दोन बैलगाड्या सांगोला ते महुद रोडवरून त्यांचे साईडने जात असताना वाकी शिवणेच्या हायस्कुल समोर टाटा इन्ट्रा कंपनीचे बिगर नंबरचे चारचाकी वाहनावरील चालक पृथ्वीराज पांडुरंग लेंगरे रा.महुद, ता.सांगोला याने त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन भरधाव वेगात, हयगयीने आणि बेदरकारपणे चालवुन समोरील बैलगाड्यांना पाठीमागुन जोराची धडक दिली. या अपघातामध्ये शालन महादेव मेटकरी (वय-५०) रा.महुद, ता.सांगोला ह्या उपचारापुर्वीच मयत झाल्या. तसेच महादेव सुखदेव मेटकरी (वय-६०), ऋतुजा दादासो मेटकरी (वय-७) व दुसऱ्या बैलगाडीतील कल्पना गणपत रूपनर (वय-५५), युवराज बिरूदेव रूपनर (वय-१२), गणपत् धोंडीराम रूपनर (वय- ६५) सर्व रा.महुद, ता.सांगोला, जि.सोलापूर हे गंभीर व किरकोळ जखमी झाले. तसेच दोन्ही बैलगाड्यांचे दोन बैल गंभीर जखमी व दोन बैल जागीच मयत झाले. याबाबत देवीदास मेटकरी, रा.मेटकरवाडी, महुद, ता.सांगोला जि.सोलापुर यांनी सांगोला पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे.

### अल्पवयीन मुलीचा पाठलाग; तरुणाविरुध्द गुन्हा

**बार्शी, दि.२६ मार्च-**

येथील एका अल्पवयीन मुलीचा पाठलाग करुन तिला त्रास दिल्याप्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात एका तरुणाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इयत्ता आठवीत शिक्षण घेणाऱ्या १३ वर्षीय मुलीचा मागील दोन महिन्यांपासून एका तरुणाकडून शाळेत ये-जा करताना पाठलाग केला जात होता. संबंधित तरुणाने मुलीशी जबरदस्तीने संपर्क साधण्याचा प्रयत्न करत तिच्यावर प्रेम व्यक्त केले व मोबाईल क्रमांक देऊन संपर्क करण्यास भाग पाडले. मुलीने त्याकडे दुर्लक्ष केल्यानंतर फोन नाही केला तर स्वतःचे नुकसान करेन, अशी धमकी देण्यात आल्याने ती भीतीपोटी त्याच्याशी फोनवर बोलत होती, अशी माहिती समोर आली आहे.

### व्हीव्हीपी अभियांत्रिकीमध्ये विझोटेक राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धेचे आयोजन

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने व्हीव्हीपी अभियांत्रिकी महाविद्यालय, व्हीव्हीपी तंत्रनिकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि.२८ मार्च २०२६ रोजी विझोटेक २०२६ राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अमोल चव्हाण यांनी पत्रपरिषदेत दिली. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते, महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात येणार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना प्रकल्प सादर करण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्रसह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तमिळनाडू आदी राज्यांमधून प्रतिसाद मिळत आहे. विजेत्यांना रोख बक्षिसे, प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत, असे प्राचार्यद्वय डॉ.अरुण गायकवाड, डॉ.सुनीलदत्त कुलकर्णी यांनी सांगितले. या पत्रपरिषदेस प्रा.स्नेहल मांजरे, प्रा.अनिल अवदूत, प्रा.आर.वाय. बिराजदार आदी उपस्थित होते.

### मंगेश मोरे यांना 'शिक्षणशास्त्र' विषयात पीएच.डी.

**बार्शी, दि.२७ मार्च**



दत्त प्राथमिक विद्यामंदिर येथील शिक्षक मंगेश मधुकर मोरे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. ही पदवी प्रदान करण्यात आली. 'प्राथमिक स्तरावरील मूल्यमापनातील नवप्रवाहाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी माहिती तंत्रज्ञान सहाय्यित कार्यक्रमाचे विकसन' हा त्यांचा संशोधनाचा विषय होता. प्रा.डॉ.एम.एस. डिसले यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा.डॉ.संतोष खिराडे तर कमिटी चेअरमन प्रा.डॉ. आर.एस. हिरेमठ यांनी कार्य केले.

## अवकाळीची टांगती तलवार, तापमानात होतेय वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

गेल्या दोन दिवसांपासून दुपारी उन्हाचा चटका पुन्हा चांगलाच वाढला आणि यामुळेच आज गुरूवार, दि. २६ मार्च रोजी ३९.४ अंश सेल्सियस इतकी नोंद झाली. मध्यंतरी आभाळी वातावरण निर्माण झाल्याने तापमानाचा पारा खाली आला होता मात्र गेल्या ४ दिवसांपासून सोलापुरात पुन्हा तापमानाचा पारा हळूहळू चढत आहे. एकीकडे हवामान खात्याकडून विजांच्या कडकडाटात अवकाळी पावसाचा इशारा देण्यात येत आहे; तर दुसरीकडे तापमानातही हळूहळू वाढ होत असल्याचे दिसून येते आहे. यामुळे सोलापूरकर दिवसभर घामाघूम होत असून, दुपारी थंड पेयांच्या दुकानांवर गर्दी दिसून येत आहे.



मार्च महिन्याच्या पहिल्या दिवसांपासूनच यंदा तापमानात वाढ होत आहे. २८ फेब्रुवारीपर्यंत ३५ अंश ते ३६ अंशापर्यंत हा पारा वाढत गेला. दरम्यान, १ मार्च रोजी पुन्हा तापमान वाढून तो थेट ३७.२ अंशावर गेला होता. मार्च महिन्यात तापमानाचा पारा चढताच होता मात्र मध्यंतरी आभाळी वातावरण निर्माण झाल्याने तापमानाचा पारा खाली आला. १७ मार्च रोजी तर ३९ अंशाच्या घरात तापमान होते. यानंतर काही दिवस ३६ ते ३७ अंशावर तापमानाचा पारा होता. आता पुन्हा ३८, ३९ अंशाच्या घरात तापमान गेले आहे. यामुळे दुपारी उष्णता जाणवत होती.

दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढणार असल्याने दुपारी १२ ते ४ या वेळेत नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असेही प्रशासनाच्या आपत्ती विभागाकडून सांगण्यात येत आहे. भरपूर पाणी प्या आणि कडक उन्हापासून संरक्षण करण्याचीही गरज आहे. दरवर्षी सोलापुरात एप्रिल-मेच्या दरम्यान ४० ते ४४ अंशाच्या घरात तापमान जात असते. यामुळे अनेक नागरिक आता दुपारच्या वेळात छत्री बाहेर घेवून जाताना दिसतात. तर थंड पेयांच्या गाडीवर, दुकानात मोठी गर्दी दिसते. पाणी थंड ठेवणाऱ्या गरिबांचे फ्रीज म्हणजेच माठांचीही विक्री या एक-दोन महिन्यात मोठ्या प्रमाणात होते.

## सोलापूरसह १४ जिल्ह्यात यलो अलर्ट जारी

### आपत्ती विभाग अलर्ट मोडवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

महाराष्ट्रात सध्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीचे मोठे संकट घोंघावत आहे. हवामान विभागाने पुढील २४ तासांत सोलापूरसह राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे.

सोलापूरसह चंद्रपूर, सोलापूर, धाराशिव, लातूर या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. सोलापूरचा आपत्ती विभागही अलर्ट मोडवर आला आहे. हातातोंडाशी आलेल्या पिकांचे नुकसान होण्याचा अंदाजही व्यक्त केला जात आहे.



वारा ४०-५० किमी ताशी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्र: हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याची शक्यता आहे, मात्र काही ठिकाणी तुरळक पाऊस पडू शकतो, असेही हवामान विभागाकडून सांगण्यात आले.

अवकाळी पावसामुळे शेतीसह पिकांचे नुकसान झाल्याने बळीराजावर संकट कोसळलं आहे. त्यातच आता हवामान विभागाने अवकाळी पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे शेतकरी धास्तावला गेल्याचे दिसून येत आहे.



## दिगंबर मुनीनाथ भजनाने भाविक भक्त झाले मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

श्री दिगंबर मुनीनाथ महाराजांच्या ५० व्या पुण्यतिथी महोत्सवात दुसऱ्या दिवशी श्री सिद्धारूढ भजनी मंडळाने हरी जागर भक्तीगीतांचा भजन सादर केले आणि उपस्थित भाविक मंडळी मंत्रमुग्ध झाली.

श्री दिगंबर मुनीनाथ महाराजांच्या ५० व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त दुसऱ्या दिवशी श्री सिद्धारूढ भजनी मंडळाने तेलुगु, मराठी, कन्नड, हिंदी या सर्व भाषेतील भावगीते सादर करून हरिजागर कार्यक्रम केला. यावेळी विशेष करून श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त दत्ता दिगंबरा यावो स्वामी मला भेट द्यावो हे स्वामी समर्थांचे भक्तीगीत सादर करून भाविकांची मने जिंकली

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीचे नागार्जुन कुसुरकर, मुनीनाथ कारमपुरी, कौशल्या मुसकुर, प्रियंका कुसुरकर, पवित्रा कारमपुरी, सांस्कृतिक मंडळाचे श्रीनिवास चिलवेरी, श्रीनिवास कुसुरकर ,नागनाथ कारमपुरी, अनुसूया कारमपुरी यांच्यासह भाविक भक्तांनी विशेष परिश्रम घेतले. पहाटे ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत चाललेल्या हरिकीर्तनात लक्ष्मण देविदास, अनिता देविदास, बाळू मदनाल, सिद्राम पोला, धीरज देविदास,राकेश देविदास,बालाजी कोटा, वासुदेव येलदंडी यांच्यासह भजनी मंडळाचे कलाकार व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंद्रूपमधील मंडळ कृषी कार्यालय तीन महिन्यांपासून बंद

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २६ मार्च -**

मंद्रूप येथील मंडळ कृषी कार्यालय तीन महिन्यांपासून बंद आहे. विविध योजनांचे लाभ घेण्यासाठी व अर्ज देण्यासाठी शेतकरी कार्यालयाला हेलपाटे मारत आहेत. कार्यालय बंद असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाया जात आहे.

सीना भीमा खोऱ्यातील शेतकऱ्यांसाठी मंद्रूप मंडळ कृषी कार्यालय सुरु करण्यात आला आहे. शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे व त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम मंद्रूप मंडळ कृषी कार्यालयामधून करण्यात येते.



या कार्यालयात मंडळ कृषी अधिकारी म्हणून किरण सावंत यांची नेमणूक झाल्यापासून दोन वर्षात क्वचितच कार्यालय सुरू असल्याचे दिसून येते. याबाबत वारंवार त्यांच्याकडे विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याचे सांगण्यात येते. मार्चअखेरला विविध योजनांच्या लाभाचे अनुदान देण्यात येते. यासाठी अनेक गावातील शेतकरी कार्यालयाला आले असता कार्यालय बंद दिसून येत आहे. याबाबत कृषी सहायकांकडे विचारणा केल्यानंतर मंडळ कृषी कार्यालय असल्याचे सांगत जबाबदारी झटकत आहेत.

मंद्रूप मंडलाचे कृषी अधिकारी किरण सावंत यांना याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, मंद्रूप मंडळ कृषी कार्यालयाबरोबर बोरामणी मंडळ कार्यालयाचाही अतिरिक्त पदभार आहे. दोन्ही कार्यालयाच्या काम काजामुळे मंद्रूप कार्यालय बंद आहे.

## महिला सक्षमीकरणसह विविध योजनांसाठी तरतूद करावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

पुणे महानगर पालिकेप्रमाणे सोलापूर महानगरपालिका यांच्याकडून महिला सक्षमीकरण व इतर विविध योजनेची आर्थिक अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात यावी, अशी मागणी अहिल्यादेवी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने धोंडप्पा रुपनुरे यांनी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली. महिलांच्या मालकी हक्क असलेल्या घरांना मालमत्ता करात भरीव सूट द्यावी. ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना भाड्यात ५० टक्के सवलत मिळावी. ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना एसएमटीच्या मोफत प्रवास मिळावा. स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्रकडून प्रशिक्षण मिळावे, असेही या निवेदनात नमूद आहे.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बिडवे अभियांत्रिकीच्या कार्यशाळेस प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : येथील एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात इंडो जर्मन टूल रूम,छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता जागरूकता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली.

सुरज चंचलानी,डायरेक्टर सीबीएफसी लिमिटेड यांनी विद्यार्थ्यांना या विषयावर मार्गदर्शन केले तसेच शासनामार्फत चालवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली ज्यामुळे हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरले. तसेच विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी शोधण्यासाठी मोलाचे ज्ञान आणि प्रेरणा मिळाली.

या कार्यशाळेत अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा.श्रीकांत नागुरे,डॉ. ओमप्रकाश शिवपुजे,श्री संतोष सांगवे तसेच समन्वयक प्रा.राहुल व्यवहारे, प्रा. सुरज बिराजदार यांनी सर्व प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली.



## विविध वृत्त...

### फरार आरोपीस अटक

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : लातूर जिल्हा पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेकडून फरार आरोपींच्या शोधासाठी सातत्याने विशेष मोहिम राबविण्यात येत असून, त्या अनुषंगाने एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. मागील तब्बल १३ वर्षांपासून फरार असलेला आणि विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये पाहिजे असलेला आरोपी पुणे येथून जेरबंद करण्यात आला आहे.

किल्लारी व गांधी चौक पोलीस ठाणे लातूर येथील गंभीर गुन्ह्यांतील पाहिजे आरोपी दयानंद पांडुरंग देडे (वय ३६ वर्षे, रा. नांदुर्गा ता. औसा जि. लातूर) हा मागील १३ वर्षांपासून फरार होता. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक फौजदार सर्जेराव जगताप यांनी शोध घेण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली. या पथकामध्ये साहेबराव हाके, अर्जुन राजपूत, राजेश कंचे, मनोज खोसे, शैलेश सुडे यांचा समावेश होता. मिळालेल्या माहितीनुसार पथकाने तत्काळ हालचाल करत पुणे येथे जाऊन गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीचा शोध घेतला. सखोल तपास व नियोजनपूर्वक केलेल्या कारवाईदरम्यान आरोपी हा नागेश्र्वर कॉलनी, मोशी, ता. हवेली, जि. पुणे येथे आढळून आला. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत त्यास ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस ठाणे किल्लारी

### बाजारात टरबुजाची आवक वाढली

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : येथील बाजारात टरबूज, खरबुजाची आवक वाढली असून, त्यांचे दर घसरले आहेत. उन्हाची तीव्रता वाढली असली तरी चांगल्या दर्जाच्या टरबुजाचे वाढले नाहीत. दर्जेदार किलो–दीड किलोचे टरबूज शंभर रुपयाला तीन नग दिले जात आहे.

दर सर्वसामान्य ग्राहकांच्या आवाक्यात आल्याने खरेदी वाढली आहे. शहरातील विविध रस्त्यावर टरबुजाची दुकाने थाटण्यात आली आहेत.

### 'चन्नबसवेश्वर 'च्या मुलींना दिले प्रशिक्षण

तभा वृत्तसेवा


लातूर, दि. २६ मार्च : येथील चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने महापालिकेच्या पीएमश्री सावित्रीबाई फुले शाळा क्र. ९ येथे हरघर दुर्गा हे स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यात आले.

मुलींमध्ये वैयक्तिक सुरक्षिततेबाबत जागरुकता निर्माण करणे, त्यांना मूलभूत स्वसंरक्षण कौशल्य देणे हे या प्रशिक्षणाचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. मुलींना धनश्री मदने हिने प्रशिक्षण दिले. यावेळी मुख्याध्यापक एस. पी. शिंदे, महेश माणके, डॉ. ऐश्र्वर्या इरलापल्ले यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे संस्थेचे सचिव भीमाशंकर देवणीकर, विश्र्वस्त विजयकुमार मठपती, अरुण हलकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी आदींनी कौतुक केले आहे.

## अचूक जनगणनेसाठी सजग राहून काम करा : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : ज्याप्रमाणे निवडणुकांचे आयोजन महत्त्वाचे असते, त्याचप्रमाणे जनगणना ही प्रक्रिया देखील देशासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मूल्यमापन करणाऱ्या या प्रक्रियेतूनच देशाच्या विकासाचा खरा रोडमॅप तयार होतो. त्यामुळे जनगणनेच्या कामात सर्वांनी सजग राहून, अचूक नियोजन करावे आणि कोणतीही दिरंगाई करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी दिले.



भारताची जनगणना २०२७ अंतर्गत तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांच्या दुसऱ्या टप्प्यातील तीन दिवसीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. या सत्राच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या प्रशिक्षण सत्राला जनगणना संचालनालयाचे सहसंचालक रमेश भोसले, मिलिंद पाटील, लातूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा जनगणना समन्वयक विठ्ठल परब यांच्यासह जिल्ह्यातील २३ चार्ज अधिकारी आणि १०६ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ते देशाचे सामाजिक आणि आर्थिक प्रतिबिंब आहे. प्रत्येक घर आणि प्रत्येक कुटुंब जनगणनेत समाविष्ट होईल याची दक्षता घ्यावी. प्रगणकांनी अचूक काम करावे यासाठी त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रगणकांनी लोकांशी संवाद साधताना सकारात्मक राहावे, जेणेकरून जनतेचा प्रत्यक्ष सहभाग वाढेल. सर्व चार्ज अधिकारी आणि प्रशिक्षणार्थींनी आपापसात समन्वय ठेवून हे काम यशस्वी करावे. दहा वर्षांनंतर येणारी ही जनगणनेची प्रक्रिया देशसेवेची एक मोठी संधी आहे. प्रशिक्षणातील सूक्ष्म गोष्टी समजून घ्या आणि कोणतीही समस्या असल्यास त्याचे वेळीच निरसन करून घ्या. या कामात कसलाही हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जनगणना संचालनालयाचे सहसंचालक रमेश भोसले यांनी उपस्थितांना तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणना कायदा, चार्ज अधिकारी यांची वैयक्तिक जबाबदारी, घरांची निवड, इमारतींना क्रमांक देण्याची पद्धत आणि जनगणनेतील विविध टप्प्यांची सविस्तर माहिती दिली.

### जि.प. अधिकाऱ्यांच्या गाड्या पदाधिकाऱ्यांना

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : झेड. पी. अधिकाऱ्यांच्या गाड्या पदाधिकाऱ्यांना दिल्या जात असल्याने अधिकाऱ्यांची मोठी अडचण होत आहे. झेड. पी. पदाधिकाऱ्यांना त्यांच्या मनावर वाहने पुरवावी लागतात. त्यांना ज्या गाड्या पाहिजेत, त्या दिल्या गेल्या पाहिजेत, असा संकेत आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांकडील गाड्या पदाधिकाऱ्यांच्य दिमतीला दिल्या जात असल्याने अधिकाऱ्यांची पंचाईत होत आहे. झेड. पी.कडे चारचाकी गाड्या असल्या तरी गेल्या चार वर्षांत पदाधिकाऱ्यांसाठी असलेल्या गाड्या अधिकारी वापरत होते. आता पदाधिकारी आल्याने त्यांना उपलब्ध गाड्यांची माहिती देऊन ते मागतील ती वाहने पुरवण्याची जबाबदारी झेड. पी. प्रशासनाची असते. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही सुरू केली.

परिणामी, अधिकाऱ्यांना चार वर्षांत पदाधिकारी नसल्याने आवडीच्या गाड्या पदाधिकाऱ्यांच्या हिस्स्याला जात आहेत. झेड. पी.च्या मालकीच्या गाड्या कमी असल्या तरी भाडेतत्त्वावर गाड्या घेऊन त्या पुरविण्याची जबाबदारी झेड. पी.ला पार पाडावी लागते. आणखी सभापती यायचे आहेत. त्यांनाही चारचाकी गाड्या पुरविल्या पाहिजेत. अधिकाऱ्यांना वाहने आता भाड्याने घ्यावी लागणार आहेत, अशी परिस्थिती दिसत आहे.

## लातुरात दोन दिवसीय ' मानसरंग' नाट्य महोत्सवाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : लातुरात दि. २८ व २९ मार्च २०२६ रोजी मानसिक आरोग्याच्या विविध पैलूंवर भाष्य करणाऱ्या ' मानसरंग ' नाट्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च सेंटरचे संचालक – लातूरचे ख्यातनाम मानसोपचार तज्ञ डॉ. मिलिंद पोतदार यांनी दिली. या नाट्यमहोत्सवात दोन दिवसांमध्ये एकूण चार नाटके सादर होणार आहेत.

शनिवार, दि. २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता संत तुकाराम महाराज यांचा सामान्य माणूस ते भक्त, भक्त ते देव व देवत्वापर्यंतचा प्रवास प्रेक्षकांसमोर मांडणारे ' आनंदओवरी' हे नाटक होणार आहे. यामध्ये डॉ. मिलिंद पोतदार यांची भूमिका पाहायला मिळणार आहे. प्रख्यात लेखक दि. बा. मोकाशी यांनी लिहिलेल्या कथानकाची नाट्य आवृत्ती अतुल पेठे यांनी केली आहे. या नाटकाचे दिग्दर्शन श्रुतिकांत ठाकूर यांनी केले आहे. दुपारी अडीच वाजता लेखक च.प्र. देशपांडे यांनी लिहिलेले व अभिजित झुंजारराव यांनी दिग्दर्शित केलेले 'मन' हे नाटक सादर होईल. यंत्रमेश वाणी यांनी भूमिका साकारली आहे. रविवार, दि. २९ मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता ' मग तू मला खा'हे नाटक सादर होणार आहे. लेखन व दिग्दर्शन विभावरी देशपांडे यांनी केले आहे. या नाटकात अनन्या रत्नपारखे, दीप मेहंदळे, गौतमी अहेर , वेदांत रानडे, हर्षद राजपाठक, ऋचा आपटे यांचा अभिनय पाहायला मिळणार आहे. तर रविवारी दुपारी अडीच वाजता 'तो राजहंस एक ' हे नाटक होणार आहे. या नाटकाचे लेखक दत्ता पाटील हे असून दिग्दर्शन सचिन शिंदे यांनी केले आहे. या नाटकामध्ये प्राजक्त देशमुख, अमेय बर्वे, धनंजय गोसावी, हेमंत महाजन व अनिता दाते हे कलाकार आपले कलाविष्कार सादर करणार आहेत.

प्रत्येक नाटकांच्या सादरीकरणानंतर त्यातील कलाकार, लेखक , दिग्दर्शक व मानसोपचार तज्ञ यांचे चर्चासत्रही होणार आहे. त्यामध्ये मानसिक आरोग्याचे विविध पैलू उलगडले जाणार आहेत. हा नाट्यमहोत्सव विनामूल्य असला तरी त्यासाठी आगाऊ नोंदणी करणे व प्रवेश पत्रिका असणे बंधनकारक असल्याचे डॉ. मिलिंद पोतदार यांनी सांगितले.

या नाट्य महोत्सवाचे आयोजक सोसायटी फॉर वेलबिइंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन ( स्वर ), अंतरंग व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र आणि सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च सेंटर हे आहेत.

## डॉ. राम बोरगावकर यांना संगीतरत्न पुरस्कार प्रदान



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : मानव सेवा प्रतिष्ठान शेल्हाळ ता. उदगीर येथे आयोजित राज्यस्तरीय भजन स्पर्धा महोत्सवात लातूरचे ज्येष्ठ संगीतज्ज्ञ तालमणी डॉ. राम बोरगावकर यांना मानव सेवा प्रतिष्ठानच्या वतीने पंढरपूर येथील विठ्ठल–रुक्मिणी मंदिर संस्थानचे सहअध्यक्ष ह. भ. प. गहिनीनाथ महाराज औसेकर व माजी मंत्री, आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते राज्यस्तरीय संगीतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश लांडगे, उपाध्यक्ष हंसराज हुलसुरे, उदगीरचे तहसीलदार राम नागोराव बोरगावकर, उदगीरच्या नगराध्यक्षा स्वाती हुडे यांचेसह मानव सेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. त्या पुरस्काराबद्दल तुकाराम पाटील, प्रा. शिवराज मोटेगावकर, संदिपान माने, वनिता काळे, अँड.दासराव शिरुरे, प्राचार्य बाबुराव जाधव, प्राचार्य निलेश राजेमाने, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा. विश्र्वनाथ स्वामी, प्राचार्य डॉ. गोरे, डॉ. पवार, डॉ. शिंदे यांचेसह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### लातुरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : येथील श्री संत ज्ञानेश्र्वर विकास मंडळाच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह, श्री ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी पारायण, हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २६ मार्च ते ३ एप्रिल यादरम्यान विविध कार्यक्रम होणार आहेत. कलश स्थापना हभप रामकृष्णाचार्य महाराज हलगरकर यांच्या हस्ते होणार आहे. ज्ञानेश्र्वरीचे पारायण हभप धनराज महाराज डोंगरगावकर तर विष्णूनामजप हभप नरसिंह गोविंदराव गोणे हे करणार आहेत. २६ मार्च रोजी हभप मोहनदास महाराज हिप्परगे यांचे कीर्तन, हभप जयश्री मोरे यांचे प्रवचन होणार आहे. या सप्ताहात हभप बंडा महाराज अलगरवाडीकर, चंद्रशेखर महाराज देगलूरकर, चांगदेव महाराज गुंडाळे आलंदी देवाची विठ्ठल महाराज दिवेगावकर, धनंजय महाराज जोशी शेगाव, अविनाश महाराज रुबदे यांचे कीर्तन तर आचार्य यशपाल पाटील, सुगावकर, वेणूमाधव जोशी, ज्ञानोबा माऊली महाराज मळवटी, संभाजी पांचाल, गणपतराव ब बाजुळगे महाराज यांचे प्रवचन होणार आहे. ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी ग्रंथ मिरवणूक १ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता निघणार आहे. २ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम त्यानंतर हभप ी सलगरकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

## ह. भ. प. गुरूबाबा महाराज यांच्या कीर्तनास भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : शहरातील प्रकाशनगरमधील श्री दत्त मंदिर येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी पारायण सोहळ्यात ह.भ.प. गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या कीर्तनास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बुधवार, दि. २५ मार्च रोजी रात्री ८.१५ वाजता पार पडलेल्या या कीर्तनात मोठ्या संख्येने भक्तांनी उपस्थित राहून हरिनामाचा लाभ घेतला.

गुरुबाबा महाराजांनी आपल्या ओजस्वी वाणीने, अभंग–भजनांच्या सादरीकरणातून आणि प्रभावी निरूपणातून उपस्थितांना अध्यात्मिक संदेश दिला. त्यांच्या कीर्तनादरम्यान संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. भक्तिमय वातावरणात भाविकांनी तल्लीन होऊन सहभाग नोंदविला.



दि. २३ मार्च २०२६ पासून सुरू झालेला हा अखंड हरिनाम सप्ताह दि. ३० मार्च २०२६ पर्यंत चालणार असून या सप्ताहाचा समारोप दि. ३० मार्च रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत होणाऱ्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

या धार्मिक सोहळ्याचे आयोजन अध्यक्ष ज्ञानोबा साळुंके व उपाध्यक्ष दादासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून या उपक्रमात नेताजी साठे, रामकृष्ण धोत्रे, रामदास सारगे, डी. व्ही. कुलकर्णी, राजकुमार रोंगे, सतीश साळुंके, मोहन सूर्यवंशी, धर्मेंद्र शिंदे, ज्ञानेश्र्वर कातळे, तुकाराम साळ–के, सूर्यकांत गुठे, पांडुरंग देशमुख, संतोष माने, बापू सारोळकर, मधुकर नागरगोजे, अँड. पांडुरंग घोडके, अँड. राजेंद्र काळे, उमाकांत गोरे, अंकुश कदम, गोविंद थोरात, रामराव शिंदे, निवृत्ती साळुंके, सोपानराव साळुंके, रावसाहेब जाधव, बळीराम गिराम, दिगंबर माळी, अभंग चव्हाण, गोरख लोखंडे, अतुल माने, धनंजय शिंदे, गजानन साळुंके, श्रीकांत कातळे, धनंजय अवस्कर, पिंटू वनारसे, संतोष यादव, योगेश इंगळे, शिवराज मुंडे, शक्ती थळकरी, रोहना अलमले, कादरे, वाडकर आदींचा सहभाग आहे.

### उष्माघात टाळण्यासाठी उपाययोजना आवश्यक

# उन्हाळ्यातील वाढत्या तापमानात 'आरोग्य' सांभाळा...!

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : सध्या वातावरणातील होणाऱ्या बदलामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे हवामान खात्याच्या अंदाजानुसार मार्च महिन्यापासुनच आपण राज्यातील अनेक भागात तापमान वाढताना पाहत आहोत. सर्व साधारणपणे एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ अंश सेल्शियसने जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात किंवा सलग दोन दिवस एखाद्या भागात तापमान ४५ अंश सेल्शियस पेक्षा जास्त असेल तर त्याभागात उष्णतेची लाट आली असे म्हटले जाते. सर्वसाधारणपणे सन बर्न, हिट क्रैम्प्स (उष्णतेमुळे स्नायुंना गोळे येणे), हिट एग्जोर्शन (उष्णतेमुळे प्रचंड थकवा), हिट स्ट्रोक (उष्माघात) यांसारखे प्रामुख्याने उष्णताविकार असून साधारण एप्रिल, मे या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होत असतो. त्यामुळे आरोग्य सांभाळा, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहेत.

टाळण्यासाठी उष्माघात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पुर से पाणी प्या, प्रवासात पाणी सोबत ठेवा, हलक्या वजनाचे फिकट रंगाचे (पांढरे) सैलसर कपडे वापर. उन्हात चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणे वापर, ओलसर पडदे (वाळ्याचे), पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा. शक्य असल्यास उन्हात जाण्यापुर्वी सनस्क्रिन क्रिम वापरा किंवा कोरफडीचा गर लावा. शरबत किंवा जलसंजीवनीचा वापर करा. तसेच कष्टाची कामे उन्हात करू नका. शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाने टाळा. लहान मुलांना पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नका. गडद रंगाचे तंग कपडे वापरू नका, मद्यपान, चहा, कॉफी, सॉफटड्रीक टाळा. खुप प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या काळात भर दुपारी स्वयंपाक करणे टाळा, स्वयंपाकघर हवेशीर ठेवा,

उन्हाचा त्रास झाल्यास रुग्णास

उष्माघातासाठी अती जोखमीचे घटक उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृद्ध व्यक्ती व लहान मुले, गरोदर महिला, स्थूल व्यक्ती व पुरेशी झोप न झालेले व्यक्ती, मधुमेह, हृदयविकार, दारूचे व्यसन असणारे लोक, घट्ट कपडे घातलेले लोक, निराश्रीत, घरदार नसलेले गरीब लोक, कारखान्यात बॉयलर जवळ काम करणारे लोक, अशा अत्ति जोखमीच्या लोकांना उष्माघाताचा धोका असून विशेषतः त्यांनी उष्णतेच्या लाटेदरम्यान विशेष काळजी घेतली पाहीजे. उष्णतेमुळे होणारा शारीरिक त्रास किरकोळ स्वरूपाच्या किंवा गंभीर स्वरूपाचा असतो.

वावानुकुलीव खोलीत ठेवावे अथवा हवेशीर खोलीत ठेवावे. खोलीत पंखे कुलर ठेवावे. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. आईसप्याक लावावेत, रुग्णाला जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जावे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व इतर शासकीय दवाखान्यात उन्हाळाच्या पूर्वतयारी अनुषंगाने आरोग्य विभागामार्फत उष्माघात कक्ष स्थापना, मुबलक औषधी साठा उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी प्रशिक्षण, आरोग्य शिक्षण, जनजागृती इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या रिसिश–३ २६ चरी २०२६ असून ग्रामीण आरोग्य यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवण्यात आलेली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आगामी दिवसांमध्ये जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, अशा परिस्थितीत विविध उष्णताविकार अथवा उष्माघात होऊ नये यासांठी नागरिकांनी आता पासूनच सजग रहावे व प्रतिबंधात्मक उपायावर अधिक भर द्यावा, तसेच उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राहुलकुमार मीना, आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा नोडल अधिकारी डॉ सुनील भागवत यांनी केले आहे.

**उष्माघाताची लक्षणे ?**

**। किरकोळ त्रासात उष्णतेमुळे थकवा येणे, ताप येणे, शरीरावर रॅश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसून येतात. । गंभीर त्रासात उष्माघात होऊन त्वचा गरम व कोरडी पडणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, नाडीचे ठोके वेगात व जोऱ्यात असणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुध्द अवस्था अशा लक्षणासह मृत्यूही होऊ शकतो.**



**प्रतिबंधात्मक उपाययोजना**

**उन्हाळ्यात पुरेसे पाणी प्या, प्रवासात पाणी सोबत ठेवा, हलक्या वजनाचे फिकट रंगाचे (पांढरे) सैलसर कपडे वापर. उन्हात चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणे वापर. ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा. शरबत किंवा जलसंजीवनीचा वापर करा.**

**आगामी दिवस धोक्याचे**

**हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आगामी दिवसांमध्ये जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, अशा परिस्थितीत विविध उष्णताविकार अथवा उष्माघात होऊ नये यासांठी नागरिकांनी आता पासूनच सजग रहावे व प्रतिबंधात्मक उपायावर अधिक भर द्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुनील भागवत यांनी केले आहे.**

# संक्षिप्त...

## सरकारने यशवंतवाडीच्या शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यावा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : तालुक्यात्तील यशवंतवाडी लातूर ग्रामीणमधील रेणापूर येथील रहिवासी ज्योतीराम साह वराव चव्हाण या शेतकरी बांधवाने शेताकडे जाणारा रस्ता भाजपच्या स्थानिक आमदाराच्या दबावामुळे खुला करून दिला जात नाही म्हणून विधानभवनासमोर अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याचा मंगळवारी प्रयत्न केला. या घटनेची माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी तातडीने दखल घेऊन सरकारने शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री यांच्याकडे केली.

ज्योतीराम साहेबराव चव्हाण

माजी आमदार धिरज देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

यांची यशवंतवाडी येथे वडिलोपार्जित शेतजमीन आहे. पण शेताकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने तो करून मिळावा, यासाठी चव्हाण अनेक दिवसांपासून पाठपुरावा करत आहेत. रस्ता करून द्यावा याबाबत सरकारने

आदेश दिलेले असतानाही त्याबाबत कार्यवाही केली जात नाही. 'आमचे हात बांधलेले आहेत', असे प्रशासन उत्तर देत आहे. म्हणून चव्हाण यांनी आज टोकाचे पाऊल उचलले. विधानभवनासमार अंगावर पेट्रोल ओतून रेणापूर येथील शेतकरी बांधवाने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. हे वृत्त अतिशय वेदनादायी व मनाला चटका लावणारे आहे. एका शेतकरी बांधवांवर आत्मदहन

करण्याची वेळ यावी ही घटना महाराष्ट्रासाठीच अत्यंत धक्कादायक आहे. या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करावी व शेतकरी बांधवाला नाहक मनस्ताप देणाऱ्या दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मी केली, असे माजी आमदार धिरज देशमुख यांनी सांगितले.

## प्राथमिक आरोग्यकेंद्रात एच.पी.व्ही लसीकरण



तभा वृत्तसेवा

रेणापूर, दि. २६ मार्च : तालुक्यातील पोहरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे एच.पी.व्ही.या लसीकरण मोहीमेस सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्या मनीषाताई गंगासिंह कदम या होत्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोहरेगाव ग्रामपंचायतीच्या प्रथम नागरिक सरपंच श्रीमती ज्योतीताई मोरे यांची उपस्थिती होती एच.पी.व्ही.लसीकरण मोहिमेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र,पोहरेगाव कार्यक्षेत्रातील एकूण २२ (गावे,तांडे,वाडी,वस्त्या) यातील एकूण २२२ लाभार्थीचे टप्पाटप्प्याने पुढील ३ महिन्यात एच.पी.व्ही.लसीकरण होणार आहे. लसीबाबत कोणताही गैरसमज मनात न ठेवता १४ वर्ष पूर्ण ते १५ वर्ष वयोगटातील मुलींनी ही अत्यंत सुरक्षित व गर्भाशयाच्या मुख कर्करोगापासून रक्षण करणारि ही लस असल्याचे पोहरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.भालचंद्र चाकूरकर यांनी सांगितले.

या कार्यक्रमास प्राथमिक अरोग्य केंद्र पोहरेगाव अंतर्गत सर्व समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक,आरोग्य सेविका व आशा कार्यकर्ती यांची उपस्थिती होती.तसेच या कार्यक्रमा वेळी प्रमुख पाहुण्याच्या हास्ते आयुष्मान आरोग्य कार्डचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले.

## श्रीराम मंदिर कलशारोहण, मुर्ती स्थापना ,लक्ष्मण शक्तीचे आयोजन...



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २६ मार्च : ईश्वर कृपेने व हणुमंतरायाच्या इच्छेने मौजे होंडाळा येथे श्रीराम मंदिर कलशारोहण, मुर्ती स्थापना श्री संत महंत गुरुवर्य एकनाथ नामदेव महाराज उम्रजकर यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत मिती चैत्र शुद्ध ७शके१९७८वार बुधवार दि.२५/३/२०२६रोजी सकाळी ११ते०१ या वेळेत श्रीरामचंद्र प्रभुंच्या परिवारातील मुर्तीची अर्थात राम, लक्ष्मण, सीता (जानकी),परम सेवक बजरंग बली यांच्या मुर्तींची प्राणप्रतिष्ठापना व मंदिराचा कलशारोहण सोहळा संपन्न झाला.संध्याकाळी ६ते दि.२६/३/२०२६ सकाळी ६ पर्यंत लक्ष्मण शक्तीचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी ९ते १२ह.भ.प.ज्ञानोबा माऊली महाराज अरबुजवाडीकर यांचे झाले या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिलेले संत महंत गुरुवर्य एकनाथ नामदेव महाराज मठसंस्थान उम्रजकर, प.पु.गुरुवर्य नराशाम महाराज मठसंस्थान येवती, शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर, सिद्धयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर, वीरुपक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, हभप.नामदेव महाराज बारुळकर, गुरुवर्य ह.भ.प. नामदेव महाराज दापकेकर, हभप.भानुदास महाराज वांजरवाडेकर, हभप.परमानंद महाराज हिप्परगेकर, हभप.गोपाळ महाराज घोणसीकर, हभप.खंडेश्र्वर महाराज सांगवीकर या प्रमुख गुरुवर्यांच्या साक्षीने व कृपाशीर्वादाने हा सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमाचे आयोजन होंडाळा नगरीतील हिंदू धर्म सेवक शिवाजी नारायणराव पाटील सुर्यवंशी यांनी केले होते.त्यांना मोलाचे सहकार्य होंडाळा नगरीतील समस्त गावकऱ्यांनी एकत्र येऊन या कार्यक्रमाला सहकार्य केले .

# ना . बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत 'जलतारा-पाणी परिषद' होणार



तभा वृत्तसेवा

चाकूर, दि. २६ मार्च : शेती आणि गाव पाणीदार करण्याच्या उद्देशाने सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लि. उजना (ता. अहमदपूर) च्या वतीने दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता शहरातील दीपवर्षा मंगल कार्यालय येथे तर चाकूर येथील यशवंत मंगल कार्यालयात दिनांक २८ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता भव्य 'जलतारा-पाणी परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या वर्षी अहमदपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पाणी परिषदेला मिळालेले अपार यश आणि तालुक्यातील शेतकरी बांधवांचा मोठा प्रतिसाद व वाढती मागणी लक्षात घेता यावर्षीही या महत्त्वपूर्ण परिषदेचे नियोजन अहमदपूर व चाकूर या दोन्ही शहरात करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बाळासाहेब जाधव हे उपस्थित राहणार आहेत.

या पाणी परिषदेचे मुख्य आकर्षण म्हणजे 'जलतारा' प्रकल्पाचे जनक प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ हे स्वतः उपस्थित राहून शेतकरी बांधवांना सखोल मार्गदर्शन करणार आहेत. आपल्या शेतात जलतारा प्रकल्प नेमका कसा राबवावा आणि त्या माध्यमातून विहिरी तसेच कूपनलिकेची (बोर) पाणीपातळी कशी वाढवावी, यावर ते तांत्रिक व प्रयोगात्मक माहिती देणार आहेत. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आणि शाश्र्वत शेतीसाठी ही परिषद अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

या परिषदेच्या यशस्वीतेसाठी सिद्धी शुगरचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश बाळासाहेब जाधव, संचालिका दीपाली अविनाश जाधव, सुरज बाबासाहेब पाटील (पी.जी. सन्मान), जनरल मॅनेजर केन पी.एल. मिटकर आणि दिनदार यांच्यासह सिद्धी शुगरचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. अहमदपूर तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या शेतातील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी आणि गाव समृद्ध करण्यासाठी या जलतारा पाणी परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जि. प. विषय समिती सभापतींची ३० ला निवड कोणाला संधी मिळणार ?



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीचा विषय मार्गी लागल्या नंतर विषय समित्या निवडीचा विषय ऐरणीवर आला आ हे. सोमवार दि. ३० मार्च रोजी विषय समिती सभापतींची निवड प्रक्रीया पार पडणार आहे. भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा जि. प. सत्तेचा ५०-५० टक्के वाटा असल्याने कोणाला किती समित्या मिळणार याची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.

लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची निवड प्रक्रीया सोमवार दि. १६ मार्च रोजी पार पडली. यात जि. प. च्या अध्यक्षपदी उषा पाटील, तर उपाध्यक्ष पदी दयानंद सुरवसे यांची निवड समित्यांसाठी ५०-५० टक्के फॉर्म्युला कायम

लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीत भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेसचा सत्तेचा वाटा ५०-५० टक्के प्रमाणे आता विषय समिती निवडीच्यावेळीही हाच फार्मुला कायम राहणार असल्याची चर्चा सध्या होताना दिसून येत आहे. समाज कल्याण, महिला व बालकल्याण, बांधकाम व आरोग्य, कृषि व पशुसंवर्धन, शिक्षण व अर्थ समितीवर दोन्ही पक्षांच्या नेत्यांचा डोळा आहे. तसेच कांही नाराज सदस्यांना वजनदार खाते मिळणार अशीही चर्चा होत आहे.

प्रक्रीया पार पडली. यानंतर प्रशासनाचे पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रोहिनी नन्हे यांनी जिल्हा परिषदेच्या चार विषय समिती सभापती निवडीचा कार्यक्रम जाहिर केला हे. पिठासीन अधिकारी यांनी जिल्हा परिषदेचे ५९ सदस्य आणि सर्व १० पंचायत समितीचे सभापती यांना नोटीस पाठवून सोमवार दि. ३० मार्च रोजी विषय समिती सभापती पदासा आठी निवडणूक प्रक्रीया पार पडणार असल्याचे कळवण्यात आले आहे.

लातूर जिल्हा परिषदेच्या

१५ एप्रिलपर्यंत सर्व समित्यांच्या सभापती निवडी होतील

लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची निवड दि. १६ मार्च रोजी पार पडली. अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या निवडीनंतर महिनाभराच्या आत सर्व विषय समित्यांच्या सभातींची निवड होऊन सदर समितीच्या सदस्यांव्याही निवडी ठरलेल्या नियमानुसार पार पडणे आवश्यक आहे. दि. ३० मार्च रोजी चार समित्यांच्या सभापतींची निवड होऊन समाज कल्याण, महिला व बालकल्याण सभातींना पदभार दिला जाणार आहे. तसेच उर्वरित दि. १३ किंवा १५ एप्रिल पर्यंत सर्व समिती सभापती व सदस्यांच्या निवडी पार पडणार आहेत. यावेळीच कोणाला कोणते सभातीपद दिले जाणार हे ठरणार आहे.

यशवंतराव चव्हाण सभागृहात सोमवार दि. २० मार्च रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत समाजकल्याण, महिला व बालकल्याण समितीच्या बरोबरच इतर दोन सभापतींची अशा प्रकारे चार विषय समिती सभापतींची निवड प्रक्रीया पार पडण्यासाठी नामनिर्देशनपत्र स्विकारले जाणार आहेत. दुपारी २ वाजता सभेस सुरुवात होणार आहे. सभेत उमेवारी मागे घेणे, उर्वरीत उमेदवारांची नावे घोषित करून विरोधी पक्षाकडून नामनिर्देशनपत्र आल्यास मतदान घेतले जाणार आहे. त्यानंतर निकाल जाहिर केल्यानंतर सभेचे कामकाज चालणार आहे.

## जि. प. अध्यक्ष, उपाध्यक्षांकडून कामाचा आढावा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्षांकडून अजून जिल्हा परिषदेच्या कामाचा आढावा घेतला जात नसल्याचे दिसत असून, हे पदाधिकारी सध्या सत्कार कार्यक्रमातच व्यस्त आहेत. सभापती निवडीनंतर अध्यक्ष, उपाध्यक्ष कामाचा आढावा घेतील, असे सांगण्यात आले.

गेल्या १६ मार्च रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड झाली. या निवडीनंतर लगेच पदाधिकारी कामाची माहिती घेऊन सक्रिय होतील, असे म्हटले जात होते. परंतु, सभापती निवड ३० मार्च रोजी होणार

असल्याने अध्यक्ष, उपाध्यक्षांनी पंधरा दिवस वाट पाहून किंवा अंदाज घेऊन नंतर कामास सुरूवात करावी, असे ठरवले असावे. हल्ली पदाधिकारी सत्कार

कार्यक्रमातच व्यस्त

अध्यक्ष, उपाध्यक्षांची कार्यालयात हजेरी अधूनमधून लागत असली तरी प्रत्यक्ष जोरकस कामास आणखी सुरूवात झालेली नाही. निवडीनंतर सत्कार कार्यक्रम यात बहुतांशी

वेळ जात असल्याची चर्चा आहे. पदाधिकारी आल्याने जिल्हा परिषदेत अभ्यंगतांची वर्दळ वाढली. परंतु, पदाधिकाऱ्यांनी कामास अजून सुरूवात केल्याचे दिसत नाही. पदाधिकारी बाहेरच्या स्त्रोताकडून जिल्हा परिषद प्रशासनाची माहिती करून घेत असावेत. आणखी चार-पाच दिवसांनी जिल्हा परिषदेत पदाधिकारी पूर्णवेळ थांबून काम पाहतील. सध्या सभापती निवड तसेच त्यांचे सहाय्यक निवड करणे सुरू आहे. यामुळेही पदाधिकाऱ्यांनी आढावा घेतला नसावा, अशी चर्चा आहे.

## प्रा तानाजी भोसले यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : स्विफ्टन लिफ्ट एज्युकेशन मीडिया पुणे चा राष्ट्रीय शिक्षक

पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत बचत गटाचे अध्यक्ष प्रा तानाजी भोसले यांचा लातूर येथे सत्कार करण्यात आला.

प्रा. तानाजी भोसले हे संत कबीर प्रतिष्ठानचे नियमक मंडळ सदस्यही आहेत.

प्रा. तानाजी भोसले यांनी गावभागातील मागास विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. राष्ट्र भाषा हिंदीचा प्रसार प्रचार आदि कार्यात सहभाग नोंदवला याबद्दल पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत बचत गटाचे उपाध्यक्ष पांडुरंग देडे, मार्गदर्शक प्राचार्य आर. डी.निटू रकर, सल्लागार व्यकट बिराजदार आदींनी त्यांचा सत्कार केला व भावी कार्यास शुभेच्छा दिल्या..

## ऑनलाईन लॉटरी जुगाराविरोधात विशेष पथकाची कारवाई

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च :

लातूर जिल्ह्यात अवैध जुगार, मटका व ऑनलाईन लॉटरीच्या माध्यमातून सुरू असलेल्या बेकायदेशीर व्यवसायांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाद्वारे सातत्याने मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत

सातत्याने मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत अहमदपूर शहरात गुप्त माहितीच्या आधारे नियोजनबद्ध कारवाई करत मटका व ऑनलाईन लॉटरी जुगार चालविणाऱ्या ठिकाणांवर सलग छापेमारी करण्यात आली.

सदर कारवाईदरम्यान भाजी मार्केट, मारोती मंदिर परिसर तसेच मटन मार्केट परिसरात लक्ष केंद्रीत करून तीन वेगवेगळ्या ठिकाणी धाड टाकण्यात आली. या वेळी आरोपी हे लोकांकडून पैसे स्वीकारून मोबाईल व संगणकाच्या सहाय्याने मिलन डे, प्ले गेम, फन टार्गेट अशा विविध नावांनी मटका व ऑनलाईन लॉटरी जुगार चालवत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी सुरज हिरालाल राउत्रे ,गोपीचंद राजकुमार भगत, सुनिल रामराव गायकवाड या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कचरा उचलण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : शहरातील प्रभाग क्र. १३ मधील रहिम नगर भागात रिंग रोडलगत टाकण्यात आलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी वाढली आहे. या भागातील पाण्याचा निचरा होत नसल्याने गेल्या चार ते पाच वर्षांपासून पाण्यात कचरा टाकला जात होता. रिंग रोडलगत नवीन नाली बांधकाम झाल्यामुळे या भागातील पाण्याचा निचरा होत आहे. मात्र या ठिकाणी पडलेल्या कचऱ्याचे ढिग दुर्गंधीला कारण ठरत आहे. महापालिका प्रशासनाने गेल्या अनेक दिवसांपासून पडलेला हा कचरा तातडीने उचलावा, अशी मागणी या भागातील नागरिकांतून होत आहे. पाणी निचरा झाल्याने कचऱ्याचे ढिग दिसत आहेत. त्यामुळे स्वच्छता विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.

## विळेगाव येथे अफूची लागवड , शेतकऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

किनगाव दि. २६ मार्च : अहमदपूर तालुक्यातील विळेगाव येथील एका शेतकऱ्याने स्वतःच्या शेतात प्रतिबंधित असलेल्या अफूच्या झाडांची लागवड करून त्याचे संगोपन सुरू केले होते. किनगाव पोलिसांना याची माहिती मिळताच मंगळवारी ( दि.२४) रात्री ९.५० वाजता किनगाव पोलिसांनी धाड टाकून १४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. मागील आठ दिवसांपूर्वीच लातूर तालुक्यातील गोंदेगाव शिवारात उसाच्या पिकात गांजाचे आंतरपीक घेतलेल्या ठिकाणी धाड टाकण्यात आली होती., आता किनगाव पासून काही अंतरावर असलेल्या विळेगाव मध्ये अफूची शेती सापडली आहे.

अहमदपूर तालुक्यातील विळेगाव येथील अशोक निवृत्ती चिंचोलकर यांनी त्यांच्या गट क्रमांक २३१ शेतात प्रतिबंधित असलेल्या अफूच्या १९ झाडांची लागवड करून त्याचे संगोपन सुरू केले होते . किनगाव पोलिसांना माहिती मिळताच अफूच्या झाडांची एकूण १४० ग्रॅम वजनाची २६ बोंडे किंमत प्रति ग्रॅम १०० रुपये प्रमाणे असा एकूण १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तानाजी वल्लमपल्ले यांच्या फिर्यादीवरून किनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हा नंबर ६७/२६ कलम ८ (क),१८ गुंगीकारक औषधी द्रव्ये मानवी शरीरावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके हे करत आहेत .

## समाज माध्यमांचा समाज हितासाठी सकारात्मक वापर करावा : डॉ. संजय गवई



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : आज प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाचा दैनंदिन जीवनामध्ये मोठ्या प्रमाणात वापर होत आहे परंतु यासर्व समाज माध्यमांचा समाजहितासाठी वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील प्रोफेसर डॉ.संजय गवई यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबिरात ते समाज माध्यमांचा सकारात्मक वापर या विषयावर प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रो.(डॉ.) राजाभाऊ पवार हे होते तर विचारमंचावर कार्यक्रमाधिकारी प्रो.(डॉ.)प्रमोद चव्हाण, डॉ. अरुण साळुंखे आणि डॉ.समीना शेख उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.गवई म्हणाले की, समाज माध्यमांचे प्रमुख तीन प्रमुख प्रकार आहेत यामध्ये प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडिया यांचा समावेश होतो. सोशल मीडियाचा सुजाण वापर केल्यास शिक्षण, व्यवसाय, संवाद आणि समाजजागृती यासाठी ते अत्यंत प्रभावी साधन ठरू शकते. आजच्या डिजिटल युगात तरुणांना रील्स, व्हिडिओ आणि विविध डिजिटल कंटेंट तयार करून उत्पन्नाचे नवे मार्ग उपलब्ध झाले आहेत. मात्र, या माध्यमाचा वापर करताना जबाबदारी, सत्यता आणि नैतिक मूल्यांचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रो.(डॉ.)राजाभाऊ पवार म्हणाले की, समाज माध्यम हे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्याचे नमूद करत, त्याचा वापर समाजहित आणि जनजागृतीसाठी करण्याचे आवाहन Ho$bo.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.समीना शेख यांनी केले, तर सूत्रसंचालन विद्यार्थी नरेश चामले यांनी तर आभार डॉ.अरुण साळुंखे यांनी मानले.

या व्याख्यानाला महाविद्यालयातील शिक्षक आणि सहभागी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक-स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त टाकळगाव येथे मोफत आरोग्य शिबिर



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मार्च : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर तालुक्यातील टाकळगाव येथे रविवार, २९ मार्च रोजी भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटर, धन्वंतरी हॉस्पिटल, जाधव हॉस्पिटल, आशा आरोग्यधाम आणि तांदूळजा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य शिबीर टाकळगाव येथे रविवार, २९ मार्च रोजी सकाळी १० ते २ वाजता पर्यंत होणार आहे.

तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग या आरोग्य शिबिरात नामवंत डॉक्टरांचा चमू रुग्णांची तपासणी करणार आहे. यामध्ये प्रामुख्याने: गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल

केअर सेंटरचे डॉ. रमेश भराटे, धन्वंतरी हॉस्पिटल डॉ. मनोज भडके, डॉ. पल्लवी भडके, जाधव हॉस्पिटल डॉ. सौरभ जाधव, डॉ. मेघा जाधव, स्वाामी रामानंद तिर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाइचे डॉ. महेश कदम, डॉ. शंकरराव धपाटे, आशा आरोग्यधाम डॉ.व्ही. व्ही.घवले, प्राथमिक आरोग्य केंद्र तांदुळजा येथील डॉ. व्यवहारे, डॉ. स्वाती डोलारे यांसह अन्य तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश आहे.

टाकळगावसह तांदूळजा, सारसा, भोसा, निळकंठ, वांजरखेडा आणि परिसरातील इतर गावांमधील नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिराचे आयोजन टाकळगावचे उपसरपंच निवृत्ती देवणे, शिवतेज प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष मनोज पवार, युवक काँग्रेस अध्यक्ष अमोल कदम, व्हा. चेअरमन धनंजय शिंदे, नितीन भिसे, संजय शिंदे आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे. वाढदिवसानिमित्त राबवण्यात येत असलेल्या या विधायक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## प्रेमाच्या जाळ्यात ओढले, लाखोंना लुटले

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मार्च : एका महाविद्यालयीन तरुणीच्या मागे लागत, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिच्यावर वारंवार बलात्कार करून पीडितेचे १३ तोळे सोन्यासह लाखो रुपयांना लुटल्याप्रकरणी नराधम आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी खुर्शीद अफसर पटवारी (रा. हडको कॉलनी, एमआयडीसी, लातूर) याने २०१८ मध्ये पीडित महाविद्यालयीन तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिच्यासोबत बलात्कार केला. त्यानंतर तिची बदनामी करण्याची धमकी तिला देऊ लागला. यातून आरोपी खुर्शीद पटवारी याने पीडितेकडून १३ तोळे सोने, गरज पडल्यानंतर लागतील असे रोख १ लाख २ज हजार रुपये व पीडितेच्या नावे २२ लाख रुपयांचे बँकेचे कर्ज काढून ते पैसे त्याच्या खात्यावर वळवून घेतले. ऑगस्ट २०१८ पासून जानेवारी २०२५ पर्यंत त्याचा हा त्रास पीडितेला सुरूच होता. अलिकडील काही दिवसांपूर्वी पीडिता ही लातूरला आली की, तिच्याकडून पैसे उकळण्यासाठी तिची बदनामी करण्याची धमकी देत होता. लग्नाचीही मागणी अलिकडच्या काळात त्याच्याकडून होऊ लागली होती. त्याच्या या त्रासाला कंटाळून पीडितेने आरोपी खुर्शीद अफसर पटवारी याच्याविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून गुरनं. १४४/२६ कलम ६४ (१), ३५१ (३), ३०८ (५), ३१८ (४) भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव सानप हे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी १.९२ लाखांची देणगी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

कर्नाटकातील गुलबर्गा येथील रहिवासी व श्री तुळजाभवानी मंदिर येथील निस्सीम भक्त श्रीकांत लाहोटी यांनी आज देवीच्या चरणी १ लाख ९२ हजार ८७२ रुपयांची देणगी अर्पण केली.

अखंड श्रद्धा व भक्तिभावातून त्यांनी ही देणगी अर्पण करत देवीचे मनोभावे दर्शन घेतले.



श्रीकांत लाहोटी हे गेल्या अनेक वर्षांपासून नियमितपणे मंदिर संस्थानला देणगी देत आहेत. दरवर्षी ते कधी वस्तूरूपात तर कधी रोख स्वरूपात देणगी देऊन श्री तुळजाभवानी देवींच्या सेवेत आपले योगदान देत असतात.

मंदिर संस्थानच्या वतीने जयसिंग पाटील यांनी श्रीकांत लाहोटी यांचा देवीची प्रतिमा व महावस्त्र देऊन यथोचित सन्मान केला.

यावेळी महेंद्र आदमाने, तेजस कऱ्हाळे, विश्वास कदम तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### शहीद दिनानिमित्त तेरणा महाविद्यालयात व्याख्यान

**धाराशिव, दि.२६ मार्च -**

धाराशिव येथील तेरणा महाविद्यालयात २३ मार्च रोजी शहीद दिनानिमित्त व्याख्यान कार्यक्रम पार पडला. भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख वक्ते प्रा. संतोष अवधूत यांनी विद्यार्थ्यांना देशप्रेम, त्याग व सामाजिक जबाबदारीचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे होते. प्रास्ताविक डॉ. सुशिलकुमार सरवदे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. मंजुषा बाबजे यांनी केले तर आभार डॉ. तुळशीराम उकिरडे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### कळंब शहरातून दुचाकी लंपास

**कळंब, दि.२६ मार्च -**

कळंब शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातून मोटारसायकल चोरीची घटना घडली आहे.



याबाबत दिनेश राजाभाऊ कोलांगडे (रा. पुनर्वसन सावरगाव, ता. कळंब) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, २३ मार्च रोजी सायंकाळी ७.४५ ते ८.०० वाजण्याच्या सुमारास भडगे मेडिकल समोर उभी असलेली अंदाजे २७,००० रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर प्लस (क्र. एमएच २५ व्ही २५५५) ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### राष्ट्रीय स्तरावरील ‘प्रेरणा’ परीक्षेत सुमित जेवळीकरची चमक

**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

तुळजापूर येथील श्री. कुलस्वामिनी विद्यालयातील इयत्ता ९ वी ‘अ’ मधील विद्यार्थी सुमित सर्वोत्तम जेवळीकर याने केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालय व Central Board of Secondary Education यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या ‘प्रेरणा’ शिक्षण कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले.



NCERT व CBSE यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या परीक्षेत देशभरातून निवड झालेल्या केवळ २० विद्यार्थ्यांमध्ये सुमितची निवड झाली आहे. त्याला तरवपरसरी येथील प्रेरणा अनुभवात्मक शिक्षण केंद्रात सहा दिवसांच्या विशेष प्रशिक्षणासाठी संधी मिळाली आहे. या यशाबद्दल शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य डी.व्ही. बेड यांनी अभिनंदन केले. या यशामागे विद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख भालेराव यांचे मार्गदर्शन लाभले.

### तुळजापूरात जुगारविरोधी कारवाईत एकावर गुन्हा दाखल

**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

तुळजापूर पोलीसांनी जुगारविरोधी मोहिमेत २५ मार्च रोजी सायंकाळी ४.१५ वाजता शहरातील जुन्या बसस्थानक परिसरात छापा टाकला.



या कारवाईत सिकंदर अमिन शेख (रा. वेताळ नगर, तुळजापूर) याच्याकडे ‘कल्याण मटका’ जुगाराचे साहित्य व १,१५० रुपयांची रोकड आढळून आली. पोलीसांनी जुगार साहित्य व रक्कम जप्त करत संबंधिताविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास तुळजापूर पोलीस करीत आहेत.



### तुळजापूरात भाविकांसह नागरिकांसाठी पाणपोईचे उद्घाटन

**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

उन्हाचा पारा वाढत असल्यामुळे रामनवमीचे औचित्य साधून स्वातंत्र्य सैनिक कै. हरिचंद्रराव सदाशिव वाघमारे यांच्या स्मरणार्थ तुळजाभवानी मंदिरापासून जवळच असणाऱ्या येथील आर्य चौकामध्ये नागरिक आणि भाविकांसाठी मोफत पाणपोई सुदर्शन वाघमारे यांच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. यावेळी नगरसेवक अमोल कुतवळ, रणजीत इंगळे, अमर मगर, सुहास साळुंके, राजेश देशमुख, सुदर्शन वाघमारे, वल्लभ कदम यशवंत वाघमारे, अण्णासाहेब अमृतराव, चंद्रकांत जोकर रवी पाठक यांच्यासह जय भवानी तरुण मंडळ व जाणता राजा युवा मंचाचे सर्व सदस्य उपस्थित होते. या समाज उपयोगी उपक्रमामुळे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसह नागरिकांना उन्हाळ्यात मोठा दिलासा मिळणार आहे.

# जय तुळजाभवानीच्या घोषणांनी दुमदुमले तुळजापूर; प्रकट दिन उत्साहात

**अभिषेक, महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप; भाविकांची मोठी उपस्थिती**





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

महाराष्ट्राची आराध्य दैवत व कुलस्वामिनी असलेल्या श्री तुळजाभवानी मातेचा प्रकट दिन तुळजापूर येथे उत्साहात, भक्तीमय वातावरणात आणि पारंपरिक धार्मिक विधींनी साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी उसळली होती. जय तुळजाभवानीच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

या पवित्र दिनानिमित्त मातेच्या चरणी अभिषेक पूजा, विशेष अलंकार आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या हस्ते मातेचा विधीवत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाआरती संपन्न झाली. यावेळी सर्व समाजाच्या कल्याणासाठी, सुख-समृद्धीसाठी आणि राज्याच्या प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली.

मंदिरातील धार्मिक विधी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. मुख्य महंत वाकोजी बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पूजा-अर्चा करण्यात आली. मंदिर व्यवस्थापक माया माने यांनी कार्यक्रमाचे नियोजन सुयोग्य रितीने पार पाडले. महाद्वारासमोर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## नळदुर्गमध्ये श्रीराम नवमीनिमित्त शोभा यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ मार्च -**

श्रीराम नवमीच्या पावन पर्वानिमित्त भाजपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य भगवा ध्वज व शोभा यात्रेला नळदुर्ग शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या यात्रेत हिंदू बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात्रेमुळे संपूर्ण शहर भगवेमय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

जिल्ह्यात भाजपच्या वतीने श्रीराम नवमी निमित्त शोभा यात्रा व भगवा ध्वज यात्रा काढण्यात आली.

त्याच अनुषंगाने नळदुर्ग शहरातही ही भव्य यात्रा आयोजित करण्यात आली. सकाळी व्यासनगर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापासून टाळ-मृदंगाच्या गजरात व जय श्रीरामच्या घोषणांत यात्रेला प्रारंभ झाला.

फुलांनी सजविलेल्या ट्रॅक्टरवर श्री प्रभू रामचंद्रांची भव्य प्रतिमा प्रतिष्ठापित करण्यात आली होती. प्रारंभी नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या शोभा यात्रेचे संयोजन भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, पद्माकर घोडके, अजय दासकर, बबन चौधरी व उमेश नाईक यांनी केले होते. यावेळी तानाजी जाधव, प्रविण गायकवाड, किशोर नळदुर्गकर, मिनाक्षी काळे, राणी सुरवसे, छमाबाई राठोड, सुधीर हजारे, सुनील उकंडे, सागर हजारे, धीमाजी घुगे, अक्षय भोई, विरेंद्र बेडगे, अमोल मेंडके, संदीप गायकवाड, शिवाजी सुरवसे, सचिन घोडके, बंडप्पा कसेकर यांच्यासह नागरिक सहभागी झाले होते.

ही शोभा यात्रा व्यासनगर येथून बसस्थानकासमोरील संविधान चौक, लोकमान्य वाचनालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, शास्त्री चौक, भवानी चौक, श्रीराम मंदिर, सावरकर चौक, धर्मवीर संभाजी महाराज चौक, मराठा गल्ली, पांचपीर चौक, किल्ला गेट, क्रांती चौक, चावडी चौक मार्गे श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे पोहोचली.

मिरवणुकीच्या मार्गावर जागोजागी श्रीरामांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात

## माजी विद्यार्थ्यांच्या क्रिकेट स्पर्धेत टीम तोरणागड विजेता



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ यमगरवाडी येथील एकलव्य विद्या संकुलात २१ ते २३ मार्च दरम्यान माजी विद्यार्थ्यांच्या क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला.

अंतिम सामन्यात टीम तोरणागडने प्रथम फलंदाजी करत ८ षटकांत ९८ धावा केल्या. प्रत्युत्तरात टीम सिंहगड ८२ धावांवरच थांबला.

त्यामुळे टीम तोरणागडने १७ धावांनी विजय मिळवत विजेतेपद पटकावले.

विजयी संघाकडून स्वप्निल हेरुर याने १६ चेंडूत ५४ धावांची दमदार खेळी केली. नागेश विभुते याला ‘उत्कृष्ट गोलंदाज’, सागर डुकरे याला ‘अष्टपैलू खेळाडू’ तर बालाजी राठोड यांना ‘मॅन ऑफ द सिरीज’ पुरस्कार मिळाला. ‘उत्कृष्ट फलंदाज’ म्हणून स्वप्निल हेरुरचा सत्कार करण्यात आला.

स्पर्धेनंतर पारितोषिक वितरण समारंभात भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे कार्यवाह विवेक अयाचित, राजाभाऊ गिजरे व महेश गायकवाड यांच्या हस्ते विजेत्या संघाला ट्रॉफी देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे यांच्यासह मान्यवर व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नळदुर्ग परिसरात चोरी; मोटार, केबल व दुचाकीसह ८६ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर परिसरात शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मोटारींच्या केबलसह साखर कारखान्यातील साहित्य व दुचाकी असा एकूण ८६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे.



दि.२४ मार्च रोजी सकाळी १० ते दि.२५ मार्च रोजी सकाळी ९ या कालावधीत अणदूर येथील तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखाना प्रा. लि. नळदुर्ग संचलित गोकुळ शुगर युनिट क्रमांक ०२ तसेच लंगडे साठवण तलाव परिसरातून ही चोरी करण्यात आली. यामध्ये ११ शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मोटारींचे कॉपर केबल, सिमेन्स कंपनीची ३.५ एचपीची इलेक्ट्रिक मोटार, लोखंडी बॉल, लोखंडी पट्ट्या तसेच हिरो होंडा सीडी डॉन कंपनीची (क्र. एमएच १३ वाय १०३०) दुचाकी असा एकूण ८६,५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. या प्रकरणी यशवंत नारायण मोटे (रा. चिकुंद्रा, ता. तुळजापूर), विशाल संजय कांबळे व तुळशीराम सिताराम भालेराव (दोघे रा. नळदुर्ग, ता. तुळजापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी फफलचंद साबळे यांनी दि.२५ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## शिक्षकांच्या अडचणी सोडवणे आपली जबाबदारी : अर्चनाताई पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

धाराशिव येथे अखिल प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांची भेट घेऊन शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत निवेदन सादर केले.

यावेळी अर्चनाताई पाटील यांनी शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवणे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगितले. शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी आपण कटिबद्ध असून सर्व मागण्यांवर सकारात्मक व सखोल चर्चा करून त्या लवकर मार्गी लावण्यासाठी कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी आश्वासन दिले.

शिक्षक हा समाज घडवणारा शिल्पकार आहे. त्यांच्या समस्या सोडवल्यास शिक्षण व्यवस्था अधिक मजबूत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

बैठकीस शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष लालासाहेब मगर, जिल्हाध्यक्ष बशीर तांबोळी, कार्याध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, सरचिटणीस अविनाश मोकशे, सविता पांढरे, शिवाजी साखरे यांच्यासह जिल्हाभरातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तुळजाई नगरीत राम नवमी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

जय श्रीराम प्रतिष्ठान, तुळजापूर यांच्या वतीने प्रभू श्रीराम जन्मोत्सव (राम नवमी) मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

या पावन प्रसंगी प्रभू श्रीरामांच्या मूर्तीचे विधीवत पूजन श्री महंत मावजीनाथ महाराज व महंत व्यंकट अरण्य महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसर जय श्रीरामच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमास जय श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दिनेश पलंगे यांच्यासह गोरक्षक दिनेश धनके, संतोष इंगळे, रोहित दाभाडे, ऋषिकेश इंगळे, अनिकेत भोसले, आशुतोष रंदवे, बबलू प्रताप, प्रणव देवकते, ओंकार रंदवे, समर्थ जमदाडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी भाविकांनी उपस्थित राहून प्रभू श्रीरामांचे दर्शन घेतले.

## विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम : कवितेतून ‘भेळ’ तयार करून घेतला आस्वाद



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ मार्च -**

येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरातील इयत्ता दुसरीच्या १३५ विद्यार्थ्यांनी आई आई कर ना ग भेळ या कवितेवर आधारित अनोखा उपक्रम राबवत स्वतः सामूहिकपणे भेळ तयार करून अंगत-पंगत घालून तिचा आस्वाद घेतला.

वर्गशिक्षक विवेकानंद जाधव गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी भेळीसाठी लागणारे सर्व साहित्य स्वतः गोळा केले. कवितेच्या ओळी म्हणत व त्यानुसार कृती करत विद्यार्थ्यांनी चविष्ट भेळ तयार केली. या उपक्रमातून मुलांना स्वयंपाकातील प्राथमिक कौशल्ये शिकण्याची संधी मिळाली.

या उपक्रमामागील उद्देश म्हणजे मुलांनी साधे व झटपट पदार्थ तयार करण्याचे कौशल्य आत्मसात करावे हा होता. या कार्यात जैतून बी मेंडके व महेश कुलकर्णी यांनी सहकार्य केले.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भेळीचा आस्वाद मुख्याध्यापिका सविता लोहार तसेच गोपाळ आष्टे, दत्तात्रय कोकणे, गोविंद जमादार, बेबी सरोजा पवार आदी शिक्षकांनी घेत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले.

## ग्राहक जागरूक असेल तर फसवणूक टळते : ज्योती पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

ग्राहक म्हणून वस्तू खरेदी करताना त्यावरील किंमत, दर्जा आणि एक्सपायरी तारीख तपासणे अत्यंत आवश्यक आहे. ग्राहक जागरूक असेल तर त्याची फसवणूक होणार नाही, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी केले.

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित जागतिक ग्राहक हक्क दिन कार्यक्रमात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

यावेळी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सदस्य नितीन अग्रवाल, वैशाली बोराडे, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य शरद वडगावकर, अजित बागडे, आशिष बाबर, अनिल पाटील तसेच वीज तक्रार निवारण मंचच्या सदस्या मेधा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुढे बोलताना ज्योती पाटील म्हणाल्या की, ग्राहक हा राजा असून त्याने चिकित्सक दृष्टीने वस्तू व सेवांची खरेदी करावी. आपण मागणी केल्याप्रमाणे वस्तू मिळाली आहे का, याची खात्री करणे आवश्यक आहे. ग्राहकांवर अन्याय झाल्यास जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार दाखल करता येते. तसेच शासनाच्या विविध योजनांचा योग्य लाभ मिळतो आहे का, याची खात्री करणेही ग्राहकांची जबाबदारी आहे. प्रास्ताविक करताना जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांनी सांगितले की, ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. आजच्या बाजारपेठेत विविध प्रकारच्या वस्तू उपलब्ध असून त्यांचा दर्जा उत्तम असणे हा ग्राहकांचा अधिकार आहे.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते संगीता गायकवाड, अंबर देशमाने, सय्यद गिलानी, नारायण कांबळे, बालाजी शेलार, संगीता, चांद अब्दुल शेख, शेरीपा नवाब शेख, काझी शमशाद आणि छाया चौधरी यांना शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले.

## राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेत नाशिकचा दबदबा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२६ मार्च -**

कळंब येथील तालुका क्रीडा संकुलात २३ ते २६ मार्च दरम्यान राज्यस्तरीय शालेय आट्यापाट्या स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

अंतिम सामन्यांमध्ये १७ व १९ वर्षे गटात नाशिक संघाने प्रथम क्रमांक पटकावत आपला दबदबा सिद्ध केला, तर यजमान लातूर संघाला द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले. स्पर्धे दरम्यान प्रेक्षकांना रोमहर्षक सामने पाहायला मिळाले.

बक्षीस वितरण सोहळ्यास तहसीलदार हेमंत ढोकले, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या शितल शिंदे, शिल्पा डोंगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी तहसीलदार ढोकले यांनी खेळाडूंना मैदानी खेळांचे महत्त्व सांगितले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## परंडा पोलीस ठाण्यात गोंधळ; पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२६ मार्च -**

परंडा पोलीस ठाण्याच्या आवारात शासकीय कामकाज सुरू असताना गोंधळ घालून पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की, दि.२५ मार्च रोजी दुपारी सुमारे २.४५ वाजण्याच्या सुमारास परंडा पोलीस ठाणे आवारात फिर्यादी शिवाजी बबन राउत (वय ३९), नियुक्ती पोलीस ठाणे परंडा, हे आपल्या सहकाऱ्यांसह शासकीय कामकाज करत होते.

यावेळी आरोपी अभिमान दिगंबर काळे, फुलाबाई अभिमान काळे, अनिषा अभिमान काळे व दिलीप अभिमान काळे (सर्व रा. देवगाव, ता.परंडा, जि.धाराशिव) यांनी तेथे येऊन शिवीगाळ केली. तसेच तुझी वर्दी काढून टाकतो अशी धमकी देत मोठ्याने आरडाओरडा करून सार्वजनिक शांततेचा भंग केला.

याचदरम्यान आरोपींपैकी एका व्यक्तीने पोलीस कर्मचाऱ्याच्या हाताच्या बोटाला चावा घेऊन जखमी केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. प्रकरणी फिर्यादी शिवाजी राउत यांनी दिलेल्या तक्रारीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### धाराशिवमध्ये नारी शक्ती सन्मान सोहळा संपन्न

**धाराशिव, दि.२६ मार्च -**

धाराशिव नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील प्रमुख उपस्थित होत्या. समाजाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या व आपल्या कर्तृत्व, जिद्द आणि समर्पणातून आदर्श निर्माण करणाऱ्या महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. महिला सक्षमीकरणाला चालना देणारा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास नगराध्यक्षा नेहा काकडे, महिला व बालकल्याण सभापती वैशाली सोनवणे, नगरसेविका व महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### जवळका येथे 'पंचायत समिती आपल्या दारी' उपक्रम संपन्न

**वाशी, दि.२६ मार्च -**

वाशी तालुक्यातील जवळका येथे माजी मंत्री व आमदार तानाजीराव सावंत यांच्या संकल्पनेतून 'पंचायत समिती आपल्या दारी' हा उपक्रम २५ मार्च रोजी उत्साहात पार पडला. कार्यक्रमास सभापती प्रणिता गायकवाड, उपसभापती नितिन रणदिवे तसेच गटविकास अधिकारी ओंकार गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विभागप्रमुखांनी शासनाच्या योजनांची सविस्तर माहिती देत नागरिकांच्या शंकांचे निरसन केले. आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य तपासणीही करण्यात आली. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायतीच्या प्रशासक निकिता नाळपे तसेच नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन विकास नाळपे यांनी केले, तर आभार निलेश आडमुटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



### लोहाऱ्यात ज्ञान संस्कार क्लासेसच्या विद्यार्थ्यांचा नवोदय यशाचा गौरव

**लोहारा, दि.२६ मार्च -**

लोहारा शहरातील 'ज्ञान संस्कार' कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी पहिल्याच वर्षी नवोदय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. यानिमित्त २५ मार्च रोजी तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. पहिल्याच बॅचमधील १३ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थी नवोदय पात्र ठरले, तर ७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अजिंक्य भोंडवे व हर्षद ढोबळे यांचा समावेश आहे. यावेळी तहसीलदार कोळेकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी योग्य मार्गदर्शन व मेहनतीचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास विक्रांत संगशेट्टी, ओम कोरे, विश्वास ढोबळे, व्यंकटेश पोतदार आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन वैष्णवी गर्जे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. गणेश गुंड यांनी मानले.

# जय श्रीराम! : धाराशिव नगरीत रामनवमीचा भगवामय जल्लोष







**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

श्री रामनवमीच्या पावन पर्वानिमित्त धाराशिव नगरीत आज अभूतपूर्व उत्साह, भक्तीभाव आणि एकतेचे दर्शन घडले. प्रभू श्रीरामांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण शहर भगवामय झाले होते. रस्त्यांवर भगवे ध्वज, मंदिरांमध्ये पूजाअर्चा आणि जय श्रीराम! च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते.

शहरातील ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून भव्य भगवा ध्वज रॅलीची सुरुवात करण्यात आली. या वेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चनाताई पाटील यांनी प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन केले आणि रॅलीचा शुभारंभ केला. रॅलीदरम्यान जय श्रीराम! च्या जयघोषाने संपूर्ण धाराशिव नगरी दुमदुमून गेली. हातात भगवे ध्वज, अंगावर केशरी फेटे, पारंपरिक



वेशभूषा आणि चेहऱ्यावर उत्साह- असे भक्तिमय चित्र सर्वत्र पाहायला मिळाले. ढोल-ताशांचा गजर, लेझीम पथके आणि भजन मंडळांच्या सादरीकरणामुळे वातावरण अधिकच रंगतदार झाले.

या रॅलीत लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. विशेषतः तरुणाईचा जोश आणि महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग हे या सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले. अनेकांनी भगवे ध्वज, बॅनर आणि फलक हातात घेत श्रीरामांच्या जयघोषात सहभाग घेतला. या भव्य रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. वाहतूक नियंत्रण, सुरक्षा व्यवस्था आणि वैद्यकीय सुविधा यांची योग्य काळजी घेण्यात आली होती.

रामनवमीच्या या सोहळ्याने धाराशिव नगरीत धार्मिक श्रद्धेबरोबरच सामाजिक एकतेचा आणि सांस्कृतिक अभिमानाचा संदेश दिला. विविध समाजघटकांनी एकत्र येऊन साजरा करण्यात आला. जय श्रीराम! च्या गजरात साजऱ्या झालेल्या या उत्सवाने धाराशिवकरांच्या मनात भक्ती, उत्साह आणि अभिमानाची नवी ऊर्जा निर्माण केली.

### धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल...

रामनवमीच्या निमित्ताने शहरातील विविध मंदिरांमध्ये सकाळपासूनच अभिषेक, पूजन, रामरक्षा पठण, कीर्तन आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. अनेक ठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. काही मंडळांनी रामजन्म सोहळ्याचे देखावे साकारून भक्तांना रामायणातील प्रसंगांचे दर्शन घडवले.

## श्रीराम नवमीच्या निमित्ताने परंडा नगरीत भगवामय जल्लोष!

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२६ मार्च -**

रामनवमीच्या पवित्र, मंगलमय पर्वानिमित्त संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात भक्तिमय वातावरणात भव्य भगवा ध्वज यात्रांचे आयोजन करण्यात आले.

सत्य, धर्म आणि आदर्श जीवनाचे प्रतीक असलेल्या प्रभू श्रीरामांच्या चरणी नतमस्तक होत, आपल्या समृद्ध संस्कृतीची आणि परंपरेची जपणूक करत हजारो भाविक भगव्या ध्वजाखाली एकत्र आले.

परंडा शहरातही या पावन दिनाचे औचित्य साधत भगवा ध्वज यात्रेचे आयोजन करण्यात आले. महाराणा प्रताप चौकातून सुरू झालेली ही दिमाखदार रॅली जय श्रीरामच्या जयघोषात संपूर्ण शहर दुमदुमवत राम मंदिरापर्यंत पोहोचली. प्रत्येकाच्या हातात भगवा ध्वज आणि मनात प्रभू रामांविषयीची अखंड श्रद्धा- असे अद्भुत दृश्य अनुभवायला मिळाले.

या भव्य यात्रेत मा.आ. सुजितसिंह ठाकूर, युवा नेते मल्हार पाटील, जि.प. सदस्य धनंजय सावंत यांच्यासह परंडा शहरातील मान्यवर तसेच हजारो हिंदू बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



### ३.२२ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.२६ मार्च -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने २५ मार्च रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर एकूण ३२८ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईतून ३ लाख २२ हजार ७५० रुपयांचा तडजोड दंड वसूल करण्यात आला.

### दुचाकी अपघातात एकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

नळदुर्ग-अक्कलकोट मार्गावरील गुळहळी शिवारात झालेल्या दुचाकी अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शांतकुमार राम सुतार (वय ४९, रा. चुंगी, ता. अक्कलकोट) हे पत्नी शरयु सुतार यांच्यासह १३ मार्च रोजी सकाळी मोटरसायकलवरून जात असताना समोरून आलेल्या दुचाकीने धडक दिली.

या अपघातात शांतकुमार सुतार गंभीर जखमी होऊन मृत्यूमुखी पडले, तर संजय बाबुराव लांडगे गंभीर जखमी झाले.

### लोहारा : महात्मा फुले जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२६ मार्च -**

लोहारा शहरात महात्मा फुले युवा मंचच्या वतीने महात्मा फुले जयंती उत्सवानिमित्त बैठक घेऊन उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक अविनाश माळी होते.



या बैठकीत समितीच्या अध्यक्षपदी किशोर माळी, उपाध्यक्षपदी अशोक काटे व गणेश माळी, सचिवपदी प्रशांत क्षीरसागर, सहसचिवपदी विष्णु क्षीरसागर, तर सजावट प्रमुखपदी अभिजीत क्षीरसागर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

बैठकीस श्रीनिवास माळी, राजेंद्र माळी, शरण फुलसुंदर, सचिन माळी, दिनेश माळी यांच्यासह अनेक पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

## काटी येथे घरफोडी; रोख रक्कम व दागिन्यांसह ६० हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील काटी येथील एका घरफोडीच्या घटनेत अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा सुमारे ६० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत फिर्यादी दशरथ अनंता मदणे (वय ३२, रा. काटी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी तामलवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी घरातील रोख रक्कम ४०,००० रुपये व सुमारे अर्ध्या तोळ्याचे सोन्याचे दागिने असा एकूण अंदाजे ६०,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला.

या प्रकरणी फिर्यादीने दि.२५ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस करत आहेत.

### पल्लवी तांबारेची लोहमार्ग पोलीसपदी निवड; गावाकडून गौरव

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२६ मार्च -**

आंदोरा येथील पल्लवी तांबारे हिने अल्पवयात मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर छत्रपती संभाजीनगर येथे लोहमार्ग पोलीस पदासाठी निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या पल्लवीने लहानपणापासूनच अभ्यासात हुशारी दाखवली.

तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आंदोरा येथे, तर उच्च शिक्षण मोहेकर कॉलेज, कळंब येथे पूर्ण झाले. ती एनसीसीचे 'उ' प्रमाणपत्रही उत्तीर्ण आहे.

भरती परीक्षांमध्ये अपयश आले तरी न खचता सातत्याने प्रयत्न करत राहिल्यामुळेच तिला हे यश मिळाले. वयाच्या अवघ्या २२व्या वर्षी मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

पल्लवीच्या या यशाबद्दल आंदोरा गावातील वरिष्ठ नागरिकांनी प्राथमिक शाळा, हायस्कूल तसेच गावात सत्कार समारंभ आयोजित करून तिचा गौरव केला. तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सोलापुरात 'महिला महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेचा थरार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

सह-प्रायोजक सेरेंटिका रिन्युएबल्स आणि आयोजक निरझरा केअर फाउंडेशनच्या यांच्या वतीने कै. सिद्धराम साखरे यांच्या स्मरणार्थ तसेच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ४ थी 'महिला महाराष्ट्र केसरी' तसेच वरिष्ठ गट महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा - २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच खुल्या गटातील पुरुष कुस्ती स्पर्धांचाही समावेश करण्यात आला असून राज्यभरातील नामांकित महिला व पुरुष पैलवानांचा सहभाग अपेक्षित आहे.

ही स्पर्धा २८ ते २९ मार्च २०२६ दरम्यान सायंकाळी ५ ते ९ या वेळेत सोलापूर येथील हरिभाई देवकरण प्रशाला, होम मैदान परिसरात पार पडणार आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध कुस्ती परंपरेला उजाळा देणारी ही स्पर्धा ऐतिहासिक ठरणार असून महिला शक्तीचा भव्य संग्राम पाहायला मिळणार आहे.

हरितऊर्जा निर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी सेरेंटिका रिन्यूएबल्स ही या स्पर्धेची सह-प्रायोजक असून महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहे. नुकतेच महिला दिनानिमित्त धाराशिव जिल्ह्यातील २० महिलांना शिलाई प्रशिक्षण देऊन त्यांना शिलाई मशिनचे वितरण करण्यात



कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार असून, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर तसेच आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच रामदास तडस, मुरलीधर मोहोळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये राज्यसभा खा.डॉ. ज्योती वाघमारे, आमदार देवेंद्र कोठे, विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, समाधान आवताडे, दिलीपराव सोपल, नारायण पाटील, उत्तमराव जानकर तसेच महापौर विनायक कोंड्याल यांचा समावेश आहे. 'महिला महाराष्ट्र केसरी' विजेत्यास 'किया सोनेट' कार, तर उपविजेत्यास 'बुलेट' बाईक देण्यात येणार आहे. याशिवाय विविध वजन गटांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

पुरुष गटातील स्पर्धांमध्येही विविध वजन गटांनुसार ४,००० ते ३०,००० रुपयांपर्यंत बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. 'वजनाची अट असून वयाची अट नाही' या निकषावर ही स्पर्धा खेळविण्यात येणार आहे.

# श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे हजारो भाविकांच्या उपस्थितीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ मार्च -**

प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे दि. २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी तुळजापूर तालुक्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी रामतीर्थ येथे भेट देऊन श्रीरामांचे दर्शन घेतले.

सालाबादाप्रमाणे यंदाही श्रीक्षेत्र रामतीर्थ देवस्थानच्या वतीने महंत श्री विष्णु प्रसाद शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा आयोजित करण्यात आला. प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन मानल्या जाणाऱ्या या तीर्थक्षेत्रावर दर्शनासाठी भाविकांची नेहमीच मोठी गर्दी असते. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सकाळी ११ वाजता महाअभिषेक व शृंगार करण्यात आला. दुपारी १२ वाजता नळदुर्ग शहरातून निघालेली पालखी मिरवणूक तसेच अणदूर येथून काढण्यात आलेली श्रीरामांच्या मूर्तीची मिरवणूक रामतीर्थ येथे दाखल झाली. या सोहळ्यासाठी नळदुर्गसह जळकोट, अणदूर, लोहगाव, नंदगाव, रामतीर्थ, आलियाबाद परिसरातील हजारो भाविकांनी मोठी उपस्थिती लावली. सोहळ्यानिमित्त श्रीराम मंदिर, हनुमान मंदिर व महादेव मंदिर या तिन्ही मंदिरांना आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच रंगीबेरंगी फुलांनी मंदिरांची सजावट करण्यात आली होती.






दुपारी १२ वाजता महंत विष्णु शर्मा महाराज, हैदराबाद येथील बसवराज पाटील महाराज, पुजारी शुक्ला महाराज यांच्या हस्ते हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्यासोबत नगराध्यक्ष बसवराज धरणे तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, भाजपचे दिवंगत कार्यकर्ते कै. राजेश कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने रामतीर्थ येथे भाविकांसाठी शुद्ध व थंडगार पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्लांट उभारण्यात आला असून, त्याचे लोकार्पणही याच सोहळ्यानिमित्त करण्यात आले. या सुविधेमुळे भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

हा सोहळा शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी महंत विष्णु प्रसाद शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व रामभक्तांनी परिश्रम घेतले.